


# ग्रामविकास
## मार्गदर्शक पुस्तिका



# ग्रामविकास मार्गदर्शक पुस्तिका

## रा. स्व. संघ ग्रामविकास विभाग

संकलन: सेवावर्धिनी, पुणे


# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | ३ |
| २. | या पुस्तिकेचा उपयोग कसा करावा? | ३ |
| ३. | ग्रामविकास – पार्श्वभूमी | ५ |
| ४. | शाश्वत ग्रामविकास – काळाची गरज | १० |
| ५. | ग्रामविकास विभाग – रचना | ११ |
| ६. | सप्त–संपदा आणि पंच शक्ती | १२ |
| ७. | किरण – उदय – प्रभात ग्राम : संकल्पना | १६ |
| ८. | ग्रामविकास समिती: कार्यपद्धती | १७ |
| ९. | ग्रामविकास सूत्र: पू. सरसंघचालक मोहनजी भागवत | २० |
| १०. | सप्त–संपदा – सविस्तर माहिती | २२ |
| | १) भू–संपदा : श्री. प्रताप चिपळूणकर (पुस्तक: जमिनीची सुपीकता) | २२ |
| | २) जल–संपदा : श्री नरहरी शिवपुरे | २५ |
| | ३) गो–संपदा : श्री. शेखर धर्माधिकारी | २५ |
| | ४) वन–संपदा : श्री. रघुनंदन वेलणकर | २५ |
| | ५) जीव–संपदा : डॉ. राहुल मुंगीकर | २७ |
| | ६) ऊर्जा–संपदा : श्री. आशिष कुलकर्णी, जालना | २८ |
| ११. | ग्रामविकास समितीसाठी महत्वाचे उपक्रम | २९ |
| १२. | ग्रामविकास: कार्यकर्ता विचारधन | ३४ |
| | १) ग्राम–विकासाचा मूलमंत्र ग्राम–स्वच्छता : श्री. विनय कानडे | ३४ |
| | २) ग्राम–विकासात मी : सौ. पद्माताई कुबेर | ३४ |
| | ३) सामाजिक समरसतेतून गाव एक, गाव नेक : डॉ. दिवाकर कुलकर्णी | ३६ |
| १३. | महाराष्ट्रातील प्रगतीशील गावे | ३७ |
| | यशोगाथा १: आनंदवाडी, लातूर – श्री. दत्ता पुरी | ३७ |
| | यशोगाथा २: बारीपाडा, धुळे – श्री. जगन्नाथ पाटील | ३८ |

यशोगाथा ३: नेसू नदी पूजन, खांडबारा, नंदुरबार – श्री. संजय झेंडे ३९
यशोगाथा ४: गोष्ट पाण्याच्या कमाईची, घनसांगवी – श्री. दत्ता जोशी ४०

परिशिष्ट १: तांत्रिक सहकार्य – संस्था सूची ४२
परिशिष्ट २: ग्रामविकास विभाग – संपर्क सूची ४३
परिशिष्ट ३: ग्राम–अध्ययन फॉर्म ४४
परिशिष्ट ४: ग्रामविकास गीते ५६
परिशिष्ट ५: अधिक माहितीसाठी संदर्भ ६५

***



ग्राम सेवाची ईश्वरसेवा, ऐसे समजावोनी जीवा ।
गाव सेवेसी तत्पर करावा, सर्वतोपरी ।।
काही कर्मे स्वतःकरिता । काही कुटुंबाचिया हिता ।
काही कर्मे गावलोकांकरिता । सेवाधर्मरूप ।।
तैसेचि पोटासाठी करणे काम । हे नव्हेत पुण्य परिश्रम ।
उरल्या वेळी जे सेवाकर्म । त्याची धर्म बोलती ।।
तेचि माणुसकीचे कर्म । जे दुसऱ्यांसाठी केले श्रम ।
एरवी पशुपक्षीही करती उद्यम । आपुलाले ।।
ग्राम सुधारणेचा मूलमंत्र, सज्ज्ञनांनी व्हावे एकत्र ।
संघटना हेच शक्तीचे सूत्र, ग्रामराज्य निर्माण करी ।।
कार्यकर्ता तोचि गावाचा । ज्यास लोभ नाही कोणचा ।
आमुचा गाव मोक्ष आमुचा । मानावा त्याने ।।
व्यक्तीधर्म सर्वा कळावा, कुटुंब धर्म आचरणी यावा ।
ग्रामधर्म अंगी बाणावा, राष्ट्रधर्माच्या धारणेने ।।
खरे नाम निष्काम ही ग्रामसेवा, झटू सर्वभावे करू स्वर्ग गावा ।
कळो हे वळो, देश कायी पडू दे, प्रभो एवढे हे घडू दे ।।
ऐसी करावी ग्रामसेवा । हेची कर्म आवडे देवा ।
संशय काही मनी न धरावा । तुकड्या म्हणे ।।

**ग्रामगीता – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

आपल्या गावाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेल्या,
येणाऱ्या सर्व अडचणींना सामोरे जात,
कोणताही भेदभाव न करता,
समस्त गावकऱ्यांना आपले कुटुंब मानून,
त्यांच्या कल्याणासाठी
निःस्वार्थ मनाने अहोरात्र परिश्रम करणाऱ्या

**सर्व ग्रामविकास कार्यकर्त्यांना**

ही पुस्तिका अर्पण !

# १. प्रास्ताविक

रा. स्व. संघाची स्थापना नागपूरला इ.स. १९२५ मध्ये विजयादशमीच्या सुमुहूर्तावर प. पू. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी केली. या महापुरुषाने एक उत्कट आणि व्यापक राष्ट्रीय दृष्टीकोन ठेवून संघ नावाचे हे इवलेसे रोप लावले. असंख्य कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमातून त्याचा वेलू आज गगनावर गेलेला दिसून येतो. संघाला अनेक समस्यांशी संघर्ष करावा लागला. अनेक अडचणीतून जावे लागले, परंतु विचाराचे पारदर्शक दिव्यत्व आणि कार्यकर्त्यांची अविचल निष्ठा या दोन गुणांमुळे संघ वर्धिष्णू होत गेला. संघ विचारातील सत्यता समाजात हळूहळू रुजत गेली. संघाची स्थापना झाली त्यावेळेपासूनच संघ समाजसेवेशी संबंधित राहिला आहे. १९८० च्या दशकापासून संघाच्या विस्तारवाढीच्या योजनांमध्ये वेगवेगळे सामाजिक कार्याला वाहून घेतलेले विभाग सुरु झाले. सुरुवातीला सेवा विभाग आणि कालांतराने ग्रामविकासात लोकांचा सहभाग वाढवणे आणि त्यातून गावाचा सर्वांगीण विकास साधणेयासाठी ग्रामविकास विभाग सुरु झाला. आज या ग्रामविकास विभागाचे कार्य भारतभर पसरले आहे. शेकडो गावांमध्ये ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून काम सुरु आहे. चालू झालेले हे कार्य सुयोग्य पद्धतीने आणि अपेक्षित परिणाम साधणारे व्हावे याकरता कार्यकर्त्यांसाठी एखाद्या छोट्या मार्गदर्शक पुस्तिकेची गरज होती. आणि त्यातून या पुस्तिकेची निर्मिती करावी असा विचार पुढे आला.

या पुस्तिकेमध्ये संघाच्या ग्रामविकास विभागाची भूमिका, कार्यपद्धती, महाराष्ट्रातील काही प्रगतीशील गावांची माहिती आणि गावातील कार्यकर्त्यांना त्यांच्या कामात उपयुक्त ठरतील अशा काही संस्थांची सूची देण्यात आली आहे.प्रामुख्याने ग्रामविकास विभागाच्या प्रवासी कार्यकर्त्यांना आणि गाव पातळीवर लोक-सहभाग वाढवण्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना समोर ठेवून या पुस्तिकेचे लिखाण करण्यात आले आहे. ग्रामविकास क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांनाच या पुस्तिकेचा उपयोग होईल अशी आम्हाला आशा आहे. या पुस्तिकेचे निर्माण करताना अनेक कार्यकर्त्यांनी जी मोलाची मदत केली त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद!

***

# २. या पुस्तिकेचा उपयोग कसा करावा ?

ही पुस्तिका प्रामुख्याने ग्रामविकास विभागाच्या रचनेतील प्रवासी कार्यकर्ते आणि गाव पातळीवर काम करणारे ग्रामसमितीमधील कार्यकर्ते यांच्यासाठी तयार करण्यात आली आहे. पुस्तिकेतील प्रत्येक प्रकरण आपल्या ग्रामविकास कार्यातील एक विशिष्ट भाग डोळ्यासमोर ठेवून लिहिण्यात आले आहे. हे सर्व समजून घेण्यासाठी खालील तक्त्याचा वापर करावा.

| प्रकरण तपशील | ग्रामविकास विभाग : प्रवासी कार्यकर्ते | ग्रामसमिती मधील कार्यकर्ते |
|---|---|---|
| ग्रामविकास– पार्श्वभूमी | अशा प्रकारची मांडणी आपण गावागावात जाऊन करणे अपेक्षित आहे, त्यामुळे ही मांडणी वारंवार नियमित वाचन करून नीट समजून घेणे. आपल्या विभाग संयोजकाला संपर्क करून या संकल्पने संदर्भातील काही उपयुक्त ध्वनिफीत घेवून त्या ऐकणे व त्याचा उपयोग आपली मांडणी प्रभावी होण्यासाठी करणे. | आपल्या गावात गेल्या ४०–५० वर्षात शेती, पाणी, पशुधन, जंगल इ. मध्ये काय बदल झाले हे गावातील ज्येष्ठ लोकांशी चर्चा करून समजून घेणे. यात जसा साधारण भारताचा गेल्या १५०–२०० वर्षाचा इतिहास दिला आहे. त्याप्रमाणे आपल्या गावाच्या इतिहासाबद्दल चर्चा करणे आणि महत्वाचे बदल लिहून काढणे. |
| शाश्वत ग्रामविकास: काळाची गरज | शाश्वत ग्रामविकास संकल्पना समजून घ्यावी, गेल्या काही काळात गावात जो बदल झालाय त्याला विकास म्हणता येईल का? जर विकास शाश्वत नसेल तर | गावातील लोकांशी छोट्या ७–८ जणांच्या गटात गावातील गेल्या ३०–४० वर्षातील बदल, शासकीय आणि इतर विकास प्रकल्प, योजना याला शाश्वत विकास म्हणता येईल |

| प्रकरण तपशील | ग्रामविकास विभाग : प्रवासी कार्यकर्ते | ग्रामसमिती मधील कार्यकर्ते |
|---|---|---|
| | आपल्याला आत्ताच्या व्यवस्थेत काय बदल करावे लागतील याचीदेखील चर्चा करणे. गावाला गेल्या ३०-४० वर्षातील विकासाचे विश्लेषण करण्यात मार्गदर्शन करणे. | का? जर होय असे वाटत असेल तर गावातील सर्वजण सुखी-समाधानी आहेत का? अशा मुद्द्यांवर चर्चा करून मुख्य मुद्दे लिहून काढणे. |
| ग्रामविकास विभाग: रचना | आपल्या माहितीसाठी ही रचना दिली आहे, ही साधारण रचना आहे. त्या त्या प्रांतामध्ये यात स्थानिक गरजेप्रमाणे थोडे बदल असू शकतात. आपण ज्या ग्रामविकास विभागात काम करत आहात त्याची रचना आपल्याला समजावी एवढाच हेतू आहे. | गावात विविध ग्रामविकास कार्यकर्ते प्रवास करतात, तर या विभागाची साधारण रचना कशी आहे आणि येणारे कार्यकर्ते कोणत्या स्तरावर काम करतात हे समजावे एवढाच हेतू आहे. |
| सप्त-संपदा आणि पंचशक्ती | हा आपल्या ग्रामविकास संकल्पनेचा गाभा आहे. हे प्रकरण नीट समजून त्याप्रमाणे गावातील बैठकीत मांडणी करणे. आप-आपल्या गावात या संपदांची स्थिती जाणून घेण्यासाठी गावातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे. | आपल्या गावातील सप्त-संपदांची पूर्वीची स्थिती आणि सद्य-स्थिती काय आहे हे समजून घेणे आणि गावात सशक्त संघटन उभे राहण्यासाठी पंचशक्तींचा आधार घेवून गावात कार्यकर्त्यांची फळी निर्माण करणे. |
| किरण-उदय-प्रभात ग्राम-संकल्पना | ग्रामविकासात आपले गाव नक्की कोणत्या टप्प्यावर आहे याचे सतत स्व-मुल्यांकन करण्यासाठी ग्रामसमितीला मार्गदर्शन करणे. | आपले गाव ग्रामविकासाच्या कोणत्या टप्प्यावर आहे आणि पुढे जाण्यासाठी काय करणे गरजेचे आहे हे समजून घेणे. त्यासाठी या |

| प्रकरण तपशील | ग्रामविकास विभाग : प्रवासी कार्यकर्ते | ग्रामसमिती मधील कार्यकर्ते |
|---|---|---|
| | आपण सकारात्मक पद्धतीने पुढे जात आहोत / आहे तिथेच आहोत / कि मागे जात आहोत याची समज ग्रामसमिती मध्ये निर्माण करणे. | प्रकरणात जे निकष दिले आहेत त्याचे वाचन करून नीट समजून घेणे, गावाचे स्व-मुल्यांकन नियमितपणे करत राहणे. |
| ग्रामविकास समिती: कार्यपद्धती | आपल्या जिल्ह्यात गावे निवडताना हे निकष पाळणे. आपल्या प्रवासामध्ये त्या गावातील ग्रामविकास समिती कसे काम करत आहे हे समजून घेणे. त्यांच्या मासिक बैठकीत सहभागी होणे. त्यांना योग्य पद्धतीने पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन करणे. | आपल्या गावात ग्रामसमिती मध्ये निवड करताना या गोष्टींची काळजी घेणे. यात दिल्याप्रमाणे गावाचा अभ्यास-समस्या निर्धारण-... इ. पद्धतीने लोक-सहभागातून गावातील प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत राहणे. |
| ग्रामविकास सूत्र: पू. सरसंघचालक मोहनजी भागवत | गाव म्हणजे नक्की काय, विकास कशाला म्हणायचे अशा मुलभूत प्रश्नांपासून ते कार्यकर्त्यांनी गावात काम करताना कोणते संकेत पाळले पाहिजेत, कसे वागले पाहिजे हे समजून घेण्यासाठी याचे वारंवार वाचन करणे. | गावात काम करताना अनंत अडचणी येतात. राजकारण, गट-तट यातून बऱ्याच वेळा नैराश्य येते, तेंव्हा आपला उत्साह टिकवून ठेवण्यासाठी आणि त्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी यात सुचवलेल्या गोष्टी आचरणात आणणे. |
| सप्त-संपदा: सविस्तर माहिती | सप्त-संपदा या संकल्पनेचे सखोल ज्ञान होण्यासाठी या माहितीचा वापर करणे. गावात ग्रामविकास मांडणी करताना यांचे जीवनातील महत्व अधोरेखित करणे. यांचा विकास | आपल्या गावातील सप्त-संपदांची सखोल माहिती संकलित करणे. ग्रामसमितीच्या प्रत्येक बैठकीत एक संपदा घेवून त्यावरील लेखाचे सामुहिक वाचन करणे,त्या संपदेची |

| प्रकरण तपशील | ग्रामविकास विभाग : प्रवासी कार्यकर्ते | ग्रामसमिती मधील कार्यकर्ते |
|---|---|---|
| | म्हणजेच गावाचा शाश्वत विकास कसा आहे हे समजून सांगणे. | आपल्या गावातील स्थिती नीट समजून घेणे आणि त्याच्या नोंदी करणे. |
| ग्रामसमितीसाठी महत्वाचे उपक्रम | गावात ग्रामविकासाचे प्रत्यक्ष काम सुरु करण्यासाठी या उपक्रमांचा उद्देश समजून घेवून त्याप्रमाणे तो राबवणे. यासाठी समितीला मार्गदर्शन करणे. त्यांना तांत्रिक मार्गदर्शन आवश्यक असेल तर त्या क्षेत्रातील संस्थेशी / तज्ञ व्यक्तीशी जोडणी करून देणे. | आपल्या गावातील विकासाचा प्राधान्यक्रम ठरवून ज्या बिंदूवर प्रथम काम करणे आवश्यक आणि शक्य आहे, असा बिंदू निवडून त्यासमोर दिलेले उपक्रम लोक-सहभागातून राबवण्याचा प्रयत्न करणे. उपक्रमाला आलेल्या यश/अपयशातून विचलित न होता सातत्याने उपक्रम करत राहणे. |
| ग्रामविकास: कार्यकर्ता विचारधन | स्वच्छता, महिला-शक्ती आणि समरसता अशा अत्यंत कळीच्या मुद्द्यांवर इथे मार्गदर्शन केले आहे. गावातील कार्यकर्त्यांनी यातील सूचना लक्षात घेवून तसे काम आपल्या गावात उभे करावे यासाठी मार्गदर्शन करणे. | स्वच्छता आणि श्रमसंस्कार हा कुठल्याही गावातील ग्रामसमिती आणि कार्यकर्ते सक्रीय असल्याचा पुरावा असतो. आपल्या गावात असे उपक्रम नियमितपणे होतील यासाठी विशेष प्रयत्न करणे. या उपक्रमातून गावातील सज्जन-शक्ती ओळखणे आणि त्यांना आपल्या कामात जोडून घेणे. |
| महाराष्ट्रातील प्रगतीशील गावे | आपल्या ग्रामविकास संकल्पनेचे मूर्तिमंत स्वरूप या गावात आपल्याला पाहायला मिळेल. या | यातील ज्या गावांना भेटी देणे शक्य आहे तिथे गावातील १५-२० जणांचा संच घेवून प्रेरणा-प्रवास |

| प्रकरण तपशील | ग्रामविकास विभाग : प्रवासी कार्यकर्ते | ग्रामसमिती मधील कार्यकर्ते |
|---|---|---|
| | ठिकाणांना जरूर भेट देवून त्या गावाची विकास–यात्रा आणि काम नीट समजून घेणे. त्यातून आपले ज्ञान आणि विचार आणखी प्रगल्भ होतील आणि गावात मार्गदर्शन करताना त्याचा उपयोग होईल. | करणे. एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहण्याचा परिणाम हा ऐकण्या / वाचण्या पेक्षा जास्त प्रभावी असतो. अशी आणखीन काही उदाहरणे आपल्या तालुका / जिल्हा कार्यकर्त्यांना विचारून घेणे आणि तिथे प्रवास करणे.. |
| परिशिष्ट १: तांत्रिक सहकार्य संस्था सूची | गावात काम करताना बऱ्याच वेळा तांत्रिक मार्गदर्शनाची गरज भासते, अशा वेळी या संस्थांना संपर्क करण्यात आणि जोडून देण्यात समितीला मदत करणे. अशा आणखीन काही स्थानिक संस्था शोधून आपली एक स्वतंत्र यादी तयार करणे. | गावातील समस्या सोडवताना तांत्रिक मदत हवी असेल तर या सूचीचा वापर करणे. आपल्या जिल्ह्यातील अन्य संस्थांचा शोध घेणे. तांत्रिक मदत घेवून केलेली कामे यशस्वी होण्याची शक्यता जास्त असते हे लक्षात घेणे. |
| परिशिष्ट २: ग्रामविकास विभाग–संपर्क सूची | ग्रामविकास संदर्भात काही शंका किंवा अधिक माहिती हवी असल्यास या सूचीचा वापर करणे | आपल्या प्रांतातील विभाग किंवा प्रांत स्तरातील कार्यकर्त्यांची माहिती घेण्यासाठी याचा वापर करणे. |
| परिशिष्ट ३: ग्राम–अध्ययन फॉर्म | ग्रामविकास समितीला आपल्या गावाचा प्राथमिक अभ्यास करून गावाचे आकलन चांगल्या पद्धतीने होण्यासाठी हा फॉर्म दिला आहे. हा फॉर्म अपेक्षित पद्धतीने भरण्यासाठी | ग्रामसमिती गठीत झाल्यानंतर आपल्या गावाचा अभ्यास करण्यासाठी या फॉर्मचा वापर करणे, यातून आपले गावाबद्दल एक प्राथमिक आकलन होईल आणि |

| प्रकरण तपशील | ग्रामविकास विभाग : प्रवासी कार्यकर्ते | ग्रामसमिती मधील कार्यकर्ते |
|---|---|---|
| | ग्रामसमितीला मार्गदर्शन करणे. | समस्या निर्धारण करण्यासाठी मदत होईल. फॉर्म भरून झाल्यानंतर समितीच्या रजिस्टर मध्ये नीट फाईल करून ठेवणे. |
| परिशिष्ट ४: ग्रामविकास गीते | ग्रामविकास बैठकींमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये आपण नेहमीच पद्य घेत असतो, त्यासाठी इथे काही ग्रामविकास विषयातील पद्ये दिली आहेत. त्याच्या चाली समजून घेण्यासाठी विभाग संयोजकाकडून ध्वनिफीत घेणे. | आपल्या इथे प्रवास करणाऱ्या कार्यकर्त्याकडून या पद्यांच्या ध्वनिफीत घेणे आणि त्या ऐकून चाली समजून घेणे. समितीच्या बैठकांत आणि कार्यक्रमात या गीतांचे समूह–गायन करणे. |
| परिशिष्ट ५: अधिक माहितीसाठी संदर्भ | ग्रामविकास विषयातील आपले ज्ञान आणखीन वाढवण्यासाठी इथे दिलेली पुस्तके वाचणे. इथे काही Youtube वरील लिंक्स सुद्धा दिल्या आहेत, तिथे असलेले व्हिडीओ पाहणे. याचा उपयोग आपल्याला विषयाची मांडणी करताना नक्की होईल. | ग्रामसमिती मध्ये जर कोणी अध्ययन किंवा चांगले वाचन करणारी व्यक्ती असेल तर त्या व्यक्तीला ही पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. आणि त्या व्यक्तीने ती वाचून त्यातील अनुभव सर्वांसमोर मांडणे. गावात इंटरनेट असेल तर Youtube व्हिडीओ पाहणे |

# ३. ग्रामविकास - पार्श्वभूमी

सुमारे १००० वर्षापूर्वीपर्यंत आपला भारत देश जगातील समृद्ध, सुखी आणि समाधानी देश म्हणून ओळखला जात असे, भारताचे चिरंतन सुखाचा धागा असलेले तत्वज्ञान, अध्यात्मज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी जगातील लक्षावधी लोक भारतात येत असत व 'सोन्याचा धूर ' निघणाऱ्या या देशातून तृप्त होऊन जात असत. त्याकाळी जगातील एकूण व्यापाराच्या किमान ३०% वाटा हा भारताचा होता आणि भारत ही जगातील आदर्श महासत्ता होती. इतर देशांशी व्यापार करताना मोबदला म्हणून आपल्याला आणण्यासारखे मुख्यत: फक्त सोने असे, म्हणूनच बाहेरच्या देशात भारतीय मालाची विक्री करून व्यापारी सोने घेवून येत. अशा रीतीने देशात सोन्याचे प्रमाण प्रचंड वाढले, त्यातून 'सोन्याचा धूर' हा वाक्प्रयोग प्रचलित झाला होता. त्या काळा पर्यंत भारताची संपूर्ण सामाजिक व आर्थिक व्यवस्था ही ग्राम केंद्रित होती. सर्वच दृष्टीने संपन्न अशी छोटी छोटी लाखो स्वावलंबी गावे हा भारताचा आत्मा होता.

आजही देशातील ६५–७०% लोक ग्रामीण भागात राहतात. पण आज शहरी आणि ग्रामीण भागात विकासाचा जो असमतोल दिसत आहे त्याची कारणे समजून घेण्यासाठी आपल्याला गेल्या १५०–२०० वर्षांचा इतिहास नीट समजून घेतला पाहिजे. इंग्रजांनी जेंव्हा भारतावर राज्य करायला सुरुवात केली तेंव्हा काय स्थिती होती, नंतर १५० वर्षे त्यांनी आपल्या देशावर राज्य केले त्या काळात काय बदल झाले आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काय विकास झाला. याचा सविस्तर आढावा आपल्याला घ्यावा लागेल. हा सर्व इतिहास अत्यंत संक्षिप्त स्वरुपात मांडण्याचा खाली प्रयत्न केला आहे.

**भारतीय गावांची स्थिती – इंग्रज राजवट येण्या पूर्वी:**

- इंग्रज राजवट येण्याआधी भारतीय ग्रामीण व्यवस्था स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी होती.भारत हा शेती आणि उद्योग प्रधान देश होता. अनेक प्रकारचे प्रगत तंत्रज्ञान आणि उद्योग–धंदे देशात अस्तित्वात होते.

- गावामध्ये सर्व प्रकारचे लोक गुण्यागोविंदाने नांदत असत. गावाच्या बहुतांश गरजा गावातच आणि राहिलेल्या गरजा पंचक्रोषित (आसपासच्या परिसरात) पूर्ण होत असत. सर्व प्रकारचे प्रगत, निर्यातक्षम व्यवसाय गावात असत. जातीपाती व्यवसायावरून ठरवल्या जात. सर्वच जाती परस्परावलंबी होत्या आणि त्यांना समाजात मानाचे स्थान होते. त्यामुळे त्यांच्यात आपसात जातीद्वेष नव्हता. आपसात वस्तू व श्रम विनिमय होत होता. प्रत्येक व्यवसायाला विशिष्ट महत्व होते.
- गावात आपल्याला दैनंदिन जीवनात लागणारी पिके – तांदूळ, गहू, बाजरी, ज्वारी,डाळी, भाजीपाला घेण्यात येत असत, त्यातून गावाची अन्न–धान्याची गरज भागत असे. काही माल किंवा वस्तू शेजारच्या गावातून घेतल्या जात असत आणि त्या बदल्यात त्यांना काही वस्तू देण्यात येत असत अशी परस्परांना पूरक व्यवस्था होती, त्याकाळी त्यांना मोठ्या नगरात जायची गरज क़्वचित भासत असे. कुटुंबातील सर्वजण एकत्र येवून शेती करत असत आणि गावातील लोकही एकमेकांना शेतीच्या कामात मदत करत असत, त्यामुळे बाहेरच्या मजुरांची गरज पडत नव्हती. यातून एकमेकांशी असलेले संबंध दृढ होण्यास मदत होत असे आणि शेतीची कामे विनासायास होत असत.
- ज्याला जे जे शिक्षण आवश्यक होते ते अत्यंत उच्च दर्जाचे मिळविण्याची व्यवस्था गावातील मंदिर, गुरुकुल, गुरूगृह, अनौपचारिक शाळा, महाविद्यालयात असे. गावचा कारभार चालविण्यासाठी समाजातील वेगवेगळ्या व्यवसायातील निस्वार्थी व लोकसेवेसाठी तत्पर अशी पंच मंडळी असत. त्यांच्या व्यवहारामुळेच त्यांना लोक ''पंच परमेश्वर'' म्हणत.मुलांना गुरुकुल पद्धतीने शिक्षण देण्यात येत असे त्यामुळे मुलं संस्कारक्षम होती, घरात आई–वडिलांना आणि गावात वृद्धांना मान दिला जाई, मुलींना व महिलांना आदराने वागवले जात असे.
- शिक्षण पद्धती ही जीवन आणि मूल्य आधारित होती, तिच्यात शेती आणि उद्योगाचा अंतर्भाव होता, त्यामुळे मुलांना लहान पणापासून शेतीची आवड निर्माण होत असे आणि तोच तेंव्हा उपजीविकेचा प्रमुख मार्ग होता. शेती ही नैसर्गिक पद्धतीने होत होती, आत्ताच्या सारखी रासायनिक खते आणि महागड्या बियाणांची गरज नव्हती. गावात जनावरे असत, दुध–दुभते होते, शेतीत मशागतीसाठी बैलांचा आणि खत म्हणून शेणाचाच वापर होत असे. शेतातील काडी–कचरा शेतातच कुजवण्याची पद्धत होती.अशा पद्धतीचे दाखले अनेक प्राचीन पुस्तकात मिळतात.
- गावात भजन–कीर्तन अगदी नियमित होत असे, त्यातून गावातली मंडळी मोकळ्या वेळेत ईश्वर चिंतनात दंग होत असत, त्यांचा मोकळा वेळ चांगल्या पद्धतीने जात असे. वर्षाला २–३ मोठ्या

यात्रा असत, ज्याला आसपासची पंचक्रोशीतील मंडळी येत असत, त्यातून सांस्कृतिक, वैचारिक आणि आर्थिक देवाण घेवाण होत असे, स्थानिक उदयोगांना चालना मिळत असे

- मोठ–मोठी हॉस्पिटल नव्हती पण गावातील वैद्य आयुर्वेद आणि स्थानिक जंगलातून मिळणाऱ्या औषधी वनस्पती देवून माणसांचे आणि जनावरांचे बरेचसे आजार बरे करत असत,गावात आठवड्याला / महिन्याला मोठा बाजार भरत असे, सर्व सण उत्साहाने आणि आपल्या सर्व कुटुंबीय आणि गावकऱ्यांबरोबर साजरे होत असत.
- आपल्या संस्कृतीत गावातील नैसर्गिक साधन संपत्तीला देवी–देवतांचा दर्जा दिला गेला आहे, त्यामुळे नदीचे, भूमीचे, जंगलाचे आणि पिकांचे पूजन व्हायचे – त्यातून त्यांचे संवर्धन होत असे. या परंपरांमुळे लोकांना गरजे पुरतेच निसर्गातून घेण्याची सवय होती. आपल्या बरोबर निसर्गातील इतर प्राणीमात्रांचा देखील या हवा, पाणी, शेती आणि जंगलावर आपल्या इतकाच अधिकार आहे अशी भावना लोकांमध्ये दृढ होती. शिवारातील नैसर्गिक साधन संपत्तीवर संपुर्ण गावाची मालकी असे. गायरान, वनराई, देवराई, तलाव, डोंगर, टेकडया इत्यादी सर्व गावाच्या मालकीच्या असत. संपूर्ण गाव त्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी तत्पर असे.
- नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनासाठी विविध नियम असत. ते नियम मोडणारयास कठोर शिक्षा होत असे,गावातील सर्व प्रकारचा महसूल एकत्र करून त्यातील काही भाग राजाला पाठवला जात असे. गावाला उत्पन्नावर आधारित आणि सामूहिक शेतसारा असे. वैयक्तिक सारा घेतला जात नसे. या सर्व व्यवस्थेमुळे राजाचा,राज्यव्यवस्थेचा गावाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप खूप कमी होत असे. म्हणूनच त्याकाळी गावांमध्ये 'हो कोई भी भूप (राजा), हमे क्या हानी' असा वाक्प्रचार चालत असे.
- निसर्गातील प्रत्येक गोष्टीचा वापर गरजेपुरता करण्याची शिकवण आणि परंपरा होती – यामध्ये प्रामुख्याने जमीन, पाणी, जंगल आणि पशुधन यांचा समावेश होता. यांना गावाची खरी संपत्ती समजत असत. त्यातूनच आपल्याकडे गो–धन सारखे शब्द प्रचलित झाले. तेंव्हा गावात जर नवीन तलाव किंवा विहीर घ्यायची असेल तर कामे श्रमदानातून होत असत – तेंव्हाचे लोक जलयुक्त शिवार किंवा इतर सरकारी योजना यांची वाट पाहत नसत, असे हजारो तलाव त्याकाळी संपूर्ण भारतात अस्तित्वात होते.
- असे पिढ्यान–पिढ्या चालत होते, त्यांना दिल्ली मध्ये कुठल्या राजाची सत्ता आहे याने फारसा फरक पडत नव्हता. अर्थात आपल्यावर जेवढी आक्रमणे झाली त्यांनी आपल्या भारतीय जनतेला भरपूर त्रास दिला आणि आर्थिक, सामाजिक शोषण झाले. पण ग्रामीण सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेला धक्का लागला नाही. अशी बळकट व्यवस्था असल्यामुळे भारतावर

इतकी आक्रमणे होऊनही आपली ग्रामीण जीवन व्यवस्था टिकून राहिली.

- गावातील बहुतेक माणसे सुखी आणि समाधानी होती आणि मुख्य म्हणजे गावातले प्रश्न गावातल्याच लोकांनी एकत्र येवून सोडवण्याची पद्धत होती, आणि त्या अर्थाने गावे स्वावलंबी होती.

### इंग्रज राजवट आणि स्वातंत्र्या नंतर ची परिस्थती

- मुस्लीम आमदनीतही जवळपास हीच पद्धत होती परंतु इंग्रजांच्या कुटील नीतीने ही ग्राम आधारित, विकेंद्रीत अर्थव्यवस्था, शिक्षणव्यवस्था संपवून उध्वस्त करून टाकली. इंग्रजांनी येथील गावागावांमधील लाखो गुरुकुले बेकायदेशीर ठरवून बंद पाडली व 'काळे इंग्रज' तयार करण्यासाठी मेकॉले शिक्षण पद्धतीनुसार इंग्रजी माध्यमाच्या शाळा /कॉन्वेंट सुरु केल्या. असे शिक्षण घेवून बाहेर पडणारे बहुतेक भारतीय तरुण हे फक्त नोकरीचा विचार करू लागले, इंग्रजांना ही तेच हवं होतं, त्यांना कळून चुकलं होतं कि जो पर्यंत इथली शैक्षणिक आणि सांस्कृतिक व्यवस्था आहे, तो पर्यंत भारत सुरक्षित आहे.
- त्यांनी इंग्लंड मधील उद्योगांना लागणारा कच्चा माल स्वस्त दरात मिळावा म्हणून शेतकऱ्यांना त्यांना हवी ती पिके घ्यायला भाग पाडलं, प्रसंगी अत्याचार आणि जबरदस्ती केली. दुसऱ्या बाजूला इंग्लंड मधील उत्पादनाला इथे बाजारपेठ मिळावी म्हणून स्थानिक उद्योग कसे बंद होतील याच्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले, भारतातील कापूस शेतकऱ्यांकडून कवडीमोल भावाने घेवून इंग्लंड ला रवाना केला व त्याच कापसाच्या कापडाला भारतात मोठी बाजारपेठ निर्माण केली, आपणा सर्वांना त्या काळातले विदेशी कपड्या विरूद्धचे आंदोलन चांगले माहित आहे.
- याच काळात इंग्रजांनी 'सरकार' ही एक नवीन व्यवस्था देशावर लादली, सरकारने सर्व नैसर्गिक साधन संपत्ती जी आधी गावाच्या किंवा स्थानिक लोकांच्या अखत्यारीत असायची त्याची मालकी स्वतःकडे घेतली. इंग्रजांनी भारत देश उभा – आडवा पहिल्यांदा मोजला, त्याच्यातून गुंठेवारी – सर्व्हे नंबर आले, जमीन आणि जंगले सरकारची झाली, त्यात शेकडो वर्षे जमीन कसणारा आणि जंगलावर गुजराण करणारा स्थानिक भारतीय माणूस गुन्हेगार ठरायला लागला. वर्षानुवर्षे चालत आलेली स्थानिक नैसर्गिक साधन–संपत्तीची पारंपारिक व्यवस्थापन पद्धती संपुष्टात आली.
- शेतकऱ्यांसाठी जमिनींवर प्रचंड शेतसारे, कर लावले व तो भरणा वैयक्तिक स्वरुपात वसूल करण्यात येऊ लागला व त्याच्या वसुलीसाठी इंग्रजांनी गावागावात मोठ्या जमीनदारांना हाताशी

धरून सावकारी पाश सर्वसामान्य जनतेवर लादला.शेतकऱ्यांवर कापूस, नीळ अशी ठराविक पीके पिकवण्याची सक्ती करण्यात येऊ लागली. इंग्रजांनी येथील गावागावात चालणारे अत्यंत उच्च प्रतीचे उत्पादन करणारे हजारो कुटीरौद्योग बंद पाडले. ढाक्याची मलमल तयार करणाऱ्या अनेक कारागिरांचे तर अक्षरशः अंगठे तोडले.

- या सर्व परिस्थितीचा व प्राचीन भारतीय व्यवस्थांचा सखोल अभ्यास म. गांधीनी केला होता व म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्यानंतर 'खेड्यांकडे चला', गावांच्या विकासातूंच देशाचा विकास होईल अशा प्रकारचा संदेश दिला.परंतु देशाचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे संपूर्ण शिक्षण इंग्लंड मध्ये झालेले होते. त्यांच्या डोळ्यावर पाश्च्यात्य विकासनीतीचा चष्मा होता. त्यांनी आपल्या देशाला ग्रामाधारित, कृषीआधारित, बहुरोजगारयुक्त, विकेंद्रित अर्थव्यवस्थेकडे नेण्याऐवजी एकांगी यांत्रीकीकरण, औद्योगीकरण, शहरीकरण अशा पाश्यात्य विकास पथावर नेले. शेतीकडे, शेतकऱ्यांकडे, खेड्यांकडे सरकारचे पूर्ण दुर्लक्ष झाले. गावागावात छोटे बांध–बंधारे बांधण्याऐवजी मोठमोठी धरणे निर्माण केली गेली ज्यांचे पाणी फारच थोड्या शेतकऱ्यांच्या शेतीला मिळाले.
- औद्योगीकरणच्या एकांगी नीतीमुळे शहरांत मोठमोठे उदयोग सुरु झाले व काम करण्यासाठी शेतकऱ्यांच्या मुलांचे लोंढे च्या लोंढे शहरांकडे जाऊ लागले. शहरे लोकांनी व पर्यायाने समस्यांनी फुगू लागली. खेडी ओस पडू लागली.केवळ शहरांमध्ये मोठ–मोठे उद्योग आणि कारखाने उभारण्या बरोबरच जर चीन प्रमाणे मोठ्या यंत्रांचे सुटे भाग गावा–गावातील लोकांकडून तयार करून घेतले असते आणि गावातील छोट्या उद्योगांचे जाळे विणले गेले असते तर गावातच शेतीबरोबर रोजगार उपलब्ध झाला असता व गावातून होणारे स्थलांतर थांबले असते.
- १९४७ ला देश स्वतंत्र झाला पण स्वातंत्र्योत्तर काळातही सरकारने इंग्रजांनी केलेले बरेचसे कायदे आणि मुख्य म्हणजे त्यांची शिक्षण पद्धती तशीच सुरु ठेवली. इंग्रजीत शिक्षण घेण्याचे आणि पोटा पाण्याकरता नोकरीचे प्रमाण प्रचंड वाढले. त्यातून शिकेलेला तरुण हा शेतीपासून दूर होत गेला आणि याचा परिणाम स्थलांतर आणि वाढते शहरीकरण असा झाला.
- पूर्वीचे उत्तम शेती–मध्यम व्यापार–कनिष्ठ नोकरी हे तत्व बदलून उलट झाले. सरकारचे व लोकांचे शेतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शेती उत्पादन कमी झाले, अन्न–धान्य आयातीसाठी देशाचा अर्धा खजिना रिता व्हायला लागला. त्यातूनच ७० च्या दशकामध्ये हरित क्रांतीचा मार्ग निवडावा लागला, मग संकरीत बियाणे आणि त्यासाठी रासायनिक खते यांचा वापर सुरु झाला. शेतीतील अनावश्यक यांत्रिकी करणामुळे आणि दूध उत्पादनाच्या हव्यासापोटी संकरित गायींच्या

प्रसारामुळे देशी जातीच्यागाय–बैलांची संख्या प्रचंड कमी झाली.

- सुरुवातीला उत्पन्न देखील भरपूर मिळालं, पण यातूनच आपली पारंपारिक शेती पद्धती (तृणधान्य, डाळी, तेलबिया, मिश्र पिके) मागे पडली, शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यापारी झाला. सर्व शास्त्रज्ञ आणि सरकारी यंत्रणा फक्त 'उत्पादन' या एकाच गोष्टीचा विचार करू लागली. यातून जमिनीची सुपीकता आणि शेतमालाची गुणवत्ता (रंग, चव, पौष्टिकता) घसरली, जमीन कडक झाली आणि तिची पाणी धारण क्षमता कमी झाली. नवीन संकरीत जातींचा कडबा कमी आणि जनावरांच्या आरोग्यालाही पोषक नव्हता. नवनवीन किडींचा प्रादुर्भाव वाढला. विदेशी कंपन्यांची संकरीत बियाणं, रासायनिक खतं, फवारण्या, गरज नसलेले यांत्रिकीकरण, त्यासाठी अनुदान आणि कर्ज यांच्या विळख्यात सामान्य शेतकरी सापडला.
- यातून भारतात एक मोठी शेती आधारित अर्थ व्यवस्था (बियाणे–खते–औषधे–यंत्रे यांचे मार्केट) आकाराला आली, याचा फायदा मात्र मोठ्या विदेशी आणि देशी कंपन्यांना झाला, बियाणे–खते यांची दुकाने चालवणारे श्रीमंत झाले आणि सामान्य शेतकरी मात्र कर्जाच्या बोजाखाली गाडला गेला. हरित क्रांतीच्या काळात अग्रणी असलेल्या पंजाब–हरयाणा मध्ये आज रासायनिक शेतीचे दुष्परिणाम इतके भयानक दिसत आहेत कि पंजाब मध्ये एका ट्रेन ला कॅन्सर ट्रेन असे नाव दिले आहे कारण त्यातून शेकडो कॅन्सर रुग्ण इलाज करण्या करता मोठ्या शहरांकडे प्रवास करतात.
- दुषित अन्न खाऊन लोकांची प्रतिकार शक्ती कमी झाली आहे, मधुमेह आणि रक्तदाब यासारख्या आजारांचे प्रमाण फक्त शहरात नाही तर गावाकडेही वाढले आहे. रासायनिक खतांच्या अती–वापरामुळे आणि विषारी फवारण्या केल्यामुळे आपले पाणी आणि जमीन देखील विषयुक्त झाले आहे कि त्याला शुद्ध केल्याशिवाय आता पर्यायच नाही
- सरकारने शेतमालाच्या विक्रीकरता आवश्यक विकेंद्रित व्यवस्था न उभारल्यामुळे मधल्या दलालांनी शेतकऱ्यांचे शोषण केले, महागाई वाढली पण शेतमालाचे भाव जे शेतकऱ्याला मिळायला पाहिजेत ते फारसे वाढले नाहीत. प्रत्येक पिढीमध्ये शेतजमिनीची वाटणी होत गेली, शेतीचे छोटे छोटे तुकडे पडले. मग लोकांचे त्याच्यावर जगणे अशक्य झाले, आणि शेतकरी गाव सोडून बाहेर पडू लागला, शहराकडे येऊ लागला.
- हवामान बदलाचा पावसावर परिणाम झाला आहे, काही वर्षांचा अपवाद वगळता पडणारा पाऊस जरी तेवढाच असला, तरी पावसाचे दिवस कमी झाले आहेत. दोन पावसाच्या मधील कोरडा काळ वाढला आहे, यामूळे पिकांवर ताण येतो, बऱ्याचदा पेरणी २ वेळा करावी लागते आणि शेतीचे पुढचे सारे गणित बिघडते.अशा बेभरवशी शेती मुळे लोकांचा नोकरी करण्याकडे आणि

त्यासाठी शहराकडे जाण्याचा कल वाढला आहे.

- दुसऱ्या बाजूला टीव्ही च्या वाढत्या प्रभावामुळे सगळ्या शहरी उत्पादनांच्या जाहिराती थेट गावांपर्यंत पोचल्या, आपल्याला गरज नसलेल्या गोष्टी गरजेच्या वाटू लागल्या, घरात शौचालय नाही पण दुचाकी हवी अशी विचार सरणी वाढीस लागली. घराघरात दूरदर्शन व मोबाइलच्या माध्यमातून झालेले सांस्कृतिक आक्रमण, कौटुंबिक समस्या, नकारात्मक,हिंसात्मक विचार यामुळे लोकमानस स्वार्थी व संकुचित झाला.
- एका बाजूला रस्ते आणि दळण–वळणाची साधने निर्माण झाली, शहरे आणि गावातील अंतर कमी झाले पण दरी मात्र वाढत गेली. आर्थिक विषमता आज पराकोटीला पोचली. शहरात काम करायला गेलेला एखादा तरुण गावात आला कि रंगीबेरंगी आधुनिक कपडे, इलेक्ट्रोनिक वस्तू आणिशहरी संस्कृती अशा गोष्टी घेवून परतू लागला, गावात येवून तो शहराबद्दल चांगलं चित्र रंगवू लागला, यातून शहराचे आकर्षण वाढत गेले.
- गावातील घराघरात टीव्ही मालिका, केबल, सिनेमे यांच्यामुळे गावातल्या लोकांचे शहराबद्दलचे आकर्षण वाढत गेले आणि आता तर मोबाईल मुले संपूर्ण जगच एकदम जवळ आले आहे, त्यातून थोड्या प्रमाणात सकारात्मक आणि जास्ती प्रमाणात नकारात्मक माहिती लोकांना घरबसल्या मिळू लागली आहे
- या सगळ्या घडामोडीत सरकारकडून तथाकथित विकास घडवण्यासाठी बरेच प्रयत्न केले गेले, गावात राबवण्यासाठी बऱ्याच सामुहिक आणि वैयक्तिक लाभाच्या योजना आणल्या गेल्या पण त्यांची अंमलबजावणी कधीच प्रभावशाली झाली नाही, आणि त्यामुळे त्यातून अपेक्षित असलेले परिणाम फारसे कुठे दिसले नाहीत
- उद्धरेत् आत्मनात्मानम्! (म्हणजे आपणच आपला विकास आणि कल्याण केले पाहिजे) हा गीतेचा दिव्य संदेश विसरून सर्व गोष्टी सरकारनेच कराव्यात, आपण काहीही प्रयत्न करण्याची गरज नाही, हा कृती शून्यतेचा चुकीचा संदेश सर्वांठायी रुजला. त्यात भर म्हणून सरकारने विविध अनुदाने, कर्ज, कर्जमाफी, लोकसहभागशून्य असणाऱ्या विविध योजना, २ रुपये किलोचे धान्य वाटप इ. चुकीच्या प्रथा पाडून संपूर्ण समाजाची मानसिकता लाचार केली. त्यामुळे गावागावात विकासासाठी अत्यंत विपरीत वातावरण तयार झाले.अशा योजनांमुळे गावातल्या लोकांची मानसिकता बदलली, आपल्या गावात काही करायचे असल्यास आपल्याला शासनाची वाट पहावी लागते कारण तेच आपल्या सर्व गरजा पूर्ण करणार आहेत अशी समज लोकांमध्ये दृढ झाली,
- विकासाची परिभाषा ही फक्त आर्थिक विकासाशी जोडण्यात आली – मग त्यातूने चांगले रस्ते,


मोठ्या इमारती, गाड्या, हॉटेल्स आणि घरामध्ये इलेक्ट्रोनिक वस्तूंची रेलचेल असे चित्र तयार झाले. एका बाजूला शहरांमधील लोकसंख्या जलद गतीने वाढत गेली, गावातून लोकांचे लोंढेच्या लोंढे शहरात यायला सुरुवात झाली, शहरामध्ये झोपडपट्ट्या वाढल्या, शहरे बकाल झाली. मुंबई ला जर तुम्ही कधी लोकलने प्रवास केलात किंवा पुण्यात पर्वतीवर जाऊन खाली एखादी नजर टाकलीत तर तुम्हाला याची चांगली कल्पना येईल. भारतातील सर्व मोठ्या शहरात हेच चित्र आज उभे आहे. या शहरांमध्ये नागरी सुविधांवर प्रचंड ताण येत आहे, वाहनांची गर्दी, कचरा, नद्यांचे आणि हवेचे प्रदूषण, पाण्याचा गैरवापर यामुळे शहरांमध्ये वेगळे प्रश्न निर्माण होत आहेत.

- शासकीय कर्मचाऱ्यांचे पगार, भ्रष्टाचार आणि बाजारातील महागाई ही दिवसेंदिवस वाढतच आहे. राज्यात आणि देशात बरीच सरकारे आली आणि गेली पण परिस्थती मध्ये फार काही फरक पडला नाही. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे समाजातील काही मोजकी माणसे या सगळ्या प्रवाहात श्रीमंत झाली – यामध्ये प्रामुख्याने व्यापारी वर्ग, शासकीय कर्मचारी, राजकारणी, मोठे शेतकरी, माहिती–तंत्रज्ञान किंवा औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी यांचा समावेश करता येवू शकतो
- पण हा वर्ग आपल्या एकूण लोकसंखेच्या मानाने खूपच नगण्य आहे. अगदी ३–४ % एवढाच आहे. याचा अर्थ असा होतो कि देशातील ९०–९५ % जनता आजही त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्या करता झगडत आहे. हा आकडा आपण ग्रामीण भारताच्या बाजूने बघितला तर ६०–७०% लोक आजही ग्रामीण भागात राहतात आणि त्यांचा या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकात प्रामुख्याने समावेश होतो.आज एका बाजूला २७ मजल्यांच्या घरात राहणारेही भारतात आहेत आणि २७,००० रुपयांच्या कर्जासाठी आत्महत्येचा विचार करणारेही भारतात आहेत.
- ही झाली आर्थिक विषमता, दुसऱ्या बाजूला आपण या अवास्तव शहरीकरणात आणि संपूर्ण रासायनिक शेतीचा मार्ग स्वीकारून निसर्गाचा एवढा ऱ्हास केला आहे कि आपल्या पुढच्या पिढीला नद्या, झाडे आणि प्राणी–पक्षी फक्त संग्रहालयात पाहायला मिळतील अशी परिस्थिती हळू हळू येत आहे.

**विनोबाजींनी भारताच्या या परिस्थितीचे अत्यंत समर्पक वर्णन करताना म्हटले आहे कि,**



**आपला देश विदेशी आक्रमणे व्हायच्या आधी**
**स्वतंत्र गावांचा स्वतंत्र देश होता,**
**मुघलांच्या काळात तो स्वतंत्र गावांचा परतंत्र देश झाला,**
**नंतर इंग्रजांच्या काळात तो गुलाम गावांचा गुलाम देश झाला.**
**या गुलामी सोबत अज्ञान, आळस आणि अंधश्रद्धा आल्या.**
**आणि स्वातंत्र्य मिळाल्या नंतर तो परतंत्र गावांचा स्वतंत्र देश झाला.**
**आपल्या समोर आव्हान आहे ते या देशाला पुन्हा एकदा**
**स्वतंत्र गावांचा स्वतंत्र देश करण्याचे.**



महात्मा गांधीजींनी मांडलेला ग्रामविकासाचा विचार पुढे कालांतराने विनोबा भावे, पं. दीनदयालजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज अशा अनेक विचारवंतांनी मांडला. भारताचा विकास हा खेड्यांच्या शाश्वत विकासाशिवाय होऊच शकत नाही. म्हणून समग्र ग्रामविकासाचा ध्यास घेवून अनेक सामाजिक संस्था देशभर कार्यरत आहेत.

सध्याच्या अंधकारमय परीस्थितीत राळेगण सिद्धी,हिवरेबाजार,पाटोदा, बारीपाडा,समराळा, आनंदवाडी, मेंढा–लेखा, खांडबारा असे काही आशेचे किरण देशभर चमकत आहेत.अत्यंत समर्पित वृत्तीने काही कार्यकर्त्यांनी संपूर्ण गावाचे संघटन करून अनेक अडचणीवर मात करीत गावांच्या सर्वांगीण विकासाचे यशस्वी प्रयत्न केले आहेत. रा. स्व. संघाने देखील गेल्या २० वर्षांपासून ग्रामविकास विभागाद्वारे योजनाबद्ध प्रयत्न करून शेकडो गावांमध्ये विकासाचे अत्यंत सकारात्मक वातावरण तयार केले आहे.

***

# ४. शाश्वत ग्रामविकास - काळाची गरज

विकास ही एक स्वाभाविक प्रक्रिया आहे, जगातील प्रत्येक जण आपली जीवनपद्धती आणि राहणीमान अधिक चांगलं होण्यासाठी प्रयत्न करत असतो. या प्रयत्नातूनच त्या माणसाचा आणि पर्यायाने एकूण समाजाचा विकास होत असतो. भारतामध्ये फार प्राचीन काळापासून आपली जीवनपद्धती ही निसर्गाच्या चक्राबरोबर जोडली होती. लोकांची दिनचर्या आणि खानपान ऋतूप्रमाणे बदलत असे. निसर्गामधील संसाधनांचा गरजेपुरता वापर आणि त्यांचे संरक्षण, संवर्धन करणे हा आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग होता. आपले सणवार देखील निसर्गाचा ऱ्हास न करता आणि शेतीच्या कामांना समजून घेवून त्याप्रमाणे साजरे केले जात. याची अगदी सोपी उदाहरणे म्हणजे उन्हाळ्यात थंड आणि हिवाळ्यात शरीरातील उष्णता वाढवणारे पदार्थ खाणे, शेती करताना जमिनीला १ हंगाम विश्रांती देणे, जंगलातून काहीही वनोपज आणताना काळाची बंधने पाळणे, गायी–बैलांची विशेष काळजी घेणे आणि त्यांची पूजा करणे वगैरे. पण गेली १००–१५० वर्षे आपल्याकडे जो विकास झाला तो आपल्या भारतीय विचार सरणीला अनुसरून न होता पाश्चात्य विचार प्रभावाने त्यांच्या विकास विषयक कल्पनेप्रमाणे झाला. पाश्चात्य देशांच्या विकास परिभाषेत मानवाला सृष्टीचा केंद्रबिंदू मानण्यात आले आहे, सृष्टीतील सर्व संसाधने मानवाच्या उपभोगासाठी आहेत असे ते मानतात. त्यामुळे या विकासाचा परिणाम असा झाला कि आपण निसर्गाच्या चक्राच्या आणि गतीच्या विरुद्ध वागायला लागलो. आपला जल–जंगल–जमीन–पशुधन याकडे बघण्याचा दृष्टीकोन हा पूर्णपणे व्यापारी झाला, या संसाधनातून जास्तीत जास्त उत्पादन कसे मिळेल याचाच विचार आणि त्यासाठी वेगवेगळ्या पातळीवर प्रयत्न. या सगळ्याचा परिणाम आज असा झाला आहे कि या संपूर्ण जगामध्ये नैसर्गिक संसाधनांची स्थिती दर वर्षी खालावत चालली आहे. याची जाणीव गेल्या ८–१० वर्षात आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील झाली आणि आता मात्र अनेक आंतरराष्ट्रीय संस्था शाश्वत विकासाची (Sustainable Development) परिभाषा मांडत आहेत. आता याच नामांकित संस्था असे म्हणत आहेत कि विकास झाला पाहिजे पण तो नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास न करता. अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर शेती केली पाहिजे पण जमीनिची सुपीकता टिकवून, पाणी वापरले पाहिजे पण भूगर्भातील

पाण्याची पातळी टिकवून आणि जंगलातील वनोपज उत्पादन घेतले पाहिजे पण जंगले आणि जैवविविधता टिकवून.

याच शाश्वत विकास दृष्टीकोनातून आज आपण सर्वांनी ग्रामविकासाकडे पाहायला हवे. कारण जिथे मानवाची उपजीविका ही शेती आणि निसर्गावर अवलंबून असते अशाच लोकसमूहाला गाव म्हणतात. आपण जेंव्हा म्हणतो कि देशातील ६५% लोक शेतीवर अवलंबून आहेत तेंव्हा त्याचा अर्थ असा होतो कि उरलेले ३५% लोक जे शहरी भागात राहतात ते त्यांच्या जगण्यासाठी या ६५% लोकांवर अवलंबून आहेत. आणि म्हणूनच जर हे ६५% लोक समृद्ध झाले तरच इतर सर्वजण जगतील, समृध्द होतील. त्यासाठी गावे टिकली पाहिजेत आणि समृद्ध झाली पाहिजेत. गावांना समृद्ध करायचे असेल, तर गावातील नैसर्गिक संसाधनांना टिकवून त्यांची वृद्धी केली पाहिजे. हा झाला शाश्वत विकासाचा पहिला मुलभूत अविभाज्य भाग– ज्याला आपण म्हणू नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत विकास.

विकासाचा दुसरा महत्वाचा पैलू देखील आपण समजून घेऊ या. गेल्या ७० वर्षात सरकारने आणि अनेक सामाजिक संस्थांनी नैसर्गिक संसाधने वाचवण्यासाठी काही प्रयत्न नक्की केले आहेत. पण या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही. हा विकास करण्यासाठी अनेक 'प्रकल्प' (Project) राबवले जातात. जोपर्यंत एखादा विकास प्रकल्प चालतो, तो पर्यंत गावात त्याचे परिणाम थोड्याफार स्वरुपात दिसतात, पण जेंव्हा प्रकल्प संपतो तेंव्हा त्या गावातील स्थिती पूर्वपदावर यायला वेळ लागत नाही. थोडक्यात काय तर प्रकल्प अपयशी तरी ठरतात किंवा त्यांना अगदी अल्प प्रमाणात यश मिळते. याचा अभ्यास अनेक तज्ञ लोकांनी जेंव्हा केला, तेंव्हा त्यांच्या असे लक्षात आले कि कुठल्याही विकास प्रक्रियेमध्ये जर स्थानिक लोकांचा सक्रीय सहभाग नसेल, तर त्याचे परिणाम असेच दिसून येतात. म्हणून शाश्वत विकासासाठी जशी नैसर्गिक संसाधने महत्वाची आहेत तसाच स्थानिक लोकांचा प्रत्येक निर्णय प्रक्रियेत सक्रीय सहभाग देखील आवश्यक आहे. ही दोन शाश्वत विकासाच्या रथाची दोन चाके आहेत. विकास विषयात काम करणाऱ्या जगातील सर्व अभ्यासकांचे आता या निष्कर्षावर एकमत झाले आहे. हा झाला शाश्वत विकासाचा दुसरा अविभाज्य भाग, याला आपण म्हणू या विकासाचा निर्णय प्रक्रियेत स्थानिक लोकांचा सक्रीय सहभाग – लोकसहभाग.

ग्रामविकास विभागाने हाच धागा पकडून शाश्वत ग्रामविकासाची संकल्पना मांडताना सप्त–संपदा आणि पंचशक्तीं या तत्वांची रचना केली आहे. यातील सप्त–संपदा या परिसरातील सर्व नैसर्गिक संसाधनांचे रूप आहेत आणि पंचशक्ती या गावातील वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांचे एकत्रित संघटन आहे. या पंचशक्तीच्या आधारानेच सप्त–संपदांचा शाश्वत विकास शक्य आहे. या दोन्हींची सांगड

घातली गेली तरच आपण आपल्या गावाला शाश्वत विकासाच्या मार्गावर पुढे घेवून जाऊ शकू. वरील गोष्टींचा अंतर्भाव करून आम्ही शाश्वत ग्रामविकासाची एक सोपी व्याख्या करायचा प्रयत्न केला आहे.

शाश्वत ग्रामविकास म्हणजे पंच–शक्तीच्या आधारे सप्त–संपदांचे संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग

***

# ५. ग्रामविकास विभाग - रचना

महाराष्ट्र राज्याची ग्रामविकास विभागाने ४ प्रांतात विभागणी केली आहे आणि प्रत्येक प्रांतातील विभागशः रचना खालील प्रमाणे आहे.




प्रत्येक स्तरावर स्वयंसेवकांची साधारण रचना खालील प्रमाणे असते, आणि त्यांच्या नियमित बैठका व अभ्यास वर्ग होत असतात. काही प्रांतात स्थानिक कार्यकर्ता उपलब्धी आणि गरजेप्रमाणे यात थोडे बदल असू शकतात. सर्व साधारणपणे ‘‘प्रांत > विभाग > जिल्हा > तालुका > गाव’’ अशी पंच–स्तरीय रचना करण्याचा प्रयत्न केला जातो.

साधारण २ महिन्यातून एकदा बैठक आणि सहा महिन्यातून एकदा अभ्यास वर्ग आयोजित केला जातो.


**प्रांत प्रमुख, सह–प्रमुख, आणि प्रांत मंडळ** — **विभाग संयोजक, सह–संयोजक, विभाग संच** — **जिल्हा प्रमुख आणि जिल्हा मंडळ** — **ग्राम संयोजक, सह–संयोजक**

ही संपूर्ण रचना स्वयंसेवकांची असल्यामुळे इथे औपचारिकता कमी आणि आपले पणाची भावना, एकमेकांबद्दल प्रेम, गावासाठी काहीतरी करायची तळमळ यातून काम पुढे जाते. बैठका बऱ्याचदा कार्यकर्त्यांच्या घरी होतात, अगदी रात्रीचे मुक्काम सुद्धा. गावात निःस्वार्थी पणे काम करणाऱ्या लोकांची निवड करून त्यांची ग्रामविकास समिती केली जाते. या समितीने महिन्यात एकदा एकत्र यावे आणि गावासमोर असलेल्या प्रश्नांचा अभ्यास करावा अशी अपेक्षा असते. त्यानंतर गावकऱ्यांच्या मदतीने हे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. ग्रामविकास जिल्हा मंडळात शेती, पाणी, आरोग्य आणि व्यवसाय या विषयातील तज्ञ व्यक्ती / संस्था प्रतिनिधी जोडण्यात येतात. हे सर्व लोक गावाला तांत्रिक मार्गदर्शन करतात आणि अशा रीतीने गावातील प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. गावातील लोकांनीच स्वतःचे प्रश्न सोडवावे आणि त्या प्रक्रियेत सर्व निर्णय एकत्र येवून करावेत यावर भर दिला जातो.

***

# ६. सप्त-संपदा आणि पंच शक्ती

कुठल्याही गावाच्या शाश्वत विकासासाठी गावातल्या नैसर्गिक संसाधनांचा म्हणजेच सप्त-संपदांचा विकास होणे आवश्यक आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हा विकास कोणी बाहेरून येवून करणार नाही तर गावातील लोकांनाच त्यासाठी प्रयत्न करावे लागतील, आपले संघटन उभारावे लागेल. हे संघटन म्हणजेच पंचशक्ती. या पंचशक्ती मध्ये गावातील सज्ञ्नशक्ती, मातृशक्ती, युवाशक्ती, धार्मिक शक्ती आणि संघशक्ती चा समावेश होतो. गावातील निःस्वार्थी आणि गावासाठी काहीतरी करण्याची इच्छा आणि त्यासाठी वेळ द्यायची तयारी असलेल्या सर्व स्तरातील लोकांना एकत्रित आणावे लागेल. असे काम करताना ते गावाच्या विश्वासाला पात्र ठरतील अशा कार्यकर्त्यांची मिळून ग्रामविकास समिती निर्माण करावी लागेल. या संदर्भात आपण पुढील प्रकरणात माहिती घेणार आहोत.



आता आपण या सप्त–संपदांचे ग्रामीण जीवनात काय महत्व आहे, त्यांचा विकास (संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग) करण्यासाठी काय प्रयत्न करावे लागतील याची थोडक्यात माहिती घेवू.

| अनु. | संपदा नाव | ग्रामीण जीवनात महत्व |
|---|---|---|
| १ | **भू–संपदा** | शेतीसाठी सगळ्यात महत्वाचे संसाधन म्हणजे जमीन. हा निसर्गाकडून मिळालेला एक अनमोल ठेवा आहे. चांगली जमीन असेल तरच चांगली शेती केली जाऊ शकते. म्हणून जमिनीची सुपीकता वाढवणे अत्यंत महत्वाचे. गेल्या २५–३० वर्षांत जमिनीची प्रत वेगाने ऱ्हास होत असल्याचे दिसून येते. याला रासायनिक खतांचा असंतुलित वापर, पाण्याचा अति–वापर, जीवाणूंची घटणारी संख्या आणि सेंद्रिय कर्ब कमी होणे अशी ४ प्रमुख कारणे दिसून येतात. पावसाच्या काळात जमिनीचे संवर्धन (मृदा संवर्धन) करणे हे सुद्धा अत्यंत महत्वाचे असते. जमिनीचा सगळ्यात सुपीक थर हा पावसाच्या पाण्याने वाहून जात असतो म्हणून अशी माती आपल्या शेतातून आणि गावातून वाहून जाऊ नये यासाठी मृदा–संधारण आवश्यक असते. |
| २ | **जल–संपदा** | जगातील सर्व संस्कृतींचा उगम हा पाण्याच्या अस्तित्वाशी निगडीत आहे. म्हणूनच आपल्याला बरीचशी गावे सुद्धा नदीच्या किंवा तलावाच्या काठी आढळतात. शेतीसाठी पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. या व्यतिरिक्त मानवाला स्वच्छतेसाठी, जनावरांसाठी आणि पिण्यासाठी पाणी आवश्यक असते. या सर्व कारणांमुळे पाण्याला जीवन असे म्हटले जाते. स्वातंत्र्य मिळून आज ७१ वर्षे झाली तरी अजूनही हजारो गावातील पाण्याचा मुलभूत प्रश्न सुटलेला नाही. ज्या गावांना पाणी वर्षभर उपलब्ध होते तिथे पाण्याचा अति–उपसा झाल्यामुळे (बोअर द्वारे) वेगळे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे पाण्याची कमतरता असेल, तर ती मिटवण्यासाठी आणि पाणी मुबलक असेल तर त्याचे योग्य नियोजन करण्यासाठी काम करायची गरज आहे. |
| ३ | **वन–संपदा** | भारतातील जंगले आणि वृक्ष यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. विविध कारणांमुळे गेल्या १००–१५० वर्षात प्रचंड प्रमाणात वृक्ष–तोड केली गेली. पावसाचे पाणी जमिनीत जीरण्यासाठी आणि जमिनीची धूप थांबवण्यासाठी वृक्ष अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतात. पण आज आपण कुठल्याही |

| अनु. | संपदा नाव | ग्रामीण जीवनात महत्व |
| --- | --- | --- |
| | | गावात गेलो तर तिथले जंगल किंवा वृक्ष हे कमी झाल्याचे निदर्शनास येते. याचा परिणाम असा झाला आहे कि जमिनीची प्रचंड धूप होते, पडणारा बराचसा पाऊस वाहून जातो आणि यामुळे शेती, पाणी आणि पर्यावरण यांची स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. चांगली जंगले ही फक्त पर्यावरणीय दृष्ट्या महत्वाची नाहीत तर उन्हाळ्यात स्थानिक लोकांचा रोजगार सुद्धा जंगलातून मिळणाऱ्या वनोपज (फळे, फुले, मध, डिंक, लाख, चारोळी, मोहा, बांबू इ.) वर अवलंबून असतो.त्यामूळे त्यांचे संरक्षण आणि संवर्धन उपजीविकेच्या दृष्टीकोनातून सुद्धा अत्यंत महत्वाचे आहे. |
| ४ | गो–संपदा | वेदकाळापासून भारतीय संस्कृतीमध्ये देशी गायीला अनन्य साधारण महत्व आहे. गायीपासून मिळणाऱ्या सर्व वस्तूंचा मानवी जीवनात उपयोग करता येतो. तिच्यापासून मिळणारे दूध हे जगातील सर्वोत्तम असल्याचे आता वैज्ञानिक दृष्ट्या देखील सिद्ध झाले आहे. या खेरीज तिच्या शेण आणि गोमुत्र यांचा वापर शाश्वत शेतीसाठी गरजेचा आहे. किंबहुना त्यांचा नियमित वापर केल्याशिवाय शाश्वत शेती होऊच शकत नाही. गाय आपल्या शेतीला लागणारे बैल सुद्धा देते. अशा प्रकारे तिच्या अनंत गुणांमुळे तिचे पूजन केले जाते आणि तिचे वर्णन करताना गोमय वसते लक्ष्मी असे म्हटले जाते. परंतु दुध उत्पादनाच्या हव्यासापोटी आणि शेतातील यांत्रिकीकरण झाल्यामुळे गेल्या ३–४ दशकात देशी गोवंशाचा प्रचंड ऱ्हास झाला आहे. |
| ५ | जीव–संपदा | आपल्या परिसरातील सर्व सजीव म्हणजे प्राणी, पक्षी, कीटक, औषधी वनस्पती, वृक्ष, जमिनीतील जीवाणू, समुद्र आणि नद्यातील जलचर यांचा यात समावेश होतो. या सर्व सजीव सृष्टीला जैवविविधता असे म्हटले जाते. या सृष्टीच्या निर्मात्याने निर्माण केलेला प्रत्येक सजीव हा या निसर्ग–साखळीचा एक भाग आहे. यालाच अन्न–साखळी असेही म्हणतात.वनस्पती हवेतून आणि जमिनीतून अन्न–द्रव्ये घेतात आणि वाढतात, त्यांना खाऊन मधमाशा, तृणभक्षक प्राणी(हरीण,ससा यासारखे शाकाहारी प्राणी) वाढतात आणि या प्राण्यांना खाऊन सृष्टीतील मांसाहारी प्राणी जसे कि वाघ, कोल्हा, सिंह इ. |

| अनु. | संपदा नाव | ग्रामीण जीवनात महत्व |
|---|---|---|
| | | वाढतात. या प्रक्रियेत अन्नाच्या माध्यमातून उर्जा एका सजीवाकडून दुसऱ्या सजीवाकडे संक्रमित होत असते. या साखळीच्या शेवटी वाघ असतो आणि तो मृत पावल्यानंतर ही उर्जा पुन्हा मातीत आणि हवेत विलीन होते. जेंव्हा या अन्न साखळीतील कोणताही प्राणी नष्ट होतो, तेंव्हा या संपूर्ण साखळीला आणि पर्यावरणाला धोका उत्पन्न होतो कारण पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीवाचे अस्तित्व पृथ्वीसाठी आवश्यक असते. म्हणून आपल्या परिसरातील जैव–विविधता टिकून राहण्यासाठी आपण कसोशीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. |
| ६ | उर्जा–संपदा | माणसाला जगण्यासाठी स्वच्छ शिजवलेले अन्न, शुद्ध पाणी, उत्तम आरोग्य, शिक्षण, निवारा आणि दळणवळण यासारख्या मुलभूत सुविधांची गरज असते. या सुविधा निर्माण करण्यासाठी त्याला सतत उर्जेची आवश्यकता असते. ही उर्जा सध्याच्या आधुनिक युगात बऱ्याच वेळा वीज किंवा ज्वलनशील पदार्थ (कोळसा, वायू, पेट्रोल/डीझेल, लाकूड इ.) वापरून निर्माण केली जाते. या उर्जा स्त्रोतांना पारंपारिक उर्जा स्त्रोत असे म्हटले जाते. परंतु देशातील ग्रामीण भागामध्ये अजूनही नियमित वीज पुरवठा नाही, काही गावात वीज उपलब्ध सुद्धा नाही. जळणासाठी लाकूडफाटा वापरल्यामुळे बरीच वृक्षतोड झाली आहे. अशा परिस्थितीत आपल्याला अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर करण्याशिवाय पर्याय नाही. ग्रामीण भागात गो–वंशाच्या माध्यमातून बायोगॅस निर्मिती, सौर–उर्जा आणि पवन–उर्जा यांचा उपयोग आधुनिक तंत्रज्ञान वापरून दैनंदिन जीवनातील गरजा भागवण्यासाठी नक्की केला जाऊ शकतो. म्हणून आपल्या गावात उपलब्ध असलेल्या अशा उर्जा स्त्रोतांचा वापर वाढवण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवा. |
| ७ | जन–संपदा | मनुष्य हा देखील या सृष्टीचाच एक भाग आहे. आणि म्हणूनच त्याचा विकास करताना वर दिलेल्या सर्व संसाधनांचा विकास आवश्यक आहे. मानवाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर शिक्षण, आरोग्य, संस्कार आणि स्वावलंबन अशा किमान ४ बिंदूंचा विचार करावा लागेल. शिक्षणामध्ये |

| अनु. | संपदा नाव | ग्रामीण जीवनात महत्व |
|---|---|---|
| | | गावातील शाळेत मिळणारे शिक्षण एवढाच अर्थ अपेक्षित नसून त्याला जीवनमुल्ये–आधारित–शिक्षण आणि ती व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहू शकेल असे कौशल्य–प्रशिक्षण मिळाले पाहिजे. संस्कार हे २ प्रकारचे असतात – वैयक्तिक (घरातील ज्येष्ठ व्यक्तींचा आदर करणे, संपूर्ण गाव एक परिवार असा विचार करणे) आणि सामाजिक (व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, जातीभेद न पाळणे). आपले सणवार, कालसुसंगत चालीरीती आणि संस्कृती जपणे ही आपलीच जबाबदारी आहे. आरोग्यामध्ये मानसिक आणि शारीरिक दोन्ही प्रकारे निरोगी राहणे आवश्यक आहे. चांगल्या मानसिक आरोग्यासाठी ताण–तणाव विरहीत जीवन आणि शारीरिक आरोग्यासाठी नियमित व्यायाम, ऋतूप्रमाणे योग्य आहार आवश्यक आहे. गावातील सर्वजण आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असणे महत्वाचे आहे त्यासाठी कृषी आणि लघु–उद्योग यांना समान महत्व दिले गेले पाहिजे. गावाच्या बहुतांशी गरजा गावात आणि बाकीच्या आजूबाजूच्या परिसरातून पूर्ण होतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. |

वर दिलेल्या पहिल्या सहा संपदा आणि सातव्या जन–संपदेचे चार बिंदू (जन–शिक्षण, जन–आरोग्य, जन–संस्कार आणि जन–स्वावलंबन) असे मिळून शाश्वत ग्रामविकासाचे १० बिंदू होतात. आपण या दहा बिंदूंना समोर ठेवून सातत्याने काम केले तर हळू हळू आपण आपल्या गावाला शाश्वत विकासाच्या मार्गावर नेण्यात यशस्वी होऊ.

**शाश्वत ग्रामविकासाचे १० बिंदू:**

| | | | |
|---|---|---|---|
| जल संपदा | भू–संपदा | वन–संपदा | गो–संपदा |
| उर्जा संपदा | जीव संपदा | जन–शिक्षण | जन–आरोग्य |
| | जन–संस्कार | जन–स्वावलंबन | |

या सर्व बिंदूंवर काम करण्यासाठी आपल्याला गावात वेगवेगळ्या प्रकारे लोकांचे संघटन करून आपली शक्ती वाढवावी लागेल. त्यांचा विकास प्रक्रियेत सक्रीय सहभाग मिळण्यासाठी व्यवस्था उभी करायला लागेल. त्यासाठी खालील पंचशक्तींचे एकत्रीकरण करावे लागेल. या पंच–शक्तींची आपण थोडक्यात माहिती घेवू या. सुरुवातीला यांचे जागरण, मग संघटन आणि नंतर त्यांच्या आधारे सप्त–संपदांचे संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

| अनु. | जनशक्ती | माहिती |
|---|---|---|
| १ | धार्मिक–शक्ती (अध्यात्मिक) | भारतामध्ये अनेक धार्मिक संप्रदाय गुण्या–गोविंदाने एकत्र राहतात. प्रत्येकाला आप–आपल्या धर्माचा अभिमान वाटत असतो. अशा धर्माच्या आधारे लोकांना एकत्र आणणे आणि त्यांच्यात सर्वांगीण ग्रामविकासाविषयी चांगली भावना निर्माण करणे शक्य असते. अशा प्रकारे गावा–गावात विविध धार्मिक उत्सव, सणवार एकत्र येवून साजरे करणे ही याची पहिली पायरी असेल. यातून सर्व धर्माचे आणि जातीचे लोक एकत्र आणायला मदत होईल. |
| २ | युवा–शक्ती | आज संपूर्ण जगामध्ये भारत देशातील युवकांची संख्या सर्वात जास्त आहे आणि तेच आपली खरी शक्ती आहेत. पण आजचा तरुण वर्ग प्रामुख्याने फक्त स्वतःचा विचार करताना दिसतो. याला इंग्रजांनी आपल्या इथे रुजवलेली शिक्षण व्यवस्था कारणीभूत आहे. या युवक वर्गाला वेगवेगळया उपक्रमातून एकत्र आणले पाहिजे. ग्रामविकासामध्ये त्यांची उर्जा अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडू शकते. त्यांना वेगवेगळ्या कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आणि सार्वजनिक उत्सवातून एकत्र करणे आणि त्यांच्यात आपल्या गावाच्या विकासासाठी प्रयत्न करण्याची इच्छा निर्माण करणे आवश्यक आहे. |
| ३ | मातृ–शक्ती | भारतीय संस्कृतीमध्ये मातेला सर्वोच्च दर्जा देण्यात आला आहे. म्हणूनच पृथ्वी, नद्या, जमीन आणि गाय यांना माता असे संबोधले जाते. गावातील महिला शक्तीची साथ मिळाल्याशिवाय गावाचा विकास शक्यच नाही. म्हणून त्यांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. आपल्याकडे असे म्हटले जाते कि जेंव्हा आई |

| अनु. | जनशक्ती | माहिती |
|---|---|---|
| | | एखादी गोष्ट शिकते तेंव्हा संपूर्ण घरावर त्याचा परिणाम होतो. ग्रामविकासाचा संस्कार जर महिलांवर झाला तर तो संपूर्ण गावावर होण्यासाठी वेळ लागणार नाही. स्वयं–सहायता गट आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना एकत्र आणायची गरज आहे. |
| ४ | सज्जन–शक्ती | गावात ज्या लोकांना आदराचे स्थान आहे, ज्यांच्याबद्दल सर्वांचे चांगले मत आहे अशा गैर–राजकीय व्यक्तींना इथे सज्जन शक्ती असे म्हटले आहे. गावातील अशा लोकांनी जर एकत्र येवून प्रयत्न केले तर कोणताही प्रश्न ते सोडवू शकतात. याची अनेक उदाहरणे आपल्याला पाहायला मिळतात. पण दुर्दैवाने आज गावातील सज्जन शक्ती ही संघटीत नाही. त्यांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. यामध्ये गावासाठी निःस्वार्थ पणे काम करण्याची तयारी असलेले आणि त्यासाठी वेळ देवू शकणाऱ्या लोकांशी संपर्क वाढवून त्यांना संघटीत करणे आवश्यक आहे. |
| ५ | संघ–शक्ती | चारित्र्यवान आणि देशभक्त व्यक्ती निर्माणातून राष्ट्र निर्माणाचे कार्य संघ गेल्या ९० वर्षाहून अधिक काळ सातत्याने करत आहे. या कामाचा प्रमुख आधार हा दैनंदिन / साप्ताहिक शाखा आहे. आपल्या गावात अशा शाखा चालू करण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यातून सर्व वयातील लोकांचे संघटन निर्माण करणे म्हणजे संघ–शक्ती जागृत करणे होय. संघाच्या कार्यपद्धतीचा उपयोग हा गावातील संघटन टिकवण्यासाठी नक्की केला जाऊ शकतो. याच यशस्वी कार्यपद्धतीमुळे इतकी वर्षे संघाचे काम सतत वाढले आहे. एकत्र येवून एका दिशेने जर आपण जायचा प्रयत्न केला तर यश मिळणे कठीण नाही. त्यासाठी संघटन आणि संघटनेसाठी संघ–विचार आवश्यक आहे. |

# ७. किरण - उदय - प्रभात ग्राम : संकल्पना

आपण जेंव्हा एखादे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कामाला सुरुवात करतो तेंव्हा, वेळोवेळी आपल्या कामाचे स्व–मुल्यांकन करणे आवश्यक असते. यालाच सिंहावलोकन असे म्हणतात. आपण योग्य दिशेने जात आहोत का आणि आणखीन काय करणे आवश्यक आहे याचा सतत विचात करणे आवश्यक आहे. सर्व गावांमध्ये एक निरोगी स्पर्धा असावी आणि नेहमी आपल्या समोर एक लक्ष्य असावे म्हणून ग्रामविकासाचे काही टप्पे आपण केले आहेत. ज्याप्रमाणे रोज पहाट होताना आधी सूर्याचे किरण पृथ्वीवर पडतात, मग त्याचा उदय होतो आणि प्रभात होते. त्याच प्रमाणे आपण ग्रामविकासाच्या किरण उदय प्रभात अशा तीन पायऱ्या केल्या आहेत. जेंव्हा गावातील काही लोक निःस्वार्थपणे गावासाठी काम करण्यासाठी तयार होतात, आणि ते गाव आपण ग्रामविकासासाठी निवडतो तेंव्हा अशा गावाला किरण ग्राम म्हटले जाते.अशा किरण गावामध्ये ज्या वेळी नियमित उपक्रम राबवण्यातून ग्रामविकास समिती तयार होते व त्या समितीची मासिक बैठक होऊन गावातील समस्यांच्या समाधानासाठी स्वयं–प्रेरित कार्यकर्त्यांचा गट निर्माण होतो तेंव्हा त्या गावाला आपण उदय–ग्राम म्हणतो. अशा उदय–ग्रामामध्ये सर्व सप्त–संपदांच्या विकासासाठी गावाच्या सहभागातून विविध उपक्रम सुरु होतात. त्यामुळे गावातील लोकांच्या मानसिकते मध्ये योग्य परिवर्तन दिसू लागते व गावातील वातावरण बदलू लागते. आणि याचा स्वाभाविक प्रभाव परिसरातील गावांवर सुद्धा दिसू लागतो, अशा गावांना प्रभात–ग्राम म्हटले जाते. आपण एक गोष्ट इथे लक्षात घेतली पाहिजे कि कुठलेही गाव कोणत्याही एका टप्प्यावर कायम राहू शकत नाही. ग्रामविकास ही एक प्रक्रिया असल्यामुळे, गाव नेहमीच एका टप्प्याहून दुसऱ्या टप्प्याकडे प्रवास करत असते. गावात राजकारण, निवडणुका, जाती–संघर्ष, सामाजिक विषमता इ. मुळे गावातील वातावरण दुषित होत असते, अशा प्रसंगी ग्राम–समितीने खूप काळजीपूर्वक गावातील वातावरण निरोगी राहण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावेत.

ही शाश्वत ग्रामविकासाची प्रक्रिया राबवणे दिसते तेवढे सोपे नाही. त्याकरता खूप प्रामाणिक पणे गावासाठी काम करणाऱ्या व्यक्तींची गरज असते. राळेगण–सिद्धीचे अण्णा हजारे नेहमी एक उदा. देतात. ते म्हणतात कि जेंव्हा आपण धान्याच्या भरलेल्या कणसाकडे पाहतो तेंव्हा आपल्याला आनंद

होतो. पण ते कणीस भरण्यासाठी एखाद्या दाण्याने स्वतःला जमिनीत गाडून घेतलेले असते. आपल्या गावात भरलेल्या कणसासारखी समृद्धी आणायची असेल तर काही लोकांना ग्रामविकासाच्या कामात झोकून देवून काम करावे लागेल. तरच हे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल.

किरण – उदय – प्रभात हे शाश्वत ग्रामविकासाचे टप्पे ढोबळ मानाने कसे ठरवले आहेत याची माहिती खाली दिली आहे. ग्रामविकास कार्यकर्त्यांनी दर वर्षी आपल्या गावाचे मुल्यांकन स्वतः करावे आणि ग्रामविकासाच्या दहा बिंदूंवर झालेल्या कामाची नोंद वही तयार करावी. या वहीचा उपयोग आपल्याला आपला प्रवास योग्य दिशेला चालू आहे हे समजण्यासाठी होईल.

## किरण ग्राम → उदय ग्राम → प्रभात ग्राम

### किरण ग्राम

- ✻ जेंव्हा गावात ग्राम-विकासाचे काम सुरु होते आणि ते गाव ग्रामविकास विभागाशी जोडले जाते
- ✻ नियमित पणे ग्राम-स्वच्छते सारखे किमान १-२ उपक्रम महिन्याला सुरु होतात
- ✻ गावासाठी निःस्वार्थीपणे काम करणाऱ्या ८-१० जणांचा संच (२-३ महिला सुद्धा असाव्यात) तयार होतो
- ✻ ग्रामविकास विभाग जिल्हा कार्यकर्त्याचा नियमित प्रवास त्या गावात सुरु होतो, गाव जिल्हा अभ्यास वर्गात सहभागी होऊ लागते

### उदय ग्राम

- ✻ १०-१२ जणांची सक्रीय ग्रामविकास समिती निर्माण होते आणि दर महिन्याला नियमित भेटते, चर्चा करते
- ✻ गावाचा अभ्यास करुन गावातील खऱ्या समस्या ओळखते, त्यावर नियोजनबद्ध काम सुरु करते
- ✻ गावात पंचशक्तींचे संघटन उभे राहायला सुरुवात होते, महिला आणि युवा कार्यकर्ते समितीशी जोडले जातात
- ✻ गावातील कार्यकर्ते प्रेरणा सहल, विविध शेती आणि ग्राम-उद्योग प्रशिक्षणे, पर्जन्यमापक सारखे उपक्रम राबवतात
- ✻ ग्रामविकासाच्या १० बिन्दुंपैकी किमान ४-५ बिंदूंवर नियमित पणे उपक्रमातून काम सुरु होते

### प्रभात ग्राम

- ✻ पंचशक्तींचे (महिला, युवा, सज्जन लोक) सक्षम संघटन गावात उभे राहते
- ✻ ग्रामविकासाच्या सर्व १० बिंदूंवर विविध उपक्रमांच्या माध्यमातून काम सुरु होते
- ✻ किमान ४-५ बिंदूंवर सकारात्मक परिणाम दृश्य स्वरुपात जाणवतो
- ✻ लोकांच्या मानसिकतेत अपेक्षित बदल दिसायला लागतो
- ✻ गावाचे प्रश्न सोडवण्यासाठी लोक-संचलित स्थानिक व्यवस्था उभी राहते
- ✻ शाश्वत विकासाकडे गावाची वाटचाल निर्धारपूर्वक सुरु होते
- ✻ आजूबाजूच्या गावांवर या कामाचा प्रभाव दिसू लागतो.

✻✻✻

# ८. ग्रामविकास समितीः कार्यपद्धती

कोणत्याही जिल्ह्यामध्ये कामाला सुरुवात करताना पहिली पायरी असते ती योग्य गावांची निवड करणे. गावाची निवड करताना त्या गावाची लोकसंख्या ही २०००–२५०० या पेक्षा जास्ती नसावी. मोठ्या गावात काम करताना जास्त अडचणी येवू शकतात. म्हणून सुरुवात छोट्या गावांपासून करावी. जसजशी आपली त्या भागातील ताकत वाढेल, आपल्याकडे भरपूर कार्यकर्ते तयार होतील, तशी गावांची संख्या वाढवायला हरकत नाही. गावे निवडताना खालील गोष्टी लक्षात घ्याव्यात:

१) गावाची लोकसंख्या ही २०००–२५०० पर्यंत असावी, यापेक्षा मोठे गाव शक्यतो घेवू नये.

२) गावाची उपजीविका ही प्रामुख्याने शेती, जंगल, पशुधन आणि छोटे ग्रामोद्योग यावर अवलंबून असावी. जर गावातील लोक प्रामुख्याने जवळच्या औद्योगिक भागात किंवा शहरात नोकरीला असतील, तर असे गाव निवडू नये. कारण अशा गावांचे दैनिक जीवन हे आजूबाजूच्या नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून नसते. त्यामुळे त्यांचा शाश्वत विकास करण्यासाठी प्रयत्न करण्याची त्यांना तेवढी आवश्यकता आणि गरज वाटत नाही. अशी गावे बऱ्याच वेळा शहरांच्या जवळ आढळतात.

३) जिल्ह्याचा विचार करताना, ज्या तालुक्यात आपला चांगला संपर्क आहे आणि जिथे प्रवासी कार्यकर्ता मिळणे शक्य आहे, अशा प्रत्येक तालुक्यात एक किंवा दोन गावे निवडावीत. सुरुवातीला या पेक्षा जास्ती गावे निवडू नयेत. या गावात आपले काम पुढे गेले आणि आपल्याला तालुक्यात ३–४ प्रवासी कार्यकर्ते उपलब्ध असतील तरच जास्ती गावांची निवड करावी.

आपण जेंव्हा गावात काम करायला सुरुवात करतो, तेंव्हा सुरुवात्तीला ३–४ लोक एकत्र येतात. अशा वेळी गावातील इतर लोकांना गावाच्या सर्वांगीण विकासासंबंधी आपले विचार कळावेत आणि त्यांनी आपल्या बरोबर त्यासाठी प्रयत्न करावेत म्हणून ग्राम–स्वच्छते सारखे काही सोपे उपक्रम घेता येतील. काही शेती–विषयक प्रशिक्षण शिबिरे, पशु–आरोग्य शिबिरे, सेंद्रिय–शेती प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करता येवू शकतात, अशा विविध उपक्रमातून आपल्याला गावातील सज्जन–शक्ती आणि युवा–शक्तीचे एकत्रीकरण करणे शक्य होईल. ज्या व्यक्ती अशा उपक्रमात सक्रीय सहभाग घेतील अशा व्यक्तींशी हळूहळू संपर्क वाढवावा लागेल. त्यांच्या घरी जाणे, त्यांच्या सुख–

दुःखात सहभागी होणे आणि त्यांना आपल्या बैठकांना बोलवणे अशातून त्यांना आपल्या कामाशी जोडावे लागेल. महिलांसाठी स्वतंत्र बैठका आणि गावात असलेल्या स्वयं–सहायता गटांच्या माध्यमातून त्यांच्यातील काही सक्रीय महिलांची निवड करता येईल. गावातील २–३ जेष्ठ मंडळी जी सर्व कार्यक्रमात पुढाकार घेतात आणि जी राजकीय हेतूने प्रेरित नाहीत अशा लोकांना सुद्धा निवडता येईल. अशा प्रकारे २–३ प्रयोगशील युवक, २–३ सक्रीय महिला आणि गावातील २–३ जेष्ठ नागरिक या सगळ्यांना बरोबर घेवून आपल्या ग्राम–समिती ची निर्मिती करावी. ही ग्राम–समिती निर्माण करताना सुरुवातीला घाई करू नये. पहिले ३–४ महिने वर दिल्या प्रमाणे विविध उपक्रम घेवून आपल्याला समितीत हवी आहेत अशी माणसे निवडणे महत्वाचे आहे. अशी माणसे निवडताना खालील गोष्टींकडे ध्यान द्यावे.

**ग्रामसमिती सदस्य निवडताना काय काळजी घ्यावी याबाबत काही निकष खाली दिले आहेत:**

१) सुरुवातीला समिती १०–१२ लोकांची असावी. यामध्ये २–३ युवक, २–३ महिला, ३–४ जेष्ठ नागरिक आणि २–३ स्वयंसेवक (किंवा असे कार्यकर्ते जे काम सुरु करतील)

२) गावात जर वेगवेगळे समाज किंवा वाड्या / वस्त्या असतील तर सर्व समाजाच्या किंवा वस्तीतील लोकांचे प्रतिनिधी ग्राम–समिती मध्ये निवडावेत, असे केल्याने कुठलाही निर्णय घेताना गावातील सर्व थरातील लोकांचा विचार करणे सोपे जाईल आणि ग्राम–समिती खऱ्या अर्थाने सर्व–समावेशक बनेल.

३) कोणत्याही राजकीय पदावर असणाऱ्या व्यक्तीला समिती मध्ये स्थान देवू नये, अशा लोकांचे सहकार्य घ्यायला काहीच हरकत नाही. पण ग्राम–समिती ही संपूर्ण पणे गैर–राजकीय असावी.

४) सदस्य निवडताना ज्यांनी आपल्या व्यक्तिगत आयुष्यात काही चांगले बदल केले आहेत किंवा ज्यांना असे बदल करायची इच्छा आहे अशाच लोकांची निवड करावी. महात्मा गांधीनी म्हटले आहे कि "Be the change, you want to see in the world." अर्थात आपल्याला जो बदल जगामध्ये घडावा असे मनोमन वाटते, त्या बदलाची सुरुवात स्वतःपासून करावी.

५) जे लोक गावासाठी निरपेक्ष वृत्तीने वेळ देवू शकतात, महिन्याला किमान एकदा बैठकीला येवू शकतात अशाच लोकांची निवड करावी. फक्त चांगले असणे किंवा गावासाठी काहीतरी करण्याची इच्छा असणे पुरेसे नाही, ती तर पहिली पायरी आहे. पण त्यापुढे जाऊन, असे काम करण्यासाठी वेळ देणे जास्त महत्वाचे आहे.

६) सदस्यांनी कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रचार / प्रसार करू नये. जेंव्हा गावात निवडणुका असतील तेंव्हा आपल्या वर्तनातून / बोलण्यातून कोणत्याही राजकीय पक्षाचे किंवा गटाचे

समर्थन किंवा विरोध दिसणार नाही याची विशेष काळजी घ्यावी.

७) सदस्यांनी आपल्या उपक्रमांना सर्व राजकीय पक्षाच्या, सर्व जाती–धर्माच्या लोकांना निमंत्रण द्यावे. समाजातील कोणत्याही घटकाला उपेक्षित ठेवू नये.

अशा प्रकारे आपल्या गावात ग्रामसमितीची निवड करावी. समिती मधील सर्व सदस्यांनी गावातील प्रत्येक माणूस, पशु–पक्षी आणि वन–संपदा हा आपल्या परिवाराचाच एक भाग आहे अशा प्रकारे आपली भूमिका ठेवावी. आपण आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची आणि गायी–बैलांची जशी काळजी घेतो तशीच गावातील सर्वांची घ्यावी, यातून गावाचे आणि आपले नाते आणखीन दृढ होत जाईल. आपण आपले घर जसे स्वच्छ ठेवतो तसे आपला संपूर्ण गाव स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत. आपण जर अशी भावना मनात ठेवून काम केले, तर आपल्याला यश नक्की मिळेल.

**ग्रामसमिती जबाबदारी**

- ✓ ग्राम–विकास साठी सर्वांना बरोबर घेवून काम करतील व त्यासाठी भरपूर वेळ देणार असतील अशा दोन जणांची निवड संयोजक आणि सह–संयोजक पदांवर करावी, सर्व बैठकांचे नियोजन, संचालन करणे, सर्व सदस्यांशी संपर्क ठेवणे आणि जिल्हा मंडळाशी समन्वय ठेवणे ही यांची प्रमुख जबाबदारी असेल.
- ✓ ग्राम–समितीची नियमित बैठक घेण्यासाठी प्रयत्न करणे, महिन्यातून किमान एकदा अशी बैठक घेणे आणि त्यामध्ये गेल्या महिन्यात झालेल्या उपक्रमांचा आढावा आणि पुढील महिन्यासाठी नियोजन यावर चर्चा करणे आणि ठरवणे
- ✓ गावातील गरज आणि क्षमता पाहून गावात कार्यक्रम, उपक्रम घेणे, त्यासाठी जिल्हा मंडळ सदस्यांची मदत आणि त्यांचे मार्गदर्शन घेणे
- ✓ १०–१२ जणांची ग्रामसमिती स्थिर झाल्यानंतर २–३ महिन्यांनी प्रत्येक सदस्याने ग्रामविकास च्या १० बिन्दुंपैकी एका बिंदूवर लक्ष केंद्रित करावे, किंवा गावाच्या दृष्टीने जे महत्वाचे बिंदू असतील असे ३–४ बिंदू प्रथम निवडावेत आणि प्रत्येक बिन्दुसाठी २ सदस्य (एक महिला, एक पुरुष) अशी रचना करावी. उदा. जल–संपदेसाठी २ व्यक्ती, उर्जेसाठी २ व्यक्ती अशी विभागणी करावी.
- ✓ त्या त्या संपदेच्या विकासासाठी या २ सदस्यांनी गावातल्या लोकांना एकत्र करून आपला कार्यकर्ता संच निर्माण करावा. म्हणजे प्रत्येक जण वेगवेगळ्या कामात गुंतला जाईल आणि कामाची उत्तम प्रकारे विभागणी होईल. अशी विभागणी करताना गावाची गरज आणि त्या कार्यकर्त्यांची आवड अशा दोन्ही

**ग्रामसमिती जबाबदारी**

गोष्टी ध्यानात घ्याव्यात.

- ✓ गावाचा अभ्यास, बैठका, कार्यक्रम यांच्या नोंदी ग्राम–समिती नोंद वहीत करणे / करून घेणे
- ✓ गावातील सज्ज्न लोक, युवक, महिला यांना सतत भेटून आपल्या कामाची माहिती देणे आणि त्यांना कार्यक्रमात सहभागी करून घेणे
- ✓ अभ्यासाच्या आधारे गावातील समस्यांचे निदान करून त्यांची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवणे आणि सर्वानुमते ती समस्या निवारण करण्यासाठी मार्ग निश्चित करणे

**[illegible]**

- ✓ गावात कुठल्याही कार्यक्रमात, उपक्रमात कोणताही जात–पात, पंथ–पक्ष, स्त्री–पुरुष, गरीब–श्रीमंत, शिक्षित–अशिक्षित असा भेदभाव होणार नाही याची दक्षता घेणे आणि त्यांचा सहभाग आपल्याला मिळेल यासाठी प्रयत्न करणे
- ✓ गावाचा विकास करताना तो सर्वसमावेशक आणि दुर्बल घटकांना प्राधान्य देवून होत आहे याकडे विशेष लक्ष देणे, त्यासाठी गावाची मानसिकता तयार करणे
- ✓ ग्रामविकास समितीने सरकारी योजना स्वतः राबवू नयेत. त्या सरकारी यंत्रणेतून योग्य पद्धतीने राबवल्या जातील यासाठी प्रयत्न करणे. व गावात सुरु असलेल्या सरकारी कामांवर गावकरयांचे लक्ष राहील असा प्रयत्न करणे.

गावासमोर असणारा कोणताही प्रश्न किंवा समस्या सोडवताना खालील पद्धतीचा अवलंब करावा. ही प्रश्न सोडवण्याची शास्त्रशुद्ध पद्धत आहे. अशा प्रकारे आपण लवकर उत्तरापर्यंत पोहचू शकू.

- **सर्वेक्षण / माहिती संकलन** — ✻ प्रथम त्या प्रश्नाचा अभ्यास करून माहिती संकलित करावी,
- **समस्या निर्धारण** — ✻ संकलित माहितीच्या आधारे नक्की समस्या काय आहे हे ठरवावे, त्यासाठी चर्चा करावी
- **प्राधान्यक्रम** — ✻ समस्या अनेक असतील तर त्याचा प्राधान्यक्रम लावावा आणि सर्वात महत्वाची जी आहे तिच्यावर काम सुरु करावे
- **कृती–आराखडा** — ✻ समस्या निर्मुलन करण्यासाठी कृती–आराखडा तयार करावा, त्यासाठी असा प्रश्न सोडवण्याच्या पद्धती समजून घ्याव्यात
- **अंमलबजावणी** — ✻ लोक–सहभागातून आराखड्याची अंमलबजावणी करावी

आपल्या गावात ग्राम–समिती निर्माण झाल्या–नंतर, गावातील सप्त–संपदांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी पुढच्या भागात काही उपक्रम दिले आहेत. असे उपक्रम नियमित पणे सुरु करावेत. पुस्तिकेत दिलेल्या अध्ययन फॉर्म चा वापर करून आपल्या गावाचा अभ्यास करावा. त्यातून आपल्या गावासमोर असणारे प्रमुख प्रश्न आणि कोणत्या संपदांवर काम करण्याची जास्त आवश्यकता आहे हे लक्षात येईल. हे समजल्यानंतर गावातील जास्तीत जास्त लोकांना याबद्दल माहिती द्यावी. एकत्र येवून चर्चा करावी. त्यातून पुढे जाण्यासाठी काय करता येईल याचे कालबद्ध नियोजन करावे. तांत्रिक मदतीसाठी आपल्या ग्रामविकास जिल्हा आणि विभाग मंडळाशी संपर्क करावा. अशा प्रकारचे काम ज्या गावांमध्ये झाले आहे, अशा गावांना भेट द्यावी. त्यातून गावाला प्रेरणा मिळेल आणि आपल्या गावाचे प्रश्न सोडवण्यासाठी उत्तर सुद्धा.

✻✻✻

# ९. ग्रामविकास सूत्रः पू. सरसंघचालक मोहनजी भागवत

फेब्रु. २०१८ मध्ये संपूर्ण भारतातील प्रभात गावांचे ३ दिवसीय संमेलन बेतुल, मध्यप्रदेश इथे पार पडले. या संमेलनात कार्यकर्त्यांना पू. सरसंघचालक मोहनजी भागवत यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी ग्रामविकास विषयावर संघाची भूमिका, कार्यकर्ता कसा असावा आणि आगामी काळात आपले लक्ष्य काय असावे याबाबत अगदी नेमक्या शब्दात मौलिक मार्गदर्शन केले. त्याच मार्गदर्शनातील काही महत्वाचे मुद्दे खाली देत आहोत. आम्हाला खात्री आहे कि याचा कार्यकर्त्यांना आपल्या मनातील शंका दूर करण्यासाठी आणि दैनंदिन व्यवहारात चांगला उपयोग होईल.

ग्रामविकास काय आहे हे समजून घेताना आधी 'ग्राम'म्हणजे काय हे समजून घ्यायला हवे. ज्या ठिकाणी जल–जंगल–जमीन–पशुधन यांच्या आधारावर जन म्हणजे लोक समुहाने राहतात त्याला ग्राम किंवा गाव म्हणता येईल. यामध्ये शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन असते. मग अशा गावात आधुनिक सेवा–सुविधा म्हणजे मोठ्या शाळा, कॉलेज किंवा दवाखाना असतीलच असे नाही. भारतातील सद्य स्थिती पाहता, काही गावात अशा सुविधा आहेत पण काही गावात नाहीत. मग आता दुसरा शब्द विकास याचा थोडा विचार करू. भारताची गेल्या हजारो वर्षांची परंपरा आहे ती या ग्रामीण जीवनाची आहे. असे जीवन जे प्रकृती म्हणजे निसर्गाची हानी न करता, निसर्गाच्या स्वाभाविक प्रक्रियांना धक्का न लावता जगता येते. पण गेल्या १५०–२०० वर्षात या जीवन पद्धतीत आमूलाग्र बदल झाला आहे, सध्या आपण जी जीवनपद्धती आपल्या आजूबाजूला पाहतो, ती या निसर्गाच्या संसाधनांना नुकसान करणारी आहे. आता हळू हळू सगळ्या जगाला याची जाणीव होत आहे. म्हणून आज ग्रामविकास हा अत्यंत कळीचा मुद्दा बनलेला आहे. आपण जर याच्यावर कामे केले नाही तर जगातून आपली भारतीय संस्कृती नष्ट होऊन जाईल.

संघ गेली अनेक वर्षे आपल्या पद्धतीने व्यक्ती निर्माणातून समाज परिवर्तनाचे काम करत आहे. त्या कामाची आपली एक गती आहे. पण सध्या ज्या गतीने समाज बदलत आहे त्या गतीने काम करण्यासाठी समाजाला सर्व मान्य असे काही कार्यक्रम संघ राबवतो. त्यालाच आपण गतीविधी असे म्हणतो. ग्रामविकास ही अशीच एक गतीविधी आहे. आपण जेंव्हा एखाद्या गावाचा विकास करतो तेंव्हा फक्त त्या गावाला नाही तर त्या परिसराला विकासाची एक योग्य दिशा देण्याचे काम आपण करत

असतो, आणि जेंव्हा अशा हजारो गावांचा विकास आपण करू तेंव्हा संपूर्ण देशाच्या विकासाला योग्य दिशा देण्यासाठी मदत होईल. म्हणून हे कार्य अत्यंत महत्वाचे आणि सध्याच्या काळात गरजेचे बनले आहे. पण हा विकास करणे म्हणजे नक्की काय करायचे?

आपण म्हणतो कि सप्त–संपदांचे पंच शक्तीच्या आधारे संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करणे म्हणजे ग्रामविकास. विकास म्हणजे फक्त भौतिक विकास नाही आणि भौतिक विकास सोडूनही अपेक्षित विकास करता येत नाही. गावाला जसा बहिरंग आहे तसाच अंतरंग आहे. तो आहे परस्परातील संबंध आणि सहयोग. गावात बहुतेक सर्वांना एकमेकांची माहिती असते, प्रेम असते. ही गावाची विशेषता आहे. आज आपण ३१८ गावांना प्रभात ग्राम केले आहे, पण गाव प्रभात झाले म्हणजे सर्व काही झाले असा अर्थ होत नाही. विकासाला काही मर्यादा नसते, त्यामुळे विकास ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जेंव्हा एखादे गाव विकासाच्या योग्य दिशेने चालायला लागते, तेंव्हा आपण त्याला प्रभात म्हणतो. म्हणून काम सतत करत राहिले पाहिजे. आणि ज्या दिशेला वाटचाल सुरु केली आहे त्या दिशेने पुढे पुढे जायला हवे.

आपण गावाचा विकास केला असे म्हणतो किंवा ग्रामविकास समितीने केला असे म्हणतो. प्रत्यक्षात काम करताना ग्रामसमितीने गावातल्या प्रत्येक परिवारातील लोकांच्या मनात काय आहे हे समजून कामाची दिशा ठरवायला हवी. ज्या कामात माणसाचे परिवर्तन अपेक्षित असते, तिथे एखादा निर्णय घेताना सर्वांचा सहभाग असणे आवश्यक असते. म्हणून जेवढ्या लोकांना आपल्या कामाशी जोडता येईल, तेवढ्या लोकांना जोडायला हवे. उदा. गावात आपण स्वच्छता उपक्रम करतो, त्याचा उद्देश असा असतो कि गावातल्या लोकांना स्वच्छतेचे महत्व पटावे आणि कोणीही आपल्या घराबाहेर कचरा फेकू नये. असे जर सर्वांनी केले तर एक दिवस असा येईल कि ग्राम–स्वच्छता करण्याची गरजच राहणार नाही. गावातले वाद–भांडणे गावात मिटली तर कोर्टात जायची आवश्यकताच राहणार नाही. कुठलीही समस्या मुळापासून मिटवायची असेल तर जास्तीत जास्त लोक–सहभाग आवश्यक आहे. म्हणून ग्रामविकास करताना कुठलाही भेदभाव न करता सर्वांना बरोबर घ्या. सगळ्यांना जेवढे जमेल तेवढे काम ते करतील. आत्ता सुद्धा काही सरकारी योजनांमधून विकासाची कामे होत असतील. त्याचा उपयोग करायला हरकत नाही पण योजना नाही म्हणून काम थांबवायचे नाही, गावातील लोकांनीच स्वतःचे प्रश्न सोडवण्याकरता काम केले पाहिजे.

ग्रामसमिती झाली म्हणजे आता विकासाचे काम फक्त त्यांनीच करायचे असा विचार गावातील लोकांनी करू नये. आपल्याकडे वेगवेगळे समाज गावात एकत्र राहतात. या सर्वांमध्ये मनातून एकता निर्माण व्हावी यासाठी आपण विशेष प्रयत्न करायला हवेत. आता आपल्या समोर राजकारण ही आणखीन एक मोठी अडचण आहे, त्यामुळे गावात बरेच गट–तट निर्माण झाले आहेत. याचा एक

परिणाम असा झाला आहे कि गावात कुणीही समाजसेवा करताना दिसला कि तो आता कुठल्यातरी निवडणुकीला उभा राहणार आहे असे सर्वांना वाटायला लागते. म्हणून राजकारण आणि प्रसिद्धी / फोटो अशांपासून लांब राहिलेलेच नेहमी चांगले असते.

कुठलेही काम करताना आपल्याकडे काहीतरी योजना आणि नियोजनबद्ध कार्यक्रम असायला हवा. पण तो कार्यक्रम योग्य दिशेने चालला आहे का हे पहायची देखील आवश्यकता आहे. आपण गावात एकत्र भोजनाचे कार्यक्रम घेतो – त्यामागे आपला उद्देश असतो कि गावातील विषमता कमी व्हावी सर्वांनी एकमेकांशी चांगले वागावे, भेदभाव करू नये. हा हेतू सध्या होतोय का याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. हे पहिल्या प्रयत्नात होणार नाही पण हळू हळू होत आहे याकडे आपण लक्ष ठेवले पाहिजे. प्रत्येक ग्रामसमितीने आपल्या सर्व कार्यक्रमांचे असे मुल्यांकन केले पाहिजे. आपल्या कार्यक्रमातून जो सामाजिक बदल अपेक्षित आहे तो होतोय ना याची चर्चा आपण मोकळ्या मनाने एकत्र बसून केली पाहिजे. मानसिक परिवर्तन झाल्या शिवाय कुठलेही काम शाश्वत होणार नाही हे आपण सर्वांनी नीट समजून घेतले पाहिजे. आणि म्हणूनच असे मुल्यांकन गरजेचे आहे. असा चांगला संस्कार देणे हाच आपल्या कामाचा गाभा आहे.

समाजाला प्रथम आर्थिक विकास हवा असतो, त्यांना स्वतःचे उत्पन्न वाढवायचे असते. त्यासाठी सुरुवातीला तसे कार्यक्रम घ्यायला काहीच हरकत नाही. शेतीचे उत्पन्न कसे वाढेल, देशी गायींच्या माध्यमातून चांगली शेती कशी होईल – असे उपक्रम घ्यायला हवेत. पण फक्त अशा उपक्रमात अडकून पडू नये. अशा कामा बरोबर त्यांना चांगला संस्कार देणे पण व्हायला हवे.

भारतात साधारण पाच – साडेपाच लाख खेडी आहेत. आपल्या कामातून आपल्याला ग्रामविकास ची एक लाट निर्माण करायची असेल तर आपल्याला किमान काही हजार गावांपर्यंत पोचले पाहिजे. म्हणून आपल्या गतीविधीची एक स्वतंत्र अशी चांगली टीम तयार झाली पाहिजे. त्यांनी प्रयोग करण्यासाठी त्यांचे निर्णय स्वतः घेतले पाहिजेत. त्यासाठी संघाच्या कार्यकर्त्यांशी सल्ला–मसलत जरूर करा, पण त्यांच्यावर अवलंबून राहू नका. आपल्या प्रांतामध्ये जिथे प्रभात ग्राम उभी राहिली आहेत, त्याच्या आजूबाजूची जी गावे आहेत, त्यांना बरोबर घेवून ग्राम–संकुल निर्माण करा. त्या सर्व गावांना आपल्या कामाशी जोडा, आपले विचार सांगा. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक विषयात काम करणाऱ्या तांत्रिक संस्थांची मदत घ्या. आपल्या कामाचे प्रत्यक्ष दस्तावेजीकरण केले पाहिजे. आपण नक्की कुठे होतो, आणि आता कुठे आलो आहोत हे लिखित स्वरुपात आणले पाहिजे, म्हणजे ते काम शाश्वत होण्याकरता मदत होईल. पुढच्या पिढीला याचा उपयोग होईल. काम करताना नवीन पिढीच्या लोकांना बरोबर घ्या, पुढे जाऊन त्यांनाच हे काम करायचे आहे.

जर आपल्याला उद्या कोणी विचारले कि तुम्ही गेली अनेक वर्षे ग्रामविकासाचे काम करत

आहात, तर कुठे पाहता येईल? मी त्यांना या ३१८ प्रभात गावात पाठवेन. तिथे चांगले काम पाहता येईल असे मी मानतो. फक्त आपल्याला त्याचे श्रेय घेता येणार नाही. जे काम झाले ते गावातल्या लोकांनी एकत्र येवून केले असे म्हणता येईल. त्याने गावकऱ्यांना आणखीन प्रेरणा आणि बळ मिळेल. पण आपल्या कामाचे मुल्यांकन आपण या सर्व प्रभात गावात नक्की केले पाहिजे. ही संख्या म्हणजे तशी खूप कमी आहे. पण पुढच्या वेळी आपण जेंव्हा भेटू तेंव्हा ही संख्या किमान याच्या पाचपट असली पाहिजे असे लक्ष्य ठेवा.

**ग्रामविकास कार्यकर्त्यांचे आचरण कसे असावे**

आज संपूर्ण समाज आपल्याकडे आशेच्या नजरेने पाहात आहे. आपण जे काम करतोय त्याने भारतीय समाजाचे भले होईल अशा पद्धतीचे सकारात्मक वातावरण आज आहे. त्यामुळे आपण जर एखादी चूक केली तर ती फक्त आपल्याला नाही तर सर्व समाजाला भोगावी लागेल. सगळ्यात पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे आपण काय करत आहोत हे आधी नीट समजून घेतले पाहिजे. कुठल्याही कामात घाई करू नये. काम करताना टोकाची भूमिका घेवू नये. काम करताना कुणालाही विरोध म्हणून काम करू नये. वाद-विवाद टाळावेत. जेंव्हा २ गट दिसतील, २ पर्याय दिसतील तेंव्हा मध्यम मार्ग निवडावा. समाजात नेहमीच आक्रमक लोक असतात, त्यांच्या मनाविरुद्ध काही झाले किंवा त्यांना एखादी गोष्ट पटली नाही तर लगेच प्रतिक्रिया देतात. आपल्या बरोबरही असे काही कार्यकर्ते असतील कारण आपणही समाजाचाच एक भाग आहोत. आपला संतुलित पणा आपण नेहमी जपावा. काही वेळा आपण प्रत्युत्तर देतो पण ते दुसऱ्याला उत्तर द्यायचे म्हणून नाही. तर आपली बाजू मांडण्यासाठी. आपली भूमिका अशी असते कारण बहुतेक वेळा प्रतिक्रिया / प्रत्युत्तर यातून निष्पन्न काही होत नाही असा आपला आत्ता पर्यंतचा अनुभव सांगतो. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आपण जे विचार मांडतो ते आपल्या आचरणात सुद्धा दिसले पाहिजेत. आपण आपल्या कुटुंबियांसोबत, आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी आणि समाजात कसे वागतो याची आपण नीट काळजी घेतली पाहिजे. राजकारणा पासून आपण लांब राहायला हवे. कार्यक्रमात राजकीय व्यक्तींना बोलवायला हरकत नाही पण कार्यक्रमाचे स्वरूप राजकीय होऊ नये यासाठी आवश्यक ती काळजी घ्या. कोणत्याही राजकीय पक्षांचे बॅनर आपल्या उपक्रमात किंवा सभेत लागणार नाहीत याकडे विशेष लक्ष द्या. कार्यक्रमाला बोलावताना सगळ्या राजकीय पक्षाच्या लोकांना बोलवा. कोणालाच असे वाटायला नको कि आपण एखाद्या पक्षाला मुद्दामून लांब ठेवत आहोत. कारण कामात राजकारण आले कि पक्ष पडतात, स्वाभाविक विरोधी तयार होतो. आणि आपल्याला तर सर्वांना बरोबर घ्यायचे आहे. आपल्या कार्यक्रमाची प्रसिद्धी होण्यामागे लागू नका. त्यातून श्रेयवाद सुरु होतो. समजा आपण स्थानिक

कार्यक्रमाची बातमी फोटो सहित पेपर ला दिली, तर सुरुवातीला आपल्याला त्याचे फार महत्व वाटणार नाही. मग पुढच्या वेळी आपण आपला फोटो त्यात आला का हे नकळत पणे पाहतो, असे हळू हळू ते आपल्या मनात शिरते. असे इतर कार्यकर्त्यांना देखील वाटणे स्वाभाविक आहे, म्हणून कुणीही दुखावला जाईल असे काही करू नका. लोकांना आपल्यावर विश्वास वाटेल अशा पद्धतीने काम करा. विशेषत: आर्थिक देवाणघेवाण कमीत कमी करा. जे काही व्यवहार होतील त्याची माहिती सगळ्यांना असेल आणि व्यवहार करताना किमान २–३ जण आपल्या बरोबर असतील असे पाहा. कोणी आपल्याकडे बोट दाखवू शकेल असे वागू नका. असे वागलात तर समाजाचा विश्वास तुमच्यावर बसेल आणि ते तुम्हाला साथ देण्यासाठी नक्की पुढे येतील. ग्रामविकास चे काम करताना २४ तास या गोष्टी आपल्या स्मरणात ठेवा.

***

## निवडणुकीचे राजकारण, गावचे भेदी व गावाची दुर्दशा, ग्रामनिर्मितीचा पाया, सेवा-संघटनेची बांधणी आणि आवश्यकता

लोक राहावेत पंखाखाली । म्हणजे आपुली पोळी पिकली ।
म्हणुनी खेळती अनेक चाली । सोंग घेवोनी सेवेचे ।।
देती मिळवोनी दुर्मिळ सामान । कोणास काही प्रलोभन ।
व्यसनी गुंडास देती प्रोत्साहन । करिती संपादन प्रेम ऐसे ।।
नाना तऱ्हेचे वाद वितंड । नाना पक्षांचे माजवले बंड ।
कधी आड कधी उघड । सुरु झाले कार्य त्यांचे ।।
नाही कोणा सेवेचे भान । घालिती सत्तेसाठी थैमान ।
गाव केले छिन्नभिन्न । निवडणुकी लढवोनी ।।
साधन ज्याचे मुळात अशुद्ध । त्याचा परिपाक कोठुनी शुद्ध ? ।
लोका पिळोनी व्हावे समृद्ध । गावी दुफळी माजवोनी ।।
आता सांगा काय करावे? । कासयाने गाव सुधारावे? ।
जे जे होईल ते ते पाहावे । ऐसे वाटे निराशपणे ।।
ऐसे असावे धोरण । तेचि कार्यकर्त्यासी भूषण ।
गाव निर्मावया आपुले प्राण । पणा लावावे ।।
विरोध होता बसावे घरात । ऐसे नोहे सेवेचे व्रत ।
गंगा घाबरती पाहोनि पर्वता । तरी सागरा न मिळती ।।
ग्रामसेवाची ईश्वर सेवा । ऐसे समजावोनी जीवा ।
गाव सेवेसी तत्पर करावा । सर्वतोपरी ।।
निःपक्षपणे बौद्धिके द्यावी । सर्वांची समजूत पटवावी ।
बुद्धी गावाची सांभाळावी । प्रचाराद्वारे ।।
असो, नसो साथ सत्तेचा । सहयोग मिळवावा सज्जनांचा ।
जनसेवकांनी ग्रामराज्याचा । पाया रचावा सत्यावरी ।।
ज्यांना ज्यांना न्यायाची चाड । आणि गाव सेवेची आवड ।
त्यांचीच संघटना व्हावी दृढ । करावी वाढ दिसंदीस ।।
जाणता दिसेल तो निवडावा । जिव्हाळ्याचा पुरुष वेचावा ।
थोरांचीया नेतृत्वे चालवावा । कारभार ग्रामोन्न्तीचा ।।
गावातील एकेक सज्जन । शोधून घ्यावे त्यासि जोडून ।
सेवाभावी मंडलची संपूर्ण । तयार करावे प्रयत्ने ।।
ऐसे झाले कि झाली संघटना । लागली सुरु गाव सुधारणा ।
झाला मुला, माणसांचा बाग पुन्हा । जिताजागता प्रेमळपणे ।।
तेथे नवनवी योजना फुले । विकसोनी देतील गोड फळे ।
ग्रामराज्याचे स्वप्नही भले । मूर्त होईल त्या गावी ।।

**ग्रामगीता - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

*

# १०. सप्त-संपदा - सविस्तर माहिती

आपण प्रकरण ५ मध्ये सप्त–संपदांची थोडक्यात ओळख करून घेतली. या प्रकरणात आपण त्यापैकी काही संपदांची सविस्तर माहिती घेणार आहोत.

## १) भू–संपदा : श्री. प्रताप चिपळूणकर (पुस्तक: जमिनीची सुपीकता)

मानव 'आदिमानव' स्वरूप बदलून वसाहत करू लागला, तेंव्हापासून त्याने शेतीस सुरुवात केली असे मानले जाते. त्या काळातही लोकांना जमिनीच्या सुपीकतेविषयी माहिती असावी. बहुतेक प्राचीन संस्कृतीचा शोध नदीकाठच्या सुपीक गाळाच्या जमिनीच्या परिसरातच सापडतो. त्यातल्या त्यात दोन नद्यांच्या संगमाजवळ प्राचीन संस्कृती वाढलेली दिसते. त्यालाही सुपीक जमीन हेच कारण आहे. त्या काळात जंगले, जमिनी भरपूर व लोकसंख्या कमी असल्याने, एका भागातील जंगल तोडून त्या ठिकाणी शेती केली जायची. त्या ठिकाणी उत्पादन कमी होऊ लागताच, तो भाग सोडून दुसऱ्या ठिकाणी पुन्हा जंगल तोडून नवीन जागी शेती केली जात असे. जंगलाखाली काही वर्षे जमीन राहिल्यानंतर ती सुपीक बनते याची जाणीव असल्याचे ते द्योतक आहे. अनेक ठिकाणी जमिनीतून दोन वर्षातून एकदाच पिक घेण्याची पद्धत होती. जमीन पड ठेवल्याने त्याची सुपीकता अगर उत्पादकता वाढते असा अभ्यास इतिहास काळात होता, असे काही इंग्रज अधिकाऱ्यांनी सुद्धा लिहून ठेवले आहे.

सपाट जमिनीत शेती केली जात असे व डोंगराळ भागात जंगले असत. जंगलातील पानगळीच्या आच्छादनातून निचरून येणाऱ्या पाण्यावर पिके चांगली येत असल्याचे दाखले सापडतात. स्वयंचलित वाहने येण्यापूर्वी प्रवासी आणि मालवाहतूक प्राण्यांकडून होत असे. यामुळे दूध, शेती आणि मालवाहतुकीसाठी प्रत्येक घरात प्राणी पाळले जात. त्यांच्या शेणाच्या ढिगावर वनस्पती अतिशय जोमदार वाढत असल्याने कुणीतरी शेत जमिनीत शेणापासून तयार होणाऱ्या खताचा वापर सुरु केला असला पाहिजे. यातून सुरु झालेली शेणखत, कंपोस्ट वापराची प्रथा आजही कायम आहे. जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी पिकाच्या पेरणी पूर्व मशागतीत वर्षभर साठवलेल्या शेणाच्या ढिगापासून चांगले कुजून तयार झालेले खत जमिनीवर विस्कटून कुळवाच्या पाळीने ते खत मातीत कालवण्याची प्रथा अशीच रूढ झाली असावी. ताजे शेण वाहतूक करणे त्रासदायक असते व

रानात एकसारखे विस्कटता येत नाही. या उलट चांगले कुजलेले खत वाहतूक करणे व विस्कटणे सोपे असते. आजही विद्यापीठे आणि कृषि खात्याची शिफारस तीच आहे. जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी शेतकरी आजही प्रामुख्याने शेणखत व कंपोस्ट खत यावर अवलंबून आहे. काही शेतकरी हिरवळीचे खत, पेंडी, लेंडीखत, सोनखत, प्रेसमड यासारख्या इतर सेंद्रिय खतांचा वापर करताना दिसतो.

जमिनीची सुपीकता म्हणजे जमिनीची उत्पादन क्षमता असे म्हटले जाते. पीक उत्पादनासाठी जी कामे आपण करीत असतो, त्यापैकी अनेक कामे जमिनीच्या सुपीकतेशी निगडीत आहेत असे मानले जाते. वास्तविक सुपीकता आणि उत्पादकता या दोन पूर्ण भिन्न गोष्टी आहेत हे आपण लक्षात घ्यायला हवे. खोल उभी–आडवी नांगरणी, ढेकळे फोडणे, कुळवाच्या पाळ्या देवून शेतकरी वर्ग अत्यंत भक्ती–भावाने सर्व मशागतीची कामे करत असतो. वखर अगर पाटा मारून तयार केलेली अशी काळीभोर एकसारख्या रंगाची जमीन पाहून त्याचे नेत्र सुखावतात. अशा कामांनी जमिनीची सुपीकता वाढते, असा शेतकरी प्रगतीशील आणि जमिनीची योग्य काळजी घेणारा असे मानले जाते. या कामासाठी शेतकरी मोठा खर्च करतात. पूर्वी बैल वापरले जात होते, आता ट्रॅक्टरचा वापर केला जातो. नव–नवीन अवजारे या कामासाठी विकसित करण्यासाठी जगभरात संशोधन चालू आहे. कंपोस्ट खत तयार करण्याच्या विविध पद्धती विकसित झाल्या आहेत. नाडेप पद्धत, गांडूळ खत, बायोडायनॅमिक खत, ट्रायको कंपोस्ट असे काही नवीन प्रकारही प्रचलित होत आहेत. हे नवीन प्रकार शेतकरी वर्गात लोकप्रिय होण्यासाठी आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी त्याचा वापर करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था, कृषी विद्यापीठे, शासनाचा शेती विभाग काम करताना दिसतात.

**कृषि शास्त्रात जमिनीच्या सुपीकतेचा अभ्यास तीन अंगांनी केला जातो.**

१) भौतिक सुपीकता: जमिनीत असणारे वेगवेगळ्या प्रकारचे मातीचे कण, मातीचं रंग, तिची खोली, मातीत असणारा सेंद्रिय पदार्थ, जलधारण क्षमता, जमिनीची कणरचना, मातीची घनता अशा विविध घटकांचा समावेश होतो. शेतकऱ्यांच्या मातीचा अभ्यास सहसा या अंगाने केला जात नाही.

२) रासायनिक सुपीकता: वनस्पतींना वाढीसाठी जी अन्नद्रव्ये लागतात, त्यांचे प्रमाण जमिनीत किती आहे हे यात तपासले जाते. माती परीक्षणातून जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्ये मोजली जातात आणि नंतर काही कोष्टकांचा वापर करून, खत मात्रेच्या शिफारशी केल्या जातात. आम्ल–विम्ल निर्देशांक (सामू), सेंद्रिय कर्बाची टक्केवारी आणि विद्युत वाहकता हे गुणधर्मही मोजले जातात. विद्युतवाहकता समजल्याने जमिनीत असणाऱ्या क्षारतेच्या प्रमाणाबाबत माहिती मिळते. सेंद्रिय कर्बाचे प्रमाण सुपीकतेच्या आणि उत्पादकतेच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे

आहे. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचे रासायनिक पृथक्करण वर्षातून एकदा केले जावे अशी शिफारस केली जाते. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रयोगशाळा आहेत. सरकारी योजनातून असे माती परीक्षण करून शेतकऱ्याला जमिनीची आरोग्य–पत्रिका देत आहे. गेल्या काही वर्षात याच्यावर माध्यमातूनही बराच उहापोह होत आहे. परंतु हे तंत्र शेतकऱ्यात का फारसे लोकप्रिय का होत नाही हा संशोधनाचा विषय होईल. खरोखर शेतकरी उदासीन आहे कि या तंत्रातच काही त्रुटी आहेत याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

३) जैविक सुपीकता: पाच–दहा वर्षांपूर्वी याबद्दल फारशी चर्चाच नव्हती. जमिनीची सुपीकता आणि पीकपोषणात असलेला सूक्ष्म जीवांचा सहभाग याबाबत बरीच जागृती झाल्याने रासायनिक पृथक्करणाबरोबर जैविक पृथक्करण देखील उपलब्ध करून द्यावे अशी मागणी काही ज्ञाती मंडळी करत आहेत. याचा आधार आहे जमिनीचा जिवंतपणा. हा जिवंतपणा जमिनीला नेमका कशामुळे येतो यावर फारशी चर्चा होताना दिसत नाही. जमिनीत असणाऱ्या लहान मोठ्या सूक्ष्म जीवांच्या अस्तित्वाने हा जिवंतपणा येत असतो. कोणतीही वनस्पती मग ते तण असो वा पीक, या सूक्ष्म जीवांशिवाय त्याची वाढ होऊच शकत नाही.

आपण गेल्या ४–५ दशकातील शेती पद्धतीचा आढावा घेतला तर लक्षात येते कि सर्व संशोधन हे उत्पादकता वाढवण्यावर झाले आहे. पण ज्या जमिनीतून आपण हे उत्पादन घेतो तिचे आरोग्य – म्हणजे तिची सुपीकता कशी टिकून राहील याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले आहे. शेतीतील ट्रॅक्टरच्या वाढत्या वापरामुळे गाय–बैलांची संख्या सर्वत्र रोडावली आहे आणि त्यामूळे घरातून स्वाभाविक रित्या मिळणारे शेणखत सुद्धा जमिनीला मिळेनासे झाले आहे. दुसऱ्या बाजूला रासायनिक खतांचा वापर मात्र नियमितपणे चालू आहे. याचा परिणाम असा झाला आहे कि हरित क्रांतीच्या सुरुवातीची काही वर्षे चांगले उत्पादन मिळाले पण जमिनीची सुपीकता कमी होत गेली आणि आज वेळ अशी आली आहे कि तुम्ही कितीही रासायनिक खते टाका, जमिनीची उत्पादन क्षमता एका पातळीच्या वर जाऊ शकत नाही. आपला शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन व्यापारी झाल्यामुळे रोख पैसे देणारे पीक (ऊस, सोयाबीन, कापूस, मका) घेण्याचे प्रमाण वाढले पण ते पीक आपल्या जमिनीला योग्य आहे का याकडे दुर्लक्ष झाले, याचाही परिणाम म्हणून सुपीकता घटली, मातीचा कस कमी झाला.

## सुपीकता कशी वाढवाल ?

जमिनीच्या सुपीकतेचा अभ्यास करताना, नैसर्गिक जंगल नियमांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. पृथ्वीतलावर लाखो वर्षे जंगले आपला सुपीकपणा टिकवून जोमाने वाढताना दिसतात. तिथे कोणताही मानवी हस्तक्षेप नसतो त्यामूळे रासायनिक किंवा इतर खते दिली जात नाहीत, तरीही

तिथले वृक्ष फुले-फळे यांनी लगडलेली पाहायला मिळतात.जंगलात अनेक प्रकारच्या वनस्पती वाढत असतात. यामध्ये खुरटे गवत, उंच गवत, लहान-मोठी झुडपे, लहान-मोठे वृक्ष असे अनेक प्रकार असतात. या वनस्पतींवर तिथली प्राणी, पक्षी सृष्टी अवलंबून असते. त्यांची विष्ठा, मृत शरीरे त्याचं परिसरातील मातीत विलीन होत असतात. पानगळ होऊन नैसर्गिक रित्या जमिनीवर आच्छादन तयार होत असते. जमिनीलगतचा थर कुजून मातीत विलीन होत राहतो. जंगलात जे जे निर्माण होते ते ते तिथेच वापरले जाते व सर्व भाग जमिनीत विलीन होत असतो. या विलीनीकरणातून वनस्पतींच्या वाढीसाठी लागणारी अन्नद्रव्ये उपलब्ध होत राहतात. निर्माण होणे आणि संपल्यानंतर विलीन होणे यातून जमिनीचे अन्नचक्र पूर्ण होते. शास्त्रीय भाषेत याला कर्बचक्र म्हटले जाते. जसे जंगलाचे कर्बचक्र आहे तसेच शेताचेही आहे. पिके वाढणे हा कर्बचक्राचा अर्धा भाग आहे. पिकाचे शेष भाग कुजून जमिनीत विलीन होणे हा दुसरा भाग. तेच जमिनीचे म्हणजे जमिनीतल सूक्ष्म जीवांचे अन्न आहे.आपण फक्त पहिल्या भागाचा म्हणजे पिकाचा खूप विचार करतो. कोणते पीक घ्यायचे, बियाणे कुठले, खते, कीटकनाशके, तण-नाशके, मशागत इ. बाबींचा खूप विचार करतो. कधीतरी जमिनीला शेणखत, कंपोस्ट खताचा नैवेद्यही दाखवतो पण त्याने शेतीचे कर्ब-चक्र कसे पूर्ण होणार? निसर्ग-शेतीचा एक मुलभूत नियम आहे - पिकाचा आपल्याला आवश्यक तेवढाच भाग घ्या आणि बाकी सर्व जमिनीला परत द्या. मानवाने पिकाच्या प्रत्येक भागाचे अनेक उपयोग शोधून काढले आहेत. आणि काहीच उपयोग नसेल तर शेवटी जळण म्हणून आहेच. अशाने जमिनीची सुपीकता कशी टिकणार. म्हणूनच जीवामृत, अमृतपाणी यासारख्या तंत्रांबरोबर जमिनीतील सेंद्रिय पदार्थ वाढवण्यासाठी जेवढे पिकांचे अवशेष जमिनीत तिथल्या तिथे कुजवता येतील तेवढे कुजवा. त्यातून सुपीकता वाढीला नक्की मदत होईल. हा निसर्गाचा नियम आहे हे लक्षात घ्या.

**जमिनीची सुपीकता ओळखण्याची सोपी तंत्रे:**

जमिनीचे आरोग्य कसे ओळखावे यासाठी माती परीक्षण करून घ्या असे सुचवले जाते. पण माती नमुना गोळा करण्यासाठी सुद्धा अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने घ्यावा लागतो, जो बरेच जण घेत नाहीत. अशा माती परीक्षणात तपासले जाणारे घटक म्हणजे आम्ल-विम्ल निर्देशांक, विद्युत-वाहकता (क्षारता), उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश, सूक्ष्म अन्नद्रव्ये वगैरे जी मोजले जातात, त्यावर खतमात्रेच्या शिफारशी केल्या जातात. पण त्याचे गणित क्लिष्ट असते आणि मुळात माती नमुनाच नीट घेतला नसेल तर या शिफारशी फोल ठरतात. या सगळ्याचा नेमका अर्थ आणि त्याचा दैनंदिन शेतीच्या कामात कसा उपयोग करून घ्यायचा हे सर्व सामान्य शेतकऱ्याला समजणे थोडे अवघड आहे. अपवादात्मक तांत्रिक शिक्षण न घेतलेले काही शेतकरी अभ्यासाने या ज्ञानात चांगले प्राविण्य

मिळवलेले आढळतात. पण त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. पूर्वी वैद्य नाडी परीक्षणाने तब्येतीबाबत अनेक गोष्टो जाणून घेत असत. त्याच प्रमाणे सर्वसामान्य शेतकरी जमिनीची सुपीकता समजू शकेल अशा काही सोप्या पद्धती / निर्देशांक आहेत का? याचे उत्तर होय असे आहे आणि खाली अशाच काही गोष्टींची यादी दिली आहे. याचा वापर करून शेतकरी स्वतः आपल्या जमिनीची सुपीकता पातळी पारखून घेवू शकेल.

१) जमीन नांगरत असता, ट्रॅक्टरने काळा धूर मारू नये, बैलांना सहज नांगर ओढता यावा. त्यांचे खांदे येवू नयेत, त्यांना प्रचंड धाप लागू नये. म्हणजेच जमीन जास्त कडक नसावी.

२) नांगरणी करताना, मोठी ढेकळे उठू नयेत, नांगरणी नंतर ४ दिवसांनी अशी ढेकळे दगडासारखी न होता सहज लाथ मारली तर बारीक होऊन जावीत.

३) नांगरलेल्या रानात चालताना पायाला खरटेलागू नयेत, पाण्याची एखादी पाळी लांबली तरी पीक वाळू नये, पाण्याचा ताण सहन करण्याची ताकत ही जमिनीच्या सुपीकतेवर अवलंबून असते.

४) भांगलणी, निंदणीचे काम कमी कष्टात झाले पाहिजे. तण काढताना खुरपे सहज रानात खुपसता आले पाहिजे. लव्हाळा, हरळी सारखी बहु-वार्षिक तणे मूळ गाठीसह सहज निघाली पाहिजेत. एखादे तण उपटल्यानंतर जमीन योग्य वाफस्यात असेल तर नुसते तण झाडले तरी त्याच्या मुळाला चिकटलेली सर्व माती खाली पडावी.

५) रासायनिक खतांचा जास्त वापर करण्याची आवश्यकता पडू नये. त्याशिवाय चांगले उत्पादन मिळावे.

६) उत्पादनाचा दर्जा उच्च प्रतीचा असावा, जातीनुसार त्याला स्वाद, गंध आणि चव असावी

अशी लक्षणे दिसल्यास जमीन सुपीक आहे, अगर होत चालली आहे असे समजावे. तसे होत नसल्यास काहीतरी घोटाळा आहे असे समजावे. सुपीकतेचे अनेक प्रश्न सेंद्रिय कर्बाच्या पातळीशी जोडलेले आहेत. त्यामुळे त्याची पातळी योग्य ठेवणे, शेतकऱ्याचे प्राथमिक कर्तव्य ठरते. त्यासाठी एक गोष्ट लक्षात ठेवावी. १००% जमिनीचा वापर आपल्या पोटासाठी आणि खिशासाठी करण्याचा अधिकार आपल्याला निसर्गाने दिलेला नाही. सूक्ष्मजीव हे आपले शेतातील वाटेकरी आहेत. त्यांचे पोट भरले तर आपले भरणार आहे. जमिनीचा काही हिस्सा त्यांचे पोट भरण्यासाठी ठेवावा व त्यात जे निर्माण होईल ते जमिनीला अर्पण करावे.

*

## २) ग्रामविकासाची गुरुकिल्ली – एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प

गावामध्ये धो धो फुकट पडणारा पाऊस वाहून जाऊ द्यायचा व नंतर तेच पाणी टँकरद्वारे वाजत गाजत आणून टंचाईग्रस्तांना पुरवायचे, अशा उलट्या नियोजनामुळे आज सद्य:परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. पावसापासून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व्यवस्थापनाद्वारे माथा ते पायथा पाणलोट उपचार केल्यास, दुष्काळावर मात करून जलसमृद्धी आणणे शक्य आहे. गरज आहे ती फक्त इच्छाशक्ती व शास्त्रशुद्ध लोक सहभागीय नियोजन करून अंमलबजावणीची.

**प्रस्तावना :**

पाणी, जमीन, हवा, सूर्यप्रकाश, मनुष्यबळ या साधन सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेला भारत हा एकमेव देश आहे. महाराष्ट्राचा विचार करता जल व्यवस्थापनाअभावी दोन वर्षाला एकदा कोरडा दुष्काळ व पाच वर्षाला एकदा ओला दुष्काळ नित्याचेच झाले आहे. नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण व संवर्धन करणारी आपली महान संस्कृती व परंपरा आहे. ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायामध्ये **नगरेची वसवावी । जलाशये निर्मावी । महावने जगवावी । नानाविध ।।** समर्थ रामदासांच्या दासबोधातही अनेक वचने आपल्याला आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांनीही गड किल्यावर खंदक खोदून पुढचा पाऊस येईपर्यंत पाणी पुरेल अशी मजबूत रचना असलेली तळी गड किल्ल्यावर बांधली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर व महात्मा ज्योतिबा फुले यांनीही जागोजागी नदीवर घाट, तळी, बांधण्याकडे विशेष लक्ष दिल्याचे आढळते. थोडक्यात आजपर्यंतच्या सर्वच इतिहासात त्या त्या वेळच्या शासकानी, सुधारकांनी, साधुसंतांनी पाऊस यांचा सविस्तर व शास्त्रोक्त अभ्यास करून जलसंपत्ती व कृषी विकासाचे प्रयत्न केल्याचे आढळून येते.

**आजतागायतचे प्रयत्न व अनुत्तरीत प्रश्न :**

देशातील एकूण धरणांपैकी पन्नास टक्के धरणे ही महाराष्ट्रात असूनही सिंचनाखालील क्षेत्र फक्त अठरा टक्के आहे. यापैकी पन्नास टक्के सिंचन क्षेत्र भूजलावर अवलंबून आहे. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, जोपर्यंत आपण करोडो रुपये खर्च करून जी धरणे बांधली आहेत, त्यामुळे फक्त नऊ टक्के क्षेत्रच ओलीताखाली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रातील उपलब्ध सर्व जलसंपत्तीचा विकास करण्यासाठी वेळोवेळी विविध आयोग (बर्वे आयोग, सुखठणकर समिती, सिंचन आयोग) यांची स्थापना करून त्यांच्याकडे जलसंपत्ती विकासाची जबाबदारी सोपविण्यात आली. सारांशरूपाने या सर्वांचे मत होते महाराष्ट्रातील सर्व जल संपत्तीचा विकास केल्यानंतर फक्त तीस टक्केच क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकते. उर्वरित सत्तर टक्के क्षेत्रासाठी एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व्यवस्थापनाशिवाय पर्याय नाही. करोडो रुपये खर्च करून आजपर्यंतच्या अथक प्रयत्नातून आजही

महाराष्ट्रात प्रत्येक वर्षी पिण्याच्या पाण्यासाठी वीस हजार खेडी टँकरवर अवलंबून असून, उर्वरित ८२ टक्के जमीन वर्षानुवर्षे पाण्यासाठी आसुसलेली आहे. यामुळे ग्रामीण महाराष्ट्र अस्थिर असून यातून सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. हे असेच चालू राहिले तर समाज म्हणून आपल्याला परवडणारे नाही.

**अनुत्तरीत प्रश्न**

१) महाराष्ट्रातील चौव्वेचाळीस हजार गावापैकी वीस हजार गावांना आपण अजूनही शाश्वत पाणीपुरवठा करू शकलो नाही.

२) आजपर्यंतच्या दुष्काळ निवारणाचे अथक प्रयत्न करूनही ८२ टक्के क्षेत्राला पाणी देऊ शकलो नाही

३) एकूण जमिनीपैकी तेहतीस टक्के जमीन वनाच्छादित असणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात महाराष्ट्रात हे क्षेत्र सतरा टक्क्यापेक्षा पुढे नाही.

**नवी दिशा**

सद्यपरिस्थितीत ग्रामीण भागासाठी एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व्यवस्थापन म्हणजे सर्वसामान्य माणसाला उर्जित अवस्था प्राप्त करून देणारा, सामूहिक कृषि विकासाला गती प्राप्त करून देणारा व राष्ट्राला आर्थिक शाश्वत उत्कर्षाकडे नेणारा महत्त्वाचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे.

आजतागायतच्या अथक प्रयत्नातून राबविलेल्या विविध योजनांतून महाराष्ट्रातील ८२ टक्के क्षेत्राला अजूनही आपण पाणी देऊ शकलो नाही. पर्जन्य छायेवर अवलंबून असलेल्या शेती व शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण जनतेला न्याय देण्यासाठी पर्यायी जलनीतिचा विचार करावा लागेल. महाराष्ट्रातील एकूण जलसंपत्तीचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करून विकेंद्रित जलसाठे निर्माण करण्यासाठी एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व्यवस्थापनाचाच विचार करणे काळाची गरज आहे. यासाठी आपल्याला माथा ते पायथा खालीलप्रमाणे पाणलोट उपचार करणे आवश्यक आहे.

**क्षेत्रिय उपचार**

मृद व जलसंधारणाचे उपचार करताना त्यास वृक्ष व कुरण विकास कार्यक्रमाची जोड दिल्यास त्याचे परिणाम अधिक टिकावू आणि कायमस्वरूपी होतात, असा अनुभव आहे. यामुळे अनमोल मातीची धूपही थांबते व पर्यायाने जमिनीत ओल टिकून राहते.

**१. सामाजिक वनीकरण / कुरण विकास :** ही उपचार पद्धती सर्वसाधारणपणे खडकाळ सरकारी गायरान अथवा खाजगी पडीक जमिनीवर उपयोगी आहे. हे काम २० x ०२ x १ फुटात आवश्यकतेनुसार या आकाराचे चर खोदून दर हेक्टरी १०८० रोपे लावण्यात येतात. प्रत्येकी दोन चरामध्ये जनावरास उपयुक्त (हेमाटा मारवेल) गवताची लागवड करण्यात यावी.

या उपचार पद्धतीमुळे पावसाचे पडलेले पाणी सरळ जमिनीवर न पडता गवत व झाडावर पडते. त्यामुळे मातीची धूप होत नाही. शिवाय दर हेक्टरी २२४ घ. मी. पाणीसाठा (चरामध्ये) होऊन भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते.

**२. समतल सलगचर :** समतल सलगचर ही उपचारपद्धती पाणलोटाच्या वरच्या भागात विशेषत: जास्त उताराच्या जमिनीवर घेण्यात येते. हे काम ०१ मी. ू ०१ मीटर मापाच्या आकारात सलगचर खोदून सलगचरची माती बर्म सोडून उताराच्या बाजूला टाकावी. यामुळे १. चर कंटुरवर असल्यामुळे जमिनीच्या सर्व भागात सारख्या प्रमाणात पाणी मुरते. २. पाण्याबरोबर वाहून जाणारी सुपीक माती चरामध्ये अडून जमिनीची धूप थांबण्यास मदत होते.

**गलीप्लग**

ही उपचार पद्धती जमिनीची प्रत व जमिनीचा उतार यावरून ठरविण्यात येते. मुख्यत्वे करून डोंगराळ व जास्त उताराच्या जमिनीवर मातीचे गलीप्लग उपयोगी पडतात या उपचार पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे यामुळे जल व मृदसंवर्धन होते.

**शेत तळे**

ही उपचार पद्धती सर्वसाधारणपणे पाणलोटाच्या माथ्यावरील पाणी विविध उपचार पद्धतीद्वारे काढून देऊन ते नाल्यात सोडले जाते. अशा ठिकाणी ही पद्धत उपयोगी ठरते. यामध्ये २० x ३० x ३ मीटर आकाराच्या जागेमध्ये खड्डा घेऊन त्याच्या बाजूस योग्य उतार देऊन बाजू व तळ सीलबंद केले जाते. त्यामुळे प्रत्येक शेततळ्यात सर्वसाधारणपणे २१८७ घ. मी. पाणी साठी केला जातो.

या उपचार पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे पाणलोटातील भूगर्भाच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन हे पाणी शेतकऱ्यास, जनावरास, पिण्यास उपयोगी व काही वेळा गरजेनुसार तळ्यातील पाणी उपसून पिकास पण देता येते.

याचबरोबर जमिनीचा प्रकार व उतारानुसार जल व मृद संधारणासाठी खालील उपचार पद्धती उपयुक्त आहेत. १. जैविक बांध, २. ब्रश वूड डॅम, ३. माती बांध. ४ सिमेंट बांध इत्यादी.

वरील प्रकारचे एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व्यवस्थापनाचे अनेक प्रयोग महाराष्ट्रात व इतर राज्यातही यशस्वी झाले आहेत. उदा. थोर सामाजिक कार्यकर्ते १. श्री. अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धी येथे राबविलेला प्रकल्प. २. श्री. पोपटराव पवार यांनी राबविलेला हिवरे बाजाराचा प्रकल्प. ३. बारीपाडा येथे चैत्राम पवार यांनी राबविलेला प्रकल्प. ४. ग्रामविकास संस्थेने राबविलेला नित्ते नदी पुनरुज्जीवन अभियानाचा प्रकल्प असे अनेक प्रयोग राज्य व देशपातळीवर यशस्वी झालेले आहेत.

वरील पथदर्शक प्रयोगाच्या यशस्वीतेमुळे जलसंपत्ती व नैसर्गिक संसाधने या विषयाचा

पूर्णपणे नव्याने विचार आणि कृती करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. जलसंपत्ती नियोजनातील ज्या गोष्टींना नेमकी उत्तरे सापडत नव्हती, ती सापडली असल्याचे या प्रयोगामुळे सिद्ध झालेले आहे. गावोगावी जलसंपत्ती व नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास करण्याची धुरा या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना यांनी हातात घ्यायला हवे.

सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या असंख्य व्यक्ती/संस्थाचे हात या कामाला लागण्याची गरज आहे. गावोगावचे लोक यासाठी सहकार्य करण्यात उत्स्फूर्तपणे पुढे येतील असा विश्वास मला वाटतो. कारण विकासाची गंगोत्री थेट त्याच्या शेतातच उगम पावले. विकास प्रवाहाचा उगम पावणारी गंगोत्री आणि आजपर्यंत गुप्त स्वरूपात वसणारी सरस्वती नदी प्रत्येक खेड्याखेड्यातून प्रकट व्हायला असुसलेली आहे. गावातीलच गंगा आता गावातीलच कावेरीला जोडायला हवी. भरभरून पाणी देणाऱ्या या निसर्गाशी आता दृढ मैत्री करायला हवी. पावसाचा थेंब अन् थेंब समृद्ध करायला हवा.

**लोक चळवळ**

या पुढच्या काळात पाण्याबाबत चर्चा, चिंता व चिंतन करत बसण्यापेक्षा तीव्र पाणी टंचाई व दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी कृतीची जोड देऊन समन्यायी पाणी वाटपासाठी स्वयंसेवी संस्था, धार्मिक विविध संघटना, महाविद्यलायीन युवक, शेतकरी, महिला मंडळ यांच्यामार्फत सजग प्रगल्भ सामाजिकदृष्ट्या जबाबदार, लोकाभिमुख, लोकमान्य अशी एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व्यवस्थापनाची लोकचळवळ उभी केल्यास दुष्काळमुक्त जलसमृद्ध महाराष्ट्र उभा राहील. यासाठी आपल्या योगदानाची अपेक्षा.

**नरहरी शिवपुरे,** सचिव
ग्रामविकास संस्था

*

## ३) गो–संपदा : श्री. शेखर धर्माधिकारी

धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ जीवनामध्ये सांगितले आहेत. या चार पुरुषार्थाने मानवी जीवन यशस्वी होते अशी आपली भारतीय संस्कृतीत धारणा आहे. पण गेल्या ४ दशकांपासून त्यातला 'अर्थ' हा एकमेव पुरुषार्थ जीवनाचा भाग बनलेला आहे. अर्थ हा जीवनाचा केंद्रबिंदू बनलेला आहे. त्याच्यापुढे इतर सर्व गोष्टी दुर्लक्षित झाल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, शेती या सर्व गोष्टीत पैसा हा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे आज आपली ही परिस्थिती आपण ओढवून घेतलेली आहे. पैसा श्रेष्ठ झाल्याने आपल्या संस्कृतीतल्या अनेक बहुमूल्य गोष्टी उपेक्षित झाल्या आहेत.

'भारतीय वंशाची गाय' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. जीवनामध्ये उत्तम आरोग्य, संस्कारयुक्त शिक्षण, सात्त्विक खानपान, प्रामाणिक व्यवसाय, प्रदूषणमुक्त सृष्टी या गोष्टी सुद्धा मानवी

जीवन श्रीमंत व समाधानी बनवतात. किंबहुना माणसाला श्रीमंत बनवतात. गेल्या काही वर्षात या गोष्टीकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे आजची दाहक परिस्थिती आपणासमोर उभी आहे. पैशापुढे आपण आपली आई–वडील, भाऊ–बहीण, गुरुजन ही पवित्र नाती पण विसरत चाललेलो आहोत. हे सर्व परत सुधारावयाचे असेल, पुन्हा जीवन सुंदर बनवायचे असेल तर भारतीय गाय हे त्याचे उत्तम साधन आहे. दुर्दैवाने या गाईचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून आपण अभ्यासच केला नाही. आता गाईकडे त्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात गावांनी बनलेला देश, शेती प्रधान गावे व गो आधारित शेती अशी आपली ओळख होती. एका वाक्यात सांगावयाचे झाल्यास ऋषी–कृषी संस्कृतीचा देश. अर्थात गाईच्या आधारावर आम्ही श्रीमंत, आरोग्यसंपन्न, स्वावलंबी व सुसंस्कृत होतो, पण गेल्या चार दशकात ही गाय आम्हाला तोट्याची, टाकाऊ वाटू लागली. समाजातून गावातून ती बहिष्कृत झाली व तिची जागा जर्सी होस्टन अशा विदेशी गाईंनी घेतलीय

गाई संदर्भात या परिस्थितीला आपणच कारणीभूत आहोत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपण गाईला 'आई' मानले व तिचा धार्मिक उपयोगच केला गेला. त्यामुळे गाईतले विज्ञान जाणून घेणे व तिचा रोजच्या व्यवहारात उपयोग करणे या गोष्टीकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे कमी दूध देणारी गाय अशी तिची ओळख झाली व ती पाळणे तोट्याचे आहे, असे सार्वमत तयार झाले.

गाईकडे फक्त दूध देणारे जनावर म्हणून पाहणे हा गाईवर अन्याय आहे. दुधाशिवाय शेण (गोमय) गोमूत्र यांचा सुद्धा विचार केल्यास ही गाय तोट्याची नसून इतर परदेशी गाईंपेक्षा फायद्याची आहे, हे लक्षात येते. भारतीय गाय समजावून घेण्याची असल्यास खालील गोष्टींचा विचार करावा लागेल.


१) गाय आणि शेती, (२) गाय आणि आरोग्य, (३) गाय आणि उद्योग, (४) गाय आणि ऊर्जा,(५) गाय आणि पर्यावरण.

**अ) दूध** : मातेच्या दुधानंतर श्रेष्ठ दूध म्हणून गाईच्या दुधाकडे पाहिले जाते. सर्व सत्त्वांनी युक्त असे हे पूर्ण अन्न आहे. मानवी आरोग्यासाठी हे सर्वोत्तम आहे. सध्या जागतिक स्तरावर A1 व A2 अशी दुधाची विभागणी केली गेली आहे. या वर्गवारीनुसार सर्व परदेशी गाईंचे दूध हे A1 या वर्गात मोडते. या दुधामुळे मानवी जीवनास धोका आहे व त्याच्या सेवनातून कॅन्सर, ब्लडप्रेशर, डायबिटीस, हाडांचे विकार वाढतात हे सिद्ध होत आहे. काही देशांनी या दुधावर कायदेशीर बंदी आणली आहे. ब्राझिल, अर्जेंटिना, उरुग्वे, दक्षिण अमेरिका, आफ्रिका या देशात आपल्याकडील गाई नेऊन त्यांचे दूध वाढवले आहे. भारतीय वंशाची गीर गाय तिचे ३५ ते ४० लीटर दूध प्रतिदिनी देते. आपल्याकडील १६ प्रजाती या विदेशी गाईंपेक्षा उत्तम भरपूर दूध देतात व त्यांचा पोषण खर्च पण ५० टक्क्यांहून कमी

आहे. सध्या बाजारात अमूलचे देशी गाईचे दूध ७० रुपये लीटर आहे. दुधापासून बनवलेले गाईचे तूप २४०० रुपये किलो भावाने विकले जाते. शरीराच्या अनेक व्याधीवर ते उत्तम औषध आहे. गाईच्या दुधापेक्षा त्या दुधाचे ताक आरोग्यास उपयुक्त आहे. पचन संस्था, लिव्हर, किडनी यावर त्याचा उपयोग आश्चर्यकारक आहे.

**ब) शेती** : गाईचे शेण व गोमूत्र यांचा शेतीमधील वापर हा सध्याच्या शेती समस्येवर चांगला उपाय आहे. आजपर्यंत शेती NPK च्या तत्त्वावर चालत होती पण आता ती जिवाणू संवर्धित शेती बनलेली आहे. जमिनीतील जैव घटक हा शेतीचा केंद्र बिंदू बनला आहे आणि त्यामुळे सेंद्रिय खते, बायोडायनामिक खते, स्लरी यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या सर्वांसाठी देशी गाईचे शेण अतिशय उपयुक्त आहे. या गाईच्या शेणाचा वापर करून आपण एकरी १० ते १२ हजार रुपये खताची बचत करू शकतो व जमीन सुपीक राखू शकतो. महाराष्ट्रात १८ पिकांवर व ७ फळ पिकांवर याचे यशस्वी प्रयोग केले गेले आहेत. महाराष्ट्रात जमीन क्षारपड होणे, कस कमी होणे, रासायनिक घटकांचा असमतोल या समस्या आहेत व त्यामुळे उत्पादनात घट व उत्पादन खर्चात वाढ या समस्येवर गाईचे शेण हा सर्वोत्तम पर्याय आहे. तसेच सध्या हायब्रिड वाणामुळे, प्रदूषणामुळे रोगांचे प्रमाण खूप वाढलेले आहे. त्यासाठी नवनवीन व विषारी औषधांचा वापर प्रचंड वाढला आहे. एका कोल्हापूरसारख्या जिल्ह्यात सरासरी ४.५० ते ५ कोटी रुपायांची कीटकनाशके फवारली जातात. ही औषधे इतकी तीव्र असतात की ती फवारताना महाराष्ट्रातले शेकडो शेतकरी मृत्युमुखी पडले आहेत. याच औषधाचा अंश पोटात गेल्याने कॅन्सरसारखे रोग वाढत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील एका शिरोळ या प्रगत शेती करणाऱ्या तालुक्यात २० हजार शेतकरी कॅन्सरग्रस्त आहेत. तसेच हेच विषारी अंश विहीर, तलाव, ओढे, नदी या पाण्यात मिसळतात व त्यामुळे रोगप्रतिकार शक्ती संपून जाते व नवनवीन आजार जन्म घेतात. यावर गोमूत्राचा वापर कार्यक्षम व प्रभावी ठरला आहे. गोमूत्र व उत्तम प्रतिचे कीड निरोधक आहे, तसेच हिरवी मिरची, लसूण घालून त्याची तीव्रता व उपयोगिता वाढवता येते. शेतीवरील खर्च पण कमी येतो.

**क) आरोग्य** : गाईपासून मिळणारे दूध, तूप, गोमूत्र, ताक यांच्या साहाय्याने अनेक मोठे आजार बरे होऊ शकतात, हे सिद्ध झालेले आहे. याला पंचगव्य थेअरपी असे संबोधले जाते. गाईचे दूध व गोमूत्र शरीराची रोग प्रतिकार शक्ती वाढवून शरीरातील विषारी द्रव्याचा नाश करते. तसेच गाईचे तूप हा जगातील सर्वात जास्त ऊर्जा असणारा पदार्थ आहे. त्यामुळे शरीर निरोगी बनून मानवी आयुष्य उर्जावान बनते. गाईच्या दुधाचे ताक पोटाच्या सर्व विकारावर रामबाण उपाय ठरलेले आहे. म्हणूनच अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राने गोमूत्रावर संशोधन करून कॅन्सरसारख्या असाध्य रोगावर परिणामकारक उपाय आहे हे दाखवून दिले आहे. त्यासाठी त्यांनी गोमूत्राचे पेटेंट घेण्याचा प्रयत्न केला



## गो-वंश महत्व, गाय आणि शेती यांचे अतूट नाते, गोवंश सुधारणा

भारत कृषि-प्रधान देश । शेतीसाठी हवा गोवंश ।
गोरसाइतुका नसे सत्वांश । अन्यत्र शुद्ध ।।
गोमय गोमूत्र मिळोनी रात्रंदिस । कायम होता भूमीचा कस ।
पेवे भरती गावागावास । धान्याची तेंव्हा ।।
म्हणोनी गायीगुरा 'गोधन' । ऐसे सत्य नामाभिधान ।
सुखी होता भारत संपूर्ण । गोवंशा सुखवोनिया ।।
तिच्या शेणाने पिके शेती । शेती देई सुख, संपत्ती ।
म्हणोनीच शेणामाजी लक्ष्मीची वसती । वर्णिले असे ।।
ज्याचे घरी शेती आहे । त्याने अवश्यची पाळावी गाय ।
मलमूत्र सर्व उपयोगी राहे । ऐसी गाय माउली ती ।।
घालोनी पेंड, चारा, चुरी । गाय करावी हत्तीपरी ।
प्रेमे गोंजारोनी घरोघरी । गाय प्रसन्न ठेवावी ।।
गावी असावा आदर्श सांड । बैले निपाजावया धिप्पाड ।
सुंदर होईल शेतिसी जोड । वाहावया बैलांची ।।
गोवंशाच्या रोगनिवारणा । गावी ठेवावा दवाखाना ।
लाभ मिळावा सर्वांना । प्रतिबंधकता समजावी ।।
उत्तम दूध, उत्तम सांड । उत्तम शेती, उत्तम बिवड ।
उत्तम शेतकरी प्रचंड । शक्तिशाली ।।

**ग्रामगीता - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

*

होता. पंचगव्य चिकित्साही कोणताही साईड इफेक्ट न करणारी व आजाराला कायमचे बरे करणारी उपचार पद्धती म्हणून विकसित होत आहे. शिवाय आजकालच्या महागड्या उपचार पद्धतीपेक्षा स्वस्त व परिणामकारक आहे.

**ड) उद्योग** : गाईच्या गोमय व गोमूत्रापासून रोजच्या वापराच्या अनेक गोष्टी बनवता येतात. ग्रामीण भागात रोजगाराचा प्रभावी उपाय ठरू शकतात. दंतमंजन, साबण, फिनेल, शँपू, धुबबत्ती, फेसपॅक, केश तेल, मॉलिश तेल, असा १४ प्रकारच्या गोष्टी या स्वस्त व आरोग्यासाठी उत्तम असतात. या सर्व गोष्टी बाजारात प्रचंड जाहिरात करून खपवल्या जातात, पण यातील रासायनिक तत्त्वामुळे शरीराला धोका पोहोचतो हे लक्षात आले आहे. शिवाय या सर्वांच्या वापरण्यातून हजारो कोटी रुपये जे मोठ्या कंपन्यांना मिळतात ते ग्रामीण भागात परत येतील, हा देशासाठी मोठा फायदा आहे. याशिवाय सेंद्रिय खते, कीटकनाशके यांचे पण उत्पादन गावात करता येते.

**ई) पर्यावरण** : अग्निहोत्र हा एक सोपा यज्ञ आहे. ५ ते ७ मिनिटाचा हा यज्ञस्त्री–पुरुष कोणत्याही जातीचा, वयाचा, अशिक्षित करू शकतो. यात गाईच्या शेणी प्रज्वलीत करून त्यावर अखंड तांदूळ गाईचे तूप लावून आहुती दिल्यास प्रॉपलिन हा वायू तयार होतो. हा वायू घरातील सर्व व्हायरस, विषाणू यांचा नाश करून आजारापासून घराचे रक्षण करतो. तसेच घरामध्ये सकारात्मक विचार पसरून घरामध्ये आरोग्य, समाधान नांदू लागते. सध्या सुरू असलेल्या डेंग्यु, हिवताप यासारख्या रोगांना रोखतो. सध्या दुष्काळी भागात कृत्रिम पाऊस पाडला जातो, त्यात हाच प्रॉपलिन वायू आपण आयात करतो. सध्या जर्मन, फ्रान्स या देशात या यज्ञ करण्याचे प्रमाण खूपच वाढलेले आहे. महाराष्ट्रात अक्कलकोट येथे शिवपुरी आश्रमात याचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्रशिक्षण दिले जाते.

**फ) ऊर्जा :** गाईच्या शेणात ६८% मिथेन गॅस आहे. याचा उपयोग योग्य प्रमाणात केल्यास स्वयंपाकाचे इंधन, घरगुती वीज व गाडी चालण्यासाठी लागणारा सी. एन. जी. गॅस निर्माण होऊ शकतो. आज आपण आपल्याला लागणारे पेट्रोल, डिझेल प्रचंड प्रमाणात आयात करतो. त्याला एक सशक्त पर्याय म्हणून गाईचे शेण उपयुक्त आहे. जपानसारख्या प्रगतीशील देश या शेणाकडे भविष्यातील ऊर्जेचा स्रोत म्हणून पहात आहे व त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यावर असे लक्षात येते की गाय हा केवळ दूध देणारा प्राणी नसून, शाश्वत विकासाचे प्रभावी साधन आहे. समाजाचे आरोग्य, शेतीची सुपिकता, देशाचे अर्थकारण व पर्यावरणाचे रक्षण अशा अनेक गोष्टी गाईमध्ये अंतर्भूत आहेत. जसा हा गाय व देशाचा विचार आहे असेच एक कुटुंब व एक गाव असा विचार केल्यास त्या कुटुंबाची शेती, आरोग्य, इंधन, उद्योग अशा अनेक गोष्टी गाईतून मिळवता येतात. याची बेरीज केली तर साधारणपणे एक गाय दूध, गोमूत्र, गोमय यांच्या साहाय्याने किमान ५० हजार रुपये मिळवून देऊ शकते. या तिच्या उपयोगीतेमुळेच तिला

'माता' म्हटले आहे. एक गाय घरात असणे म्हणजे साक्षात लक्ष्मी घरात असल्यासारखे आहे. म्हणून आपल्या शास्त्रात 'गोमय वसते लक्ष्मी' असे म्हटले आहे.

*

## ४) वन-संपदा : श्री. रघुनंदन वेलणकर

भारत देश वैविध्यपूर्णतेनी नटलेला आहे. वनस्पतींची वैविध्यताहि त्यातीलच एक घटक आहे. प्राथमिकदृष्ट्या, आपल्या देशातील भौगोलिक वैविध्यता हे अन्य सर्व बाबतीतील वैविध्यतेचे मूळ आहे असे म्हणता येईल. उत्तरेस असलेल्या हिमालय पर्वताच्या बर्फाळ प्रदेशांतील सुचीपर्णी वनराजी ते दक्षिणेस हिंदी महासागरातील प्रवाळ बेटे, ईशान्य भारतातील अति पावसाच्या प्रदेशातील सदाहरित वनराजी ते पश्चिमेच्या मरुभूमीत असणारी काटेरी झुडपी वने हि आपल्या देशातील पराकोटीच्या भौगोलिक वैविध्याची आणि त्या त्या भौगोलिकतेस अनुरूप वन संपदेची प्रतीके आहेत. केवळ इतकेच नाही तर, पश्चिम किनारपट्टीच्या समांतर असणारा सह्यादी, ज्याला भौगोलिक परिभाषेत पश्चिम घाट असे म्हणतात, पूर्वे किनारपट्टीच्या सोबतीने असणारा पूर्व घाट ज्यात कोल्ली मलय, सर्वरायन, नल मलय ह्यासारख्या पर्वत रांगा समाविष्ट आहेत, मध्य भारतातील सर्व व्यापी दक्षिण पठार, सातपुडा, अरावली आणि विंध्य परवत रांगा, गंगा नदीच्या मुखाशी वसलेला सुंदरबन प्रांत अश्या वन संपदेने नटलेल्या भौगोलिक प्रतीकांनी आपला देश समृद्ध आहे.

**वन संपदेतील वैविध्यपूर्णता**

आपल्या देशातील वन संपदेची नोंद ठेवणे आणि अभ्यास करणे हे प्रामुख्याने भारतीय वनस्पती सर्वेक्षण आणि भारतीय वन सर्वेक्षण ह्या विभागांमार्फत केले जाते. भारतीय वन सर्वेक्षणतर्फे वन संपदेच्या सद्यकालीन स्थितीबद्दल दरवर्षी अहवाल प्रसिध्द केले जातात. ह्या विभागांच्या वर्गीकरणानुसार आपला देश १२ जैव-भौगोलिक विभागात विभागलेला आहे. आपल्या देशातील समृध्द वनराजी ह्या जैव-भौगोलिक विभागांतील वेगवेगळ्या परिसंस्थांत उदाहरणार्थ, अति पावसाळी प्रदेशातील सदाहरित वने, पानगळी वने, गवताळ कुरणे, खुरटी झुडूपी वने, पाणथळ, खारभूमीतील वने इत्यादी, वसलेली आहे.आपल्या देशांत प्रमाण मानलेल्या चॅम्पीयन आणि सेठ ह्यांच्या १९६८च्या वनांच्या वर्गीकरणानुसार भारतात १६ प्रकारची वने आहेत. भारतात वन संपदेची सर्वाधिक वैविध्यता पुढील चार विभागांत पाह्यला मिळते - पूर्व हिमालय, पश्चिम घाट, ईशान्य भारत आणि अंदमान व निकोबार बेटे. ह्या चारही विभागांचा उल्लेख जागतिक पातळीवरील ३४ जैव विविधतेने अति समृध्द (biodiversity hotspot) विभागांच्या यादीतही आढळतो.

वनस्पतींचे वर्गीकरण मुख्यत्वे सपुष्प, अपुष्प आणि अन्य अश्या तीन प्रकारात केले जाते. ह्या सर्व प्रकारांच्या मिळून साधारण ४७५०० प्रजाती भारतात नोंदण्यात आल्या आहेत. जगभरातील सर्व

नोंदण्यात आलेल्या वनस्पतींच्या साधारण ११% एवढे हे प्रमाण आहे.

आपल्या देशातील वन संपदेची स्थिती जाणून घेण्याचे प्रमुख मानक म्हणजे वनाच्छादन. २०१७ च्या वन सर्वेक्षण अहवालानुसार आपल्या देशांतील एकूण भूक्षेत्राच्या २४% वनाच्छादित आहे.

**वन संपदेचे महत्व**

वन संपदेचे सर्वपरिचित उपयोग म्हणजे इमारती लाकूड आणि जळाऊ लाकूड. पण हा फारच मर्यादित दृष्टीकोन झाला. वन संपदेचे दृश्य आणि अदृश्य असे असंख्य उपयोग आहेत. पर्यावरण शास्त्राच्या नव्या परिभाषेत दृश्य उपयोगांना पर्यावरणीय वस्तुरूप उपयोग (environmental goods) आणि अदृश्य उपयोगांना पर्यावरणीय सेवा (environmental services) असे म्हणतात. वन संपदेचे वस्तुरूप आणि अदृश्य उपयोगांची काही उदाहरणे खालील तक्त्यात मांडली आहेत.

| **पर्यावरणीय वस्तुरूप उपयोग** (environmental goods) | **पर्यावरणीय सेवा** (environmental services) |
|---|---|
| इमारती लाकूड | भूजल आणि एकंदरीतच पाण्याची उपलब्धता कायम ठेवणे. |
| शेतीकामाच्या अवजारांसाठी लागणारे लाकूड | मानवाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेला ऑक्सिजन वायू आणि पृथ्वीच्या पर्यावरणातील महत्वाचा कार्बन डाय ऑक्साईड वायू यांचे संतुलन राखणे. |
| स्वयंपाकासाठी जळाऊ लाकूड | मातीची धूप रोखणे. |
| औषधी वनस्पती. | वनस्पतींव्यतिरिक्त अन्य वन्यजीवांसाठी अधिवास उपलब्ध करून देणे. |
| डिंक, तेंदूपत्ता, हिरडा फळ, बिब्बा इत्यादी व्यापारी आणि दैनंदिन उपयोगाची वनोपजे. | जैविक विविधतेचा स्रोत ज्यात शेतीसाठी आवश्यक बियाण्यांची विविधतासुध्दा अंतर्भूत आहे (source of genetic diversity). |
| आहाराचा स्रोत – ऋतूमानानुसार मिळणारे खाद्य पदार्थ उदा. पावसाळी भाज्या, बांबूचे कोवळे कोंब तसेच शिकार करून | नैसर्गिक अन्नसाखळीतील (ecological food chain) सर्व ज्ञात आणि अज्ञात घटकांचे अस्तित्व राखणे. |

## आपली परंपरा

आपल्या पूर्वजांना वन संपदेच्या केवळ दृश्यच नव्हे तर अदृश्य उपयोगांचीहि (ecosystem services) स्पष्ट जाणीव होती. त्यांस अनुसरून आपली वन संपदा हि मालमत्ता नसून एक ठेवा आहे ह्या भावनेने, वन संपदेचे शोषण रोखण्यासाठी, संवर्धन करण्यासाठी आणि वन संपदेच्या प्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सांस्कृतिक आणि सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यात आल्या. एवढेच नव्हे, तर आवश्यक तेव्हा ह्या व्यवस्थांना धार्मिक अनुष्ठानही देण्यात आले, उदाहरणार्थ, देवतांचा अधिवास असणारे वृक्ष, देवराया इत्यादी. यात्रेकरुंसाठी आणि वाटसरूंसाठी रस्त्याच्या कडेने लावलेले सावली देणारे वृक्ष भारतवर्षात सर्वत्र दिसतात.

भारतीय संस्कृतीमध्ये वृक्षांना माणसाइतकेच महत्व दिले आहे ह्याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे वृक्षांची काळजी कशी घ्यावी, त्यांचे रोग निदान इत्यादींची मांडणी असणारा वृक्षायुर्वेद. इसवी सनाच्या सहाव्या शतकात वराहमिहीराने लिहिलेल्या बृहतसंहितेमधे वृक्षायुर्वेद हे एक प्रकरण आहे. इसवी सनाच्या दहाव्या शतकात सुरपालाने लिहिलेला वृक्षायुर्वेद हा तर ह्या विषयातील ग्रंथोत्तमच आहे. इसवी सनाच्या तेराव्या शतकात सारंगधराने आपल्या ग्रंथात समाविष्ट केलेले ‘उपवनविनोद’ हे प्रकरणसुध्दा समृध्द भारतीय परंपरेचे उत्तम उदाहरण आहे.

परकीय सत्तेच्या काळात, विशेषतः इंग्रजी राजवटीत, आपल्या संस्कृतीला मागास लेखण्यात आले. फक्त परकीय ज्ञान प्रगत मानण्याची प्रथा पडली. त्यामुळे अधिकृतरित्या वृक्षायुर्वेदासारखे ग्रंथ आणि ज्ञान निर्मिती जवळजवळ थांबली परंतु अश्या प्रतिकूल परिस्थितीतसुध्दा ह्या खंडप्राय देशातील सामान्य जनतेने आपली वृक्ष परंपरा प्रत्यक्ष कृतीतून अबाधित राखली. देशभर पसरलेल्या देवराया (sacred groves), गवताळ प्रदेशातील राखण राने ही ह्या प्रत्यक्ष कृतीची उदाहरणे आहेत.

## सद्यस्थिती आणि काय केले पाहिजे

वन संपदेचा झपाट्याने ऱ्हास होत आहे यात कोणताही संदेह नाही. गेल्या काही दशकांत मानवाने वन संपदेचा केवळ उपभोगच घेतला. परिणामतः सद्यस्थितीत आपण सातत्याने पडणारे दुष्काळ, ढगफुटी होऊन अचानक येणारे पूर, वाढते प्रदूषण, मातीची अनन्वित धूप अश्या समस्यांना तोंड देत आहोत.

सद्यस्थितीत वैयक्तिक आणि ग्राम पातळीवर सर्वात महत्वाची कृती म्हणजे नव्याने वृक्ष लागवड करणे. उपलब्ध वन संपदेचे संवर्धन आणि संरक्षण करणे हे हि तितकेच महत्वाचे आहे. ह्या संदर्भातील काही सूत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

१. नव्याने केलेली वृक्ष लागवड आणि उपलब्ध वन संपदा टिकवण्यासाठी कुऱ्हाड बंदी आणि चराई

बंदी ह्यांचा सुयोग्य ताळमेळ घालणे.

२. नव्याने करायच्या लागवडीत वृक्षांच्या स्थानिक प्रजातींना योग्य ते महत्व देणे.

३. सामान्यपणे नवीन लागवड उत्साहानी केली जाते पण तो टिकवण्यासाठीचे प्रयत्न फारच कमी पडतात. लागवडीनंतर किमान दोन वर्षे लागवड केलेल्या रोपांची काळजी घेणे आवश्यक असते. ह्या संदर्भातील दोन सर्वात महत्वाच्या व्यवस्था म्हणजे रोपांना वेळच्यावेळी पाणी मिळणे आणि लागवड केलेल्या रोपांचे चरणाऱ्या गुरांच्या पायदळी तुडविली जाऊ नयेत ह्यापासून संरक्षण करणे. पावसाळ्यापूर्वी कुजलेला पालापाचोळा आणि शेणखत यांची एखादी मात्रा ह्या लागवड केलेल्या रोपांना देता आली तर सोन्याहून पिवळे.

*

## ५. गावातील जैव विविधतेचे संरक्षण, संवर्धन व श्वाश्वत वापरातुन ग्रामविकास

**डॉ राहुल मुंगीकर,** सहाय्यक संचालक (पॉलीसी सेल),
बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, मुंबई
संपर्क : r.mungikar@bnhs.org क्रमांक : ९८२२६११२८

जैवविविधता संरक्षण व संवर्धन हि आज काळाची गरज बनत चालली आहे. आजच्या या वेगवान युगामधे सतत नवनविन शोध लागत आहेत व आपल्या जीवन विकासाचे सत्र सातत्याने उंचावत आहे. गेल्या दोन ते तीन दशकांमधे ग्रामीण भागातील लोकांचे विकासाचे स्वरुप एकदमच बदलुन गेल्याने त्यांचे शासनावरचे अवलंबित्व हे वाढतच आहे. याचा अनिष्ट परीणाम हा या लोकांवर व त्यांच्या भौगोलिक क्षेत्रावर होत आहे. परंतु हे घडत असताना या विकासाच्या प्रत्येक पायरीवर आपल्याला याची मोठी किंमत चुकवावी लागत आहे. बऱ्याचजणांना याचा अंदाज नसल्याने आपण काय स्वरुपांत व किती मोठी किंमत मोजत आहोत याची काहीही माहिती नसते. या सर्व विकासाच्या टप्प्यांवर जैवविविधतेचा झालेला मोठ्या प्रमाणातील नाश हा कारणीभुत असल्याचे दिसुन येत आहे. नैसर्गिक साधन संपत्तीचा होणारा अनिर्बंध वापर हा गावातील शेती व नैसर्गिक स्त्रोतातुन उपलब्ध होणारे पाणी यावर मोठ्या प्रमाणात परीणाम करीत असतो. पर्यायाने याचा परीणाम हा गावच्या एकुण उत्पन्नावर व गावच्या विकासावर होत असतो. खरेतर लोक सहभागातुन जैविक विविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न आजपयत अनेक सरकारी विभागांमार्फत, अशासकिय स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातुन तसेच काही प्रमाणात प्रगत मोठमोठ्या औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांच्या द्वारे करण्यात आलेला आहे. यांतुन मिळालेले यश हे जरी वेगवेगळ्या प्रमाणात असले तरी यातुन एक निश्चितपणे

सिध्द होऊ शकले आहे की लोकसहभागाशिवाय जैवविविधता संरक्षण व संवर्धन यशस्वी होऊ शकत नाही. याकरीता जैवविविधता व ग्रामविकास यांचे आपापसातील नाते आपण सर्वांनीच समजुन घेणे आवश्यक आहे.

गेल्या अनेक वर्षांमधे गावच्या माळरानांकडे आपले सर्वांचेच दुर्लक्ष झालेले दिसते. सरकारी विभागांमधे तर या माळरानांची नोंद ही पडीक जमिन विंवा पोट खराब्याची जमिन म्हणुन केलेली आहे. यामुळेच जेव्हा सरकारला कोणत्याही प्रकल्पासाठी जमिन घ्यायाची असते तेव्हा प्रथमत: या जमिनीचा विचार केला जातो. याचे महत्वाचे कारण म्हणजे सर्व सामान्य लोकांचा समज करुन देण्यात आलेला आहे कि या जमिनींचा गावच्या उत्पन्न वाढीकरीता वापर हा शुन्य आहे. परंतु याची वास्तविकता ही फारच वेगळी आहे. हीच बाब आपण प्रथम समजुन घेण्याचा प्रयत्न करूयात.

आपणां सर्वांनाच माहीत आहे की जंगलांचा संबंध हा जमिनीतील पाणी मुरण्याशी आहे परंतु अशा पध्दतीने पाणी मुरण्याकरीता केवळ जंगलच पाहिजे असे मात्र निश्चितच नाहिये. पुर्वी माळराने ही गवताने भरलेली होती. एवढेच काय तर आज जे अनेक उघडे बोडके डोंगर आपल्याला दिसत आहे या डोंगरांच्या तीव्र उतारावर देखील गवतांचे प्रमाण उत्तम होते. परंतु गेल्या २०-३० वर्षांच्या कालखंडात या गवताळ प्रदेशाच्या परीसंस्थेत मोठा फरक आढळुन आलेला दिसत आहे. अनेक ठिकाणी गवतांना आगी लावण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. अनिबध चराईमुळे अनेक गायराने ही विकसितच होत नाही प पर्यायाने गायराने ही उजाड होत जातात. याशिवाय बेकायदेशिर पणे होणारे उत्खनन हे ही त्यांस तेवढेच जबाबदार आहे. खरेतर गवताळ प्रदेशांमुळे जमिनित पाणी मुरविण्याचे प्रमाण हे कैक पटीने वाढते पण हे कोण लक्षात घेतो? या सर्वांचे परीणाम केवळ पाण्यापुरते मर्यादीत आहे असे नाही तर याचे अन्यही अनेक परीणाम आपणांस सहज दिसुन येतात

**१) पशुधन व त्यांचे आरोग्य:** गावातील पशुधनाच्या विकासाकरीता आवश्यक असणारे सकस गवत हे उपलब्धच होत नाही याचा परीणाम म्हणजे शेतकरी बाहेरुन गवत, कुट्टी आणुन जनावरांना देतो. यामुळे खर्चामधे सतत वाढ होत रहाते.

**२) पाण्याची उपलब्धता:** जमिनीतील पाणी मुरण्याचे प्रमाण कमी झाले की पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवायला लागते. याचा परीणाम शेतीवर तर होतोच परंतु याचबरोबर याचा परीणाम हा अन्य किटक - पक्षी याचेवरही होत असतो. शेतीचे उत्पादन मुल्य घटत जाते व शेवटी शेती डबघाईस आल्याचे जाणावते. यामुळे विहीरी, ओढे, नद्या यातील पाण्याची पातळी कमी कमी होत जाते. त्याचा परीणाम नदीत विंवा ओढ्यामधे असणारे मासे, खेकडे या सारख्या आपल्या अन्नास उपयुक्चत अशा घटकांवर होत जातो. त्यांचे प्रमाण लक्षणीयरित्या घटलेले दिसुन येते.

**३) महत्वपुर्ण जैविक घटक:** माळरान किंवा गुरचराई क्षेत्रातुन गवत कमी कमी होत गेल्यास

त्या भागातील किटक व त्यावर अवलंबुन असणारे पक्षी तसेच अन्य घटक यांच्यावर होत असतो. पक्षांचे नैसर्गिकपणे किड नियंत्रण व मधमाशा सारख्या जिवांचा शेतीतील परागीभवनाच्या प्रक्रियेत अत्यंत मोलाचे स्थान आहे. परंतु हे दोन्ही घटक नष्ट होत गेल्यास त्याचा थेट परीणाम हा शेतीच्या उत्पादनावर होताना दिसुन येतो. यामुळे शेतकरी याकरीता रासायनिक औषधे व तंत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न करतो व त्यामुळे पुन्हा खर्चात वाढ होत रहाते.

**४) औषधी वनस्पती व त्याचा वापर:** आपल्या राज्यातील अनेक गावे ही औषधी वनस्पतींनी अगदी नटलेली आहेत. परंतु कोणत्याही प्रकारच्या नियंत्रणाखेरीज त्याचा व्यावसायिक वापराकरीता प्रचंड तोड होत आहे. याची पध्दत म्हणजे कोणीतरी व्यापारी गावात येऊन जातो व तो काही लोकांना अशा वनस्पती गोळा करायला सांगतो. त्याचा पुढे वापर काय करणार आहे हे गावातील लोकांना कधीही लक्षात येत नाही व सर्वस्वी फायदा हा त्या व्यापाराचा होत जातो. अशा अनिर्बंध तोडीनंतर काही वनस्पती तर कायमच्या नष्ट होत चाललेल्या आहेत व याचे भविष्यातील परीणाम गंभीर आहेत. याचाच दुसरा परीणाम असा आहे की शेतीसाठी उपयुक्त असणाऱ्या जनावरांना त्यांच्या दुध वाढीकरीता यातील काही वनस्पती किंवा गवत हे आवश्यक असते. परंतु ते योग्य काळी व वेळी उपलब्ध न झाल्याने त्याचा परीणाम आपल्या जनावरांचा पुढे वाढणाऱ्या वंशावर होत रहातो. असे वंशामधे भाकडपणाचे प्रमाण अधिक दिसुन येते.

**५) रानभाजी:** याशिवाय सध्या सर्वत्र दिसुन येत असलेला सर्रास प्रकार म्हणजे रानभाजी स्पर्धा होय. खरेतर संवर्धनाच्या मुळ हेतुने प्रेरीत झालेली ही बाब सध्या शहरी लोकांच्या आग्रहास बळी पडुन त्याचे व्यवसायिकीकरण होत चालल्याचे दिसुन येत आहे. या प्रकारच्या कार्यक्रमांमुळे ज्या रानभाज्या गावातील २०-२५ घरांच्या भुकेचा प्रश्न मिटवित होत्या त्या शहरातील ४००-५०० लोकांच्या जेवणाकरीता गोळा करण्यास सुरुवात झालेली आहे. हे करीत असताना लोकांच्या परंपरागत ज्ञानाची नोंद कोठेही ठेवली जात नसल्याने या माहितीच्या आधारे शहरातील तथाकथीत तज्ञ मंडळी स्वत:च्या नावाने अशी माहिती प्रकाशित करीत आहेत. याचा फायदा भविष्यामधे या तज्ञ लोकांपुरताच मर्यादित रहातो. शिवाय स्थानिक ठिकाणी भाज्या गोळा करण्याचे प्रमाण हे वाढत असल्याने पुढील ४-५ वर्षांमधे हे सगळेच धोक्यात येत जाणार हे निश्चित.

**६) तपमान बदल व शेती:** गेल्या दोन दशकांपासुन पाऊस, ऊन, वारा, तपमान व आर्द्रता या घटकांमधील अनियमितता हे सातात्याने वाढत आहे. याचा थेट परीणाम हा शेती तसेच शेती निगडीत अन्य उत्पादनांवर होत आहे. खरेतर स्थानिक ठिकाणच्या जैव विविधतेमधे निसर्गात होत असलेल्या बदलांना तोंड देण्याची क्षमता ही नैसर्गिकपणे विकसित होत असते. यातील बदल हे सुक्ष्मपणे पुढे येत असतात. जैव विविधतेकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे या महत्वपुर्ण विषयाकडे

स्थानिक लोकांना लक्ष द्यायचे असते हे माहितच नाही. जर बदलत्या काळाबरोबर शेतकऱ्यांनी योग्य पाऊले उचलली नाही तर भविष्यामधे शेती उत्पादनावर अनिष्ट परीणाम होणार आहेत हे निश्चित.

जल व जीवन हे पुर्णतया जैवविविधतेवर अवलंबुन आहे व यात जंगलाचाही समावेश होतो. त्यामुळे त्याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष हे भविष्यतील संकटांची नांदी आहे. केवळ शासकीय योजनांच्या आधारे ग्रामविकासाची सुत्रे ठरविली गेली तर त्याला मोठ्या प्रमाणात मर्यादा येतात. यासाठी प्रत्येक गावाने त्यांच्या गावास लागाणाऱ्या नैसर्गिक साधनांपैकी किमान पाणी, शेती, दुध दुभते व भाजीपाला या बाबींकरीता स्वयंपुर्णता आणण्याकरीता प्रयत्न करण्यास सुरुवात जरी केली तरी खऱ्या अर्थाने ग्रामविकासाच्या दृष्टीने वाटचाल सुरु केली असे म्हणता येईल. आजकाल प्रत्येक बाब ही शहराप्रमाणे विकसित झाली पाहिजे असा आग्रह ग्रामिण भागामधे मोठ्या प्रमाणात धरला जात आहे व त्याप्रमाणे लोकांचे रहाणीमान कमालीचे बदलत चालले आहे. या सर्व बदलामधे जैवविविधतेचे स्थान अगदी नगण्य असल्याने त्याचा परीणाम आपल्याल दिसत आहे. या परीणामांचा अभ्यास केला असता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की ती म्हणजे जैवविविधता हा घटक जर स्थानिक ठिकाणच्या आपल्या सर्व विकास योजनांमधे केंद्रस्थानी ठेवला तर यातील अनेक समस्यांना तोंड देण्याची क्षमता आपल्या गावांमधे निर्माण होऊ शकते. याकरीता पुढील काही बाबी ह्या आपण सर्वांनीच महत्वपुर्ण अशा समजुन केल्या पाहिजेत. यातुन केवळ वरील प्रश्न सुटतील असे नाही तर यातुनच उत्पन्नाचे काही नविन मार्ग देखील निर्माण होऊ शकतात.

भारताने या निमित्ताने २००२ मध्ये राष्ट्रीय जैवविविधता कायदा मंजूर केला. या कायद्यानुसार त्रिस्तरीय रचनेस मान्यता देण्यात आलेली आहे. यामधे प्रत्येक राज्यासाठी एका स्वतंत्र राज्य जैवविविधता मंडळाची निर्मिती करण्यात आली व प्रत्येक स्वराज्य संस्था स्तरावर जैवविविधता व्यवस्थापन समितीची रचना करण्यात आलेली आहे. या सर्व रचनेमधे लोकसहभागातुन जैविक विविधता संरक्षण व संवर्धन या तत्वाचे अनुसरण करण्यात आलेले आहे. प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावरील जैवविविधता व्यवस्थापन समितीत ग्रामसभेतुन जैवविविधता विषयातील जाणकार मंडळी असणे आवश्यक आहे व ह्या समितीस महाराष्ट्र शासनाच्या दि. २ मे २०१६ च्या आदेशानुसार विकास समिती म्हणुन मान्यता देण्यात आलेली आहे. ह्या समितीस त्यांच्या गावातील जैवविविधतेचे संपुर्ण व्यवस्थापन तसेच त्याचा शाश्वत वापर करण्याचे संपुर्ण अधिकार देण्यात आलेले आहेत. गावातील मंडळींनी जर एकत्र येऊन यासंदर्भात निश्चित धोरण ठरविले तर त्या प्रमाणे अंमलबजावणी करणे हे शासकिय नियमानुसार क्रमप्राप्त होते. या समितीस काही प्रमाणात का होईना निधी उपलब्ध होऊ शकतो. या समितिचे मुख्य कार्य म्हणजे स्थानिक ठिकाणी असलेल्या संपुर्ण जैविक साधन संपत्तीची नोंद गावपातळीवर करायची व याच बरोबर या संदर्भातील माहितगार, व्यक्ती, वैदु, इत्यादींची माहिती

त्यांच्या नावानिशी लिहुन ठेवायची. यांसच लोक जैवविविधता नोंदवही असे संबोधण्यात आलेले आहे. या कायद्याच्या अंतर्गत एकात्मिक पध्दतीने जैवविविधतेचा विचार करण्यात आलेला आहे. यामुळे जंगल किंवा वन क्षेत्र, वन्य जीव व त्याचे अधिवास, वन्य जिवांच्या नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण व संवर्धन; शेतीतील मुळ वाण व त्यांची सद्य स्थिती; पशुपालन व त्यासंदर्भातील देशी प्रजातींची माहिती; औषधी वनस्पती व त्याच्या वापरातील असलेले पारंपारिक ज्ञान; रान भाज्या व पिकांच्या जंगली प्रजाती यांची माहीती; ग्रामक्षेत्रातुन व्यावसायिक कारणांकरीता गोळा होत असणाऱ्या वनोपजांची नोंद करणे व त्याचा समितीद्वारे जै.वि.कायद्याच्या अंतर्गत व्यवहार करणे, वनोपजांचा शाश्वत वापर; गवताळ प्रदेशांचे तसेच चराई कुरणांचे योग्य नियोजन व नियमन करणे; पुर्वापार चालत आलेल्या पर्यावरणाच्या दृष्टीने महत्वपुर्ण असलेल्या परंपरांचे पुरुज्जीवन करणे व सर्वात महत्वाचे म्हणजे जैवविविधतेच्या आधारीत गावचा पुढील ३– ५ वर्षांचा विकास आराखडा तयार करणे हे सर्व अधिकार ह्या लोकांच्या समितीस आहेत. या विकास सामितीचा योग्य पध्दतीने विकास समिती म्हणुन वापर केला गेला तर ग्रामविकासचे काम अधिकच सुकर होऊ शकते. याशिवाय जैविक विविधता कायद्यामुळे स्थानिक व पारंपरीक जैविक संसाधनांवर आधारीत असलेल्या पारंपारीक ज्ञानास तसेच हे ज्ञान असलेल्या व्यक्तींना देखील संरक्षण देण्याची व्यवस्था शक्य झाले आहे. आपल्याला माहित असेल की इ.स. २००० मधे भारताने हळदीच्या संदर्भातले एक व बासमती तादुंळाच्या संदर्भातील एक अशी दोन पेटंट आंतरराष्ट्रीय बाजारात गमावले होते. पुढे हे प्रकरण आंतरराष्ट्रीय न्यायालयात गेल्यानंतर भारत सरकार या संदर्भात असणारे स्थानिक भागातील योग्य ती कागदपत्रे तात्काळ सादर करू शकले नाही. हे पेटंट परत मिळविण्यासाठीचा फार मोठा खर्च भारत सरकारला करावा लागला आहे. केवळ या दोन्ही पिकांच्या बाबतीतील पारंपारीक ज्ञानाची योग्य ती नोंद नसल्याने हा एवढा मोठा अनर्थ घडला होता.

केंद्रीय जैविक विविधता कायदा हा सर्व अस्तित्वात असलेल्या कायद्यांबरोबर लागु असल्याने याचे क्षेत्र हे केवळ जंगल असलेल्या जमिनीपर्यंत मर्यादित नाही तर ते खाजगी, औद्योगिक, निवासी व सरकारी क्षेत्रांनाही लागु होतो. यामुळेच लोकसहभागातुन संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने हा कायदा म्हणजे गावकऱ्यांसाठी अक्षरश: वरदानच आहे असेच म्हणावे लागेल. गाव पातळीवर तयार होणाऱ्या जैवविविधता नोंदवहीचे महत्व हे अगदी आंतरराष्ट्रीय न्यायालयात देखील असणार आहे. याच बरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर पेटंट संदर्भातील नियमांमधेही महत्वाचे बदल झाले आहेत. या झालेल्या बदलानुसार आता प्रत्येक जैविक संसाधनांच्या बाबतीतले पेटंट मिळवायचे असेल तर सदर जैविक संसाधने कोणत्या भागातुन अथवा कोणत्या गावांतुन गोळा केली हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. सदर पेटंट बहाल करण्यापुर्वी त्या त्या भागातील राज्य जैवविविधता मंडळाच्या मध्यस्थीने स्थानिक

जैवविविधता व्यवस्थापन समितीची चर्चा करता येते व नंतरच पेटंट द्यायचे आहे की नाही याचा विचार होतो. जर पेटंट द्यायचे ठरले तर त्या पेटंटच्या आधारे जे काही उत्पादन घेतले जाणार आहे त्याच्या संपुर्ण व्यवहाराच्या फायद्यातील ३ ते ५ टक्चके रक्कम गावच्या समितीस द्यावे मागते. यातुन गावांस जैवविविधता संरक्षण व संवर्धन केल्यास उत्पन्नही मिळविता येऊ शकते हे सिध्द होते. पण जर पेटंट मधील माहिती स्थानिक पारंपारिक ज्ञानाच्या आधारावर असेल तर मात्र यांत असलेल्या सर्व लोकांची संमती घेणे आवश्यक असते अन्यथा पेटंट मिळु शकत नाही. लोक जैवविविधता नोंदवहीमधुन अशा सर्व प्रकारची माहिती उपलब्ध होणार असल्याने गावांच्या दृष्टीने याचे महत्व आगामी काळांत अनन्यसाधारण असे होणार आहे. याशिवाय कोणत्याही गावांतील जैविक साधन संपत्तीचा व्यावसायिक कारणाकरीता वापर करावयाचा असेल तर सदर व्यक्ती / संस्था / कंपनीने स्थानिक जैवविविधता समित्यांची व राज्य जैवविविधता मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या प्रकारच्या व्यावसयिक वापराकरीता स्थानिक जैवविविधता समितीस फी आकरण्याचा अधिकार या कायद्याद्वारे देण्यात आलेला आहे. परंतु हे सर्व घडण्यासाठी प्रत्येक गावाने लोकसहभागातुन गावची जैवविविधता व्यवस्थापन समितीची स्थापना करणे अत्यंत आवश्यक आहे तसेच समितीची स्थापना झाल्यानंतर आपल्या गावची संपुर्ण जैवविविधता नोंदवही तयार करणे गरजेचे आहे. या एकंदरीत माहितीवरून आपल्या सहजपणे लक्षात येऊ शकते की लोकसहभागातुन जैविकविविधता संरक्षण व संवर्धन अगदी कायदेशीर मार्गाने करता येते व यांतुन शाश्वत विकासाच्या दृष्टीने पाऊले टाकता येऊ शकतील.

यासंदर्भात आपण धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील बारीपाडा गावचे उदाहरण घेऊ शकतो. १९९२ पर्यंत या गावांत पिण्यासाठी पाणी आणण्याकरीता सुमारे २–५ किमी ची पायपीट करावी लागायची व आज मात्र त्या ठिकाणी अगदी स्ट्रॉबेरी शेती करण्याचा प्रयत्न होत आहे. यासारखे आणखी एक उदाहरण धुळे जिल्ह्यातील लामकानी गावाचे आहे. सुमारे १०–११ वर्षांपुर्वी येथील परिस्थितिही बारीपाड्या सारखीच होती. गावकऱ्यांनी त्यांच्या गावाभवतालच्या २५६ एकर गवताळ प्रदेशाचे व्यवस्थापन केले व या गावचा संपुर्ण कायापालट झाला आहे. या दोन्ही उदाहरणांमधुन लोकसहभागातून जैविक विविधता संरक्षण व संवर्धन केल्यास किती प्रमाणात गावांस फायदा होतो हे स्पष्ट दिसुन येते. खरेतर महाराष्ट्रात यांसारखी अन्य अजुन काही उदाहरणे आपणांस सांगता येऊ शकता येतील.

परंतु केवळ जैवविविधता समिती स्थापन झाली म्हणजे प्रश्न सुटतील असे काही नाही. मात्र ही समिती हे ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्वाचे साधन आहे. लोकजैवविविधता नोंदवही तयार करणे हे यातील सर्वात प्रथम काम आहे. यासाठी लोकांमधील जागृती करणे, प्रत्येक बाबी करीता शासनावर अवलंबुन राहण्याचे प्रमाण कमी करणे व गावच्या दिर्घ काळ विकासाकरीता सर्वांना एकत्र करणे या

महत्व पुर्ण बाबी आहेत. आजच्या कार्बनच्या युगात जैवविविधता संरक्षण व संवर्धन हा कळीचा मुद्दा बनत चालला आहे. आज याकडे आपण लक्ष दिले नाही तर आपली आगमी पिढीस याचे परिणाम निश्चितच भोगावे लागणार आहे. लोकसहभागातुन काम करताना प्रत्येक जण कर्तव्याच्या भावनेपोटी काम करीत असल्याने शासकीय पध्दतीने होणाऱ्या कामांपेक्षा याचा परीणाम हा अधिक चांगला व दिर्घकाळ राहतो. आपल्याकडे पुर्वापारपासुन चालत आलेली म्हण आहे की गाव करील ते राव काय करील. अर्थात लोकसहभागतुन जैविक विविधता संरक्षण व संवर्धन करणे म्हणजेच गावच्या समृध्दीकरीता व शाश्वत विकासाच्या दिशेने मार्गक्रमणा करावयाचे पहिले पाऊल आहे.

*

## ६) ऊर्जा-संपदा : श्री. आशिष कुलकर्णी, जालना

शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागात राहणाऱ्या नागरिकांना स्वच्छ अन्न, शुध्द पाणी, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यासारख्या मुलभूत सुविधा मिळणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. या सर्व सुविधांसह आपल्या कुटुंबाचा व गावाचा संपूर्ण विकास साधण्यासाठी एक घटक अत्यंत महत्वाची भूमिका बजावतो आणि तो म्हणजे ऊर्जा. शिक्षण, आरोग्य, शेतीसह इतर उद्योग या सर्वांच्या विकासाचा वेग  हा ऊर्जेची उपलब्धता आणि त्याचा वापर यावर अवलंबून असतो असे म्हटले जाते. एखाद्या देशातील वीजेचा दरडोई वापर किती आहे हा त्या देशाच्या विकासाचा एक महत्वाचा निर्देशांक मानला जातो. त्यामूळे ऊर्जेसाठी इतरांवर कमीत कमी अवलंबून ऊर्जा स्वावलंबन साठी केलेले प्रयत्न हे विकासाचा वेग वाढवणारे आणि शाश्वत विकासासाठी अनुकूल आहेत. दैनंदिन जीवनात ऊर्जेचा वापर हा विविध प्रकारची उपकरणे आणि यंत्रे चालवण्यासाठी आणि स्वयंपाकात उष्णता निर्माण करण्यासाठी केला जातो.

ग्रामीण भागातील विद्युत उर्जेची उपलब्धता आणि वापर लक्षात घेवून गावांचे खालील प्रमाणे वर्गीकरण करता येईल:

१) सर्व घरांपर्यंत वीज पोचली आहे पण वीज पुरवठा अनियमित असतो अशी गावे

२) सर्व घरांपर्यंत वीज पोचली आहे, परंतु शेतांमध्ये वीज पुरवठा नाही किंवा अनियमित असतो अशी गावे

३) ग्रामपंचायतीमधील काही ठराविक वस्त्या, वाड्या किंवा घरांपर्यंत वीज पोचली असून बाकीच्या ठिकाणी वीज पोचलेलीच नाही  अशी गावे

४) अतिशय दुर्गम भूप्रदेशात, दूर जंगलात वसलेल्या वस्त्या, वाड्या किंवा घरे जिथे वीजेचे जाळे घेवून जाणे अशक्य असल्यामुळे वीज पोचलेलीच नाही अशा वस्त्या / वाड्या आणि गावे


गावातील विद्युत ऊर्जेचा विचार करताना वर नमूद केलेल्या प्रकारानुसार स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे. आपल्या गावातील उर्जा समस्येचा विचार करून त्यावर काही गावांनी उत्तर शोधले आहे. अशी काही गावे सामूहिक प्रयत्नातून आता ऊर्जा स्वावलंबी झाली आहेत. वर दिलेल्या क्रमांक ३ व ४ या गटात मोडणारी महाराष्ट्रातील जुन्नर, जव्हार, मोखाडा सारख्या वनवासी भागातील गावे आज स्वतःची वीज निर्माण करत आहेत. त्यासाठी गावात उभारलेल्या प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती खर्च सुद्धा करत आहेत. क्रमांक १ व २ मध्ये मोडणाऱ्या गावांमध्ये जिथे वीज पोचली आहे परंतु शेतीच्या किंवा पिण्याच्या पाण्याचा पंप चालवण्याएवढी पुरेशी वीज उपलब्ध नाही तिथे सौर शक्तीवर चालणारे पंप बसवता येतील. तसेच शाळा, वसतिगृहे, आरोग्यकेंद्रे यासारख्या ठिकाणी सौर उर्जेच्या माध्यमातून छोट्या स्वरुपात वीज निर्मिती करून ती वापरल्याची यशस्वी गावे सुद्धा आहेत.

२०११ च्या जणगणनेतील नोंदीनुसार ग्रामीण भागातील सुमारे ६३% घरांमध्ये स्वयंपाकासाठी इंधन म्हणून लाकूडफाटा वापरला जातो. याचे प्रमाण आज २०१८ मध्ये सुद्धा काही अपवाद वगळता कमी झालेले नाही. ग्रामीण भागात स्वयंपाकासाठी गॅस पोचला आहे पण वारंवार तो बदलण्याची मानसिकता आणि आर्थिक खर्च करायची क्षमता आजही अनेक कुटुंबांकडे दिसत नाही. त्यामुळे गावाच्या आसपासची वन–संपदा झपाट्याने कमी होत आहे. काही ठिकाणी पर्यायी इंधन म्हणून कोळसा, रॉकेल, शेतातील काडी–कचरा आणि शेणाच्या गोवऱ्यांचा वापर देखील केला जातो. वृक्षतोडीमुळे पर्यावरणावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार करता आणि उपलब्ध झाडांची संख्या बघता त्याला दिवसेंदिवस मर्यादा येत आहेत. एल.पी.जी. हा मोठ्या प्रमाणात आयात केला जात असल्यामुळे त्याच्या दरातही पेट्रोल/डीजेल सारखीच वाढ होताना दिसत आहे. हा सिलिंडर दुर्गम भागात पोहोचवणे देखील खूप खर्चिक आहे आणि त्याचा बोजा गावातील गरीब लोकांना पेलण्यासारखा नाही. या सगळ्या बाबी लक्षात घेता, ग्रामीण भागातील प्रत्येक घरात एल.पी.जी. सिलिंडर चा वापर होणे अतिशय अवघड वाटते आणि ते वास्तवाला धरून शक्य होईल असे वाटत नाही. म्हणून जिथे जिथे शक्य आहे तिथे आपल्याला स्वयंपाकासाठी स्वच्छ आणि शाश्वत अशा पर्यायी इंधनाचा विचार करणे आवश्यक आहे.

काही तुरळक गावांमध्ये यासाठी बायोगॅसचा वापर अनेक वर्षांपासून केला जात आहे. परंतु गावातील सर्व घरांमध्ये त्याचा पुरेसा पुरवठा करायचा असेल तर यामध्ये परंपरागत पद्धतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्यावी लागेल. असे प्रकल्प वैयक्तिक पातळीवर यशस्वी होण्याचे प्रमाण खूप कमी आहे, परंतु जर सामूहिक पातळीवर असे प्रकल्प उभारले तर ते प्रभावी आणि यशस्वी ठरतात हे आता सिद्ध झाले आहे. पुण्यातील ग्राम–ऊर्जा संस्था असे प्रकल्प उभारण्यासाठी सर्व तांत्रिक मदत करते. त्यांच्या प्रयत्नातून असे प्रकल्प अनेक गावात उभारले गेले आहेत. यासाठी जो

निधी लागतो त्याची लोक–सहभागातून आणि काही प्रमाणात ग्राम–पंचायतीकडून पूर्तता होऊ शकते. अशा प्रकल्पांमुळे ग्रामस्थांचे आणि विशेष करून महिलांचे शारीरिक कष्ट कमी होऊन त्यांचा वेळ वाचतो. वाचलेल्या वेळात महिला घरात जास्त लक्ष देवू शकतात. मुलांचा अभ्यास, स्वतःचे आणि घरातील सर्वांचे आरोग्य यासारख्या महत्वाच्या गोष्टींमध्ये वेळ घालवू शकतात. दुसऱ्या बाजूला पर्यावरणाचे रक्षण होते. आपल्या गावाच्या आजूबाजूचे जंगल आणि वृक्ष–संपदा वाढण्यासाठी मदत होते. गावात काही छोटे गृह–उद्योग उभारायला देखील मदत होते आणि गावातील राहणीमान सुधारते. अशा प्रकारे ऊर्जा स्वावलंबन मिळवल्यास गावाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते म्हणून ते अत्यंत गरजेचे आहे.

***



## गावातील धन गावात राहावे, ग्रामोद्योगाला चालना द्यावी, पोटापाण्यासाठी शहराकडे जाण्याची गरज भासू नये

जो जो धंदा गावी नसला । प्रोत्साहन मिळावे त्या कार्याला ।
परि तो पाहिजे योग्य ठरला । गावाच्यासाठी ।।
गावचे कलावंत निपुण । त्यांना द्यावे उत्तेजन ।
नवनव्या वस्तू कराव्या निर्माण । उपयोगाच्या जीवनासी ।।
नसतील त्या वस्तू निर्माव्या । येत नसता शिकोनी घ्याव्या ।
घरोघरी त्याच दिसाव्या । गावच्या वस्तू ।।
आपुल्या गावी जे जे होते । आपणची वस्तू वापरावी ते ।
तेणे गावीचे धन गावीच राहते । शक्ती वाढते गावाची ।।
कोणी म्हणती अमुचा पैसा । आम्ही खर्चू हवा तैसा ।
गाव-द्रोही समजावा ऐसा । आपस्वार्थी मानव ।।
म्हणोनि प्रत्येकाने अपुल्या गावी । ग्रामीण वस्तूंना चालना द्यावी ।
त्यात सुधारणाही घडवावी । उन्नती व्हाया कलावंतांची ।।
गावी असावी उद्योग-समिती । जी सतत करील उद्योग-उन्नति ।
गावाचे आर्थिक जीवन हाती । घेवोनी लावील सोय जी ।।
शहराकडे चालला प्रवाह । तो थांबवावा निःसंदेह ।
सर्वांचा गावीच होईल निर्वाह । ऐसी योजना करावी ।।
खेडेची शहराचे जनक । शहर भोक्ते, खेडे उत्पादक ।
शहराकडे न जाता लोक । धावावे उलट खेड्याकडे ।।

**ग्रामगीता – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

*

# ११. ग्रामविकास समितीसाठी महत्वाचे उपक्रम

गावातील सप्त–संपदांचा विकास आणि पंच–शक्तींचे जागरण व संघटन करण्यासाठी आपल्याला काही उपक्रम नियमित पणे करावे लागतील. अशा उपक्रमांची यादी खाली दिली आहे. आपल्या गावातील नैसर्गिक परीस्थिती आणि कार्यकर्त्यांची संख्या, आवड पाहून योग्य उपक्रम निवडावेत. गावात सकारात्मक वातावरण टिकून राहण्यासाठी महिन्याला किमान एक उपक्रम करावा.

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| १ | भू–संपदा | ✓ शेतीमध्ये वाफसा स्थिती राहण्यासाठी ठिबक सिंचन, तुषार–सिंचन आणि काष्ठ आच्छादन यांचा वापर करणे, पाण्याचा अति–वापर टाळणे, पिकाची पाण्याची गरज लक्षात घेवून त्याप्रमाणे योग्य–जल–व्यवस्थापन करणे<br>✓ सूक्ष्म जीवाणू आणि गांडुळे वाढवण्यासाठी जीवामृत / अमृतपाणी यांचा नियमित वापर करणे, शक्यतो महिन्यातून २ वेळा संपूर्ण शेताला देणे<br>✓ सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी हिरवळीच्या खतांचा, कंपोस्ट चा वापर करणे, पिकांचे अनावश्यक अवशेष जागच्या जागी कुजवणे<br>✓ खतांचा वापर जमिनीची आणि पिकाची गरज लक्षात घेवूनच करणे, जमिनीच्या प्रतीनुसार पिक पद्धती ठेवणे. मिश्र पिके आणि पिक फेरबदल सारख्या पद्धती राबवणे<br>✓ गो–आधारित शाश्वत शेती पद्धतीचा प्रचार, प्रसार करणे. यातून जमिनीचे सुपोषण करण्यासाठी आणि जमिनीची प्रत / सुपिकपणा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे |
| २ | जल–संपदा | ✓ जल–संवर्धनाचा मूळ–मंत्र आहे पळणाऱ्या पाण्याला चालायला, चालणाऱ्या पाण्याला रांगायला आणि रांगणाऱ्या पाण्याला जिरायला |

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| | | शिकवणे, त्यानुसार जल–उपचाराचीकामे करणे. ही कामे करताना दुसरं महत्वाचं सूत्र म्हणजे माथा ते पायथा, पाणी नेहमी उताराकडे वाहात जातं म्हणून कामे करताना आधी वरच्या बाजूला आणि मग खालच्या बाजूला करा. आणि तिसरं महत्वाचं सूत्र म्हणजे जिथे पाणी पडते तिथेच त्याचे संवर्धन करणे म्हणजे मूलस्थानी जल–संधारण.<br>✓ गावातील पाऊस अचूक पद्धतीने मोजण्यासाठी गावात पर्जन्यमापक ठेवून रोज पावसाची नोंद घेणे, तज्ञ माणसाला बोलावून पडणारा पाऊस आणि गावातील पिकांचे पाणी–व्यवस्थापन यांचा संबंध समजून घेणे आणि त्याप्रमाणे शेतीत बदल करणे<br>✓ पावसाचे पाणी साठवण्यासाठी आणि भूजल पातळी वाढवण्यासाठी माती–बांध, समतल चर, सिमेंट बांध, नाला/नदी खोलीकरण आणि रुंदीकरण असे विविध उपक्रम लोक–सहभागातून करणे<br>✓ गावातील प्रमुख नाले, तलाव आणि नदीतील गाळ दर २–३ वर्षांनी श्रमदानातून काढणे म्हणजे त्यांची क्षमता वाढेल, तलाव आणि सिमेंट बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे<br>✓ घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी नैसर्गिक फिल्टर द्वारे टाकीत साठवणे (जल–पुनर्भरण) किंवा विहिरीत सोडणे आणि घरातील सांडपाणी शोषखड्डा घेवून जमिनीत मुरवणे<br>✓ आपल्या शेतीला योग्य बांधबंदिस्ती करून उताराच्या बाजूला चर खणणे, यात शेतातून वाहणारी माती जमा होईल आणि जास्तीत जास्त पाणी सुद्धा मुरेल<br>✓ दर शेती हंगामाआधी गावातील पाण्याची उपलब्धता बघून समान न्यायाने त्याची वाटणी करणे आणि त्या प्रमाणे पिकं–पद्धती निवडणे<br>✓ दसऱ्याला जोडून गावातील नदीचा वार्षिक जल–पूजन उत्सव आयोजित करणे. या दिवशी पावसाचा आणि उपलब्ध पाण्याचा आढावा घेवून आगामी हंगामातील पिकांचे नियोजन करणे |

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| ३ | वन–संपदा | ✓ आपल्या गावातील झाडांची गणना करणे आणि त्यांचे संरक्षण करणे<br>✓ आपल्या भागातील स्थानिक वृक्षांची गावातील गायरानावर किंवा जंगल असेल तर जंगलात लागवड करणे– यामध्ये मोहा, जांभूळ, सिताफळ, करवंद, आंबा, आवळा, चिंच, पेरू अशा झाडांचा समावेश करा<br>✓ शेताच्या बांधावर प्रत्येकाने कडुलिंब, सुबाभूळ, बांबू अशी झाडे लावणे<br>✓ शेतीला पर्याय म्हणून किंवा शेतीच्या थोड्या भागात फळबाग लागवड करणे. यातून शाश्वत उत्पन्न मिळेल आणि गावातील वृक्ष–संख्या वाढेल<br>✓ जुन्या काळी जशा देवराया (राखीव जंगल) होत्या तशा पुन्हा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे<br>✓ गावासाठी एक रोपवाटिका तयार करणे आणि स्थानिक वृक्षांचा प्रचार, प्रसार आणि लागवड करणे<br>✓ मोकळ्या जागेवर, रस्त्याच्या दुतर्फा, शाळेच्या कुंपणाच्या बाजूने, गावातील चौकात, स्मशानभूमीत, ओढा आणि नदीच्या कडेने वड, पिंपळ, उंबर अशी झाडे लावणे<br>✓ विविध सत्कार–समारंभ प्रसंगी गावातील लोकांना वृक्ष–भेट देणे, गावातून लग्न होवून जाणाऱ्या मुलीला आणि लग्न होवून गावात येणाऱ्या मुलीला वटवृक्ष रोप भेट म्हणून देणे |
| ४ | गो–संपदा | ✓ गावातील प्रत्येक शेतकऱ्याने किमान एका देशी गायीचे पालन करणे, ती तुमच्या कुटुंबाचे आणि शेतीचे पालनपोषण करेल.<br>✓ देशी गायीपासून मिळणाऱ्या शेण आणि गोमुत्राचा वापर करून जीवामृत / अमृतपाणी, बीजामृत, दशपर्णी अर्क या सारख्या अत्यंत उपयुक्त गोष्टींचा जमीन सुपीक करण्यासाठी आणि नैसर्गिकरित्या कीड–नियंत्रण करण्यासाठी शेतात वापर करणे<br>✓ देशी गायीच्या दुध, दही, तूप, ताक इ. च्या औषधी गुणधर्मांची माहिती घराघरात पोहचवणे<br>✓ तिच्यापासून मिळणाऱ्या बैलांचा वापर शेतात करणे. ट्रॅक्टरपेक्षा बैलांनी |

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| | | केलेली कामे जमिनीच्या आरोग्यासाठीजास्त फायदेशीर असतात. त्याने जमिनीवर दाब कमी पडतो आणि जमिनीतील सजीव सृष्टीचे नुकसान कमी होते, सच्छिद्रता कायम राहते, डीझेल आणि खर्च वाचतो, जमिनीची पाणी धारण करण्याची क्षमता वाढते<br>✓ गावातील काही जणांनी गोमातेच्या शेण, गो–मुत्रापासून विविध औषधी वस्तू, कीट–नियंत्रके, दंत–मंजन, आयुर्वेदिक तेल, धूप इ. वस्तू–निर्मितीचे प्रशिक्षण घेवून गृह–उद्योग सुरु करणे<br>✓ गावात एखादा जातिवंत वळू आणणे आणि त्याच्या माध्यमातून देशी गोवंश सुधारण्यासाठी प्रयत्न करणे, सुदृढ गोवंश स्पर्धा (वासरू / गाय / बैल) घेणे<br>✓ गो–वंशासाठी आरोग्य शिबिरे आयोजित करणे<br>✓ गावातील कोणतीही गाय, बैल कसायाला विकली जाणार नाही असा संकल्प करणे, मृत जनावरांची शास्त्र–शुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावणे |
| ५ | जीव–संपदा | ✓ आपल्या गावात जैवविविधता व्यवस्थापन आणि संरक्षण समिती तयार करणे आणि त्यामार्फत आपल्या परिसरातील जैव–विविधता नोंद वही पूर्ण करणे<br>✓ पिकांच्या स्थानिक वाणांचे संवर्धन करणे, त्यासाठी शेतात काही भागात दर वर्षी याची पेरणी करणे. यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. सध्या जगभरात अशा जुन्या स्थानिक वाणांची चोरी करून त्यावर नवीन जाती विकसित केल्या जातात<br>✓ वृक्ष लागवड करताना आपल्या परिसरातील विविधता टिकवून ठेवणे आणि त्या प्रमाणे झाडे लावून त्यांना जगवणे<br>✓ आपल्या परिसरातील सर्व प्राणी, पक्षी यांना अन्न आणि पाणी मिळेल याची काळजी घेणे<br>✓ निसर्गाने निर्माण केलेल्या प्रत्येक सजीवाचे या सृष्टी–चक्रात विशिष्ट स्थान आहे आणि म्हणून प्रत्येक सजीवाची काळजी घेवून आपल्या गावाचे निसर्ग–चक्र सुदृढ आणि निरोगी राहील यासाठी प्रयत्न करणे |

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| ६ | ऊर्जा–संपदा | ✓ सोलर आधारित सामुहिक प्रकल्प गावात उभारणे आणि त्याचा वापर शेतातल्या पंपाला चालवण्यासाठी करणे, यासाठी काही सरकारी योजना किंवा संस्थांची मदत घेणे<br>✓ गावातील शेणाचा वापर बायोगॅस प्लांट उभारण्यासाठी करणे पण हा सुद्धा सामुहिक प्रकल्प असावा. जेणेकरून त्याची देखभाल करणे सोपे जाते. यासाठी तांत्रिक माहिती आणि प्रशिक्षण घेणे. तुम्हाला परिशिष्ट मध्ये यात काम करणाऱ्या संस्थेची माहिती मिळेल<br>✓ गावातील उर्जेचा वापर कमी करण्यासाठी प्रयत्न करणे |
| ७ | जन–शिक्षण | ✓ शाळा, शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या अनौपचारिक भेटी (गावातील कार्यक्रम, पालक–समिती, ग्राम–समिती इ. च्या माध्यमातून)<br>✓ गावातील शाळा, कॉलेज मध्ये मुलांना योग्य शिक्षण मिळते आहे याकडे लक्ष देणे. शिक्षकांची वर्गात नियमित उपस्थिती आणि विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी प्रयत्न करणे<br>✓ पुस्तकी शिक्षणाबरोबर त्यांना शेतीचे शिक्षण मिळावे यासाठी शाळेबरोबर काम करणे, शाळेला काही जमीन शेतीसाठी उपलब्ध करून देणे, गावातील प्रगतशील शेतकऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे<br>✓ सार्वजनिक कार्यक्रम, गुरु–पौर्णिमा इ. प्रसंगी आदर्श शिक्षकांचा सत्कार करणे<br>✓ विद्यार्थ्यांसाठी गावात विविध शैक्षणिक, खेळांच्या स्पर्धा आयोजित करणे<br>✓ शाळेत सुसज्ज वाचनालय, संगणक आणि विज्ञान प्रयोगशाळा चालू करण्यासाठी शाळेला मदत<br>✓ विद्यार्थ्यांना ग्रामविकासात कसे सहभागी करून घेता येईल याचा विचार करणे, पुण्यातील CEE नावाची संस्था विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती होण्यासाठी अनेक उपक्रम राबवते, त्यांची मदत घेणे |

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| ८ | जन–आरोग्य | ✓ गावाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छता ठेवणे, पाण्याचे स्त्रोत नियमित पणे साफ करणे<br>✓ शौचालये नसतील तर ती बांधून घेणे आणि त्यांचा वापर होण्यासाठी प्रयत्न करणे, हागणदारी मुक्त गाव फक्त पुरस्कारासाठी नाही तर प्रत्यक्षात होण्यासाठी प्रयत्न करणे<br>✓ देशी गायीचे दुध, चांगला भाजीपाला आणि स्थानिक फळे यांचा आहारात वापर करणे, परस–बाग सारख्या उपक्रमातून दैनंदिन आहारात भाजीपाला येण्यासाठी प्रयत्न करणे<br>✓ आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे – विशेषतः वृद्ध आणि महिलांसाठी, आवश्यकते प्रमाणे विविध आजारांसाठी शिबिरे, महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी इ.<br>✓ गावात आयुर्वेदिक आरोग्य–पेटी ठेवणे, ऋतूप्रमाणे दिनचर्या आचरणात आणणे – यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि माहिती–पर व्याख्याने आयोजित करणे<br>✓ साप्ताहिक ग्राम–स्वच्छता करणे आणि ओल्या–सुक्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे<br>✓ निदान आपल्या घरच्या पुरती विष–मुक्त शेती करून अन्न–धान्य आणि भाजीपाला पिकवणे |
| ९ | जन–संस्कार | ✓ आपले सर्व सणवार एकत्र येवून पारंपारिक पद्धतीने साजरे करणे, डॉल्बी आणि अनावश्यक फ्लेक्स लावायचे टाळणे, ढोल–ताशे आणि लेझीम चा मिरवणुकीत वापर<br>✓ पर्यावरण पूरक उत्सव आणि सण–समारंभ यासाठी आग्रह (प्लास्टिक, थर्माकोल चा वापर टाळणे, एक–गाव–एक–गणपती सारखे उपक्रम)<br>✓ लग्न–समारंभ गावाने एकत्र येवून साजरे करणे, जेणेकरून खर्च कमी होईल आणि गरीब कुटुंबाना कर्जाचा बोजा पडणार नाही<br>✓ संध्याकाळच्या वेळी ४ ते ९ वर्षाच्या मुला–मुलींसाठी संस्कार वर्ग (गोष्टी, गाणी, खेळ, श्लोक इ.) आणि त्यापेक्षा मोठ्या मुलांसाठी संघ– |

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| | | शाखा गावात सुरु करणे<br>✓ सर्व घरातील लहान–थोरांनी रोज सकाळी ग्रामदेवतेच्या दर्शनाला जाणे<br>✓ गावात ग्रामगीतेवर प्रवचन, प्रबोधन पर व्याख्यान आयोजित करणे. जसा हरीनाम सप्ताह केला जातो तसा ग्रामगीता सप्ताह आयोजित करणे.<br>✓ गावात दारू –सिगरेट– गुटखा यांचे दुष्परिणाम युवकांना माहिती होण्यासाठी व्याख्याने आयोजित करणे, व्यसने सोडलेल्या लोकांचा सत्कार करून प्रोत्साहित करणे<br>✓ सर्व समाजातील मुलींचा एकत्रित सहभोजन कार्यक्रम आयोजित करणे (कन्या–भोजन), वृद्ध आणि महिलांना सन्मानपूर्वक वागणूक देणे |
| १० | जन–स्वावलंबन | ✓ स्वयं–रोजगारासाठी गावातील युवकांना आणि महिला बचत गटांना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे<br>✓ गावाला लागणारे अन्न–धान्य आणि भाजीपाला आपल्याच गावात पिकवण्यासाठी प्रयत्न करणे, यासाठी पूर्वापार आलेल्या शेती–पद्धतीत कालानुरूप बदल करणे आणि शेतीकडे फक्त व्यावसायिक दृष्टीकोनातून न बघणे<br>✓ गावात लागणाऱ्या जास्तीत जास्त सोयी–सुविधा गावातच कशा मिळतील यासाठी गावातच विविध व्यवसाय सुरु करणे<br>✓ गावातील सर्वांच्या हाताला काम मिळेल, यासाठी प्रयत्न करणे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना ग्रामपंचायतीच्या मदतीने छोटे गृह–उद्योग सुरु करून देणे<br>✓ गावातील पैसा गावात राहील आणि शहरातील पैसाही गावात येईल असे प्रयत्न करणे, गावात आठवडा बाजार भरवण्यासाठी प्रयत्न करणे<br>✓ शेतीपूरक प्रक्रिया उद्योग उभारून शेत मालाचे मूल्य वर्धन करणे, कुकुट पालन आणि शेळीपालन सारखे जोडधंदे विकसित करणे<br>✓ संघटीत बाजार व्यवस्थापनासाठी शेतकरी–गट, उत्पादक कंपनी स्थापन करणे आणि त्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांचा माल विक्री करणे |

आपण वर पाहिलेल्या सर्व बिन्दुंसाठी विविध शासकीय यंत्रणा काम करत असतात. अशा शासकीय यंत्रणांचा उदा. शाळा, आरोग्य उपकेंद्र किंवा केंद्र, ग्राम–पंचायत च्या योजना यांचा वापर / उपयोग करण्यासाठी प्रयत्न करावेत. फक्त त्यावर अवलंबून राहू नये.

पंच–शक्तींचे जागरण आणि संघटन करून ग्राम–विकास साठी काही उपक्रम:

| अनु. | ग्राम शक्ती | जागरण, संघटन आणि त्यातून ग्रामविकास करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| १ | धार्मिक–शक्ती | ✓ साधी राहणी आणि उच्च आचार, विचार असे प्रवचनकार/कीर्तनकार गावात बोलावणे<br>✓ मंदिराची पूजा आणि स्वच्छता रोज एक परिवार करेल अशी व्यवस्था लावणे<br>✓ मंदिरात नियमितपणे आरती, हनुमान–चालीसा होण्यासाठी प्रयत्न करणे, असेच प्रयत्न इतर धार्मिक प्रार्थना स्थळांवर होतील यासाठी प्रयत्न करणे<br>✓ धार्मिक शक्तीच्या माध्यमातून ग्रामविकासाच्या विविध विषयांवर प्रबोधन घडवणे (स्वच्छता, व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, गो–पालन इ.)<br>✓ विविध उत्सव आणि सण सर्व समाजाचे लोक एकत्र येवून साजरे करतील यासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी उत्सवांना ग्राम–स्वच्छता, सह–भोजन (भंडारा) सारखे उपक्रम जोडणे<br>✓ आपल्या गावात एक मंदिर – एक पाणवठा – एक स्मशान होईल यासाठी प्रयत्न करणे, सर्व जाती–धर्माच्या लोकांना सन्मानपूर्वक मंदिर आणि पाणवठा अधिकार देणे |
| २ | युवा–शक्ती | ✓ युवक–युवतींसाठी साठी गावात अद्ययावत वाचनालय, व्यायामशाळा, अभ्यासिका सुरु करणे<br>✓ युवक–युवतींसाठी कौशल्य आणि व्यवसाय प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे, काही निवडक युवकांना प्रशिक्षणासाठी बाहेर पाठवणे<br>✓ शेती करणाऱ्या युवकांसाठी शेती मार्गदर्शन, गो–आधारित नैसर्गिक शेती, आधुनिक तंत्रे आणि सुधारीत बी–बियाणे, मूल्यवर्धन आणि प्रक्रिया उद्योग याचे प्रशिक्षण कार्यक्रम घेणे |

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| | | ✓ युवकांचा ग्रामविकासात सहभाग वाढवण्यासाठी युवकांसाठी विधायक आणि पर्यावरण पूरक उत्सव, आदर्श शेतकरी, आदर्श उद्योजक, आदर्श युवक मंडळ अशा विविध स्पर्धांचे आयोजन करणे<br>✓ युवतींचा ग्रामविकासात सहभाग वाढवण्यासाठी त्यांना स्वयं–सहायता गट, छोटे ग्रामोद्योग प्रशिक्षण शिबिरे, किशोरी विकास प्रशिक्षण आयोजित करणे<br>✓ युवकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी स्वतंत्र बैठका घेणे आणि त्या सोडवण्यासाठी संपूर्ण गावाची मदत घेणे |
| ३ | मातृ–शक्ती | ✓ ग्राम–समितीमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे<br>✓ गावात ग्रामविकासासाठी महिलांची स्वतंत्र मासिक बैठक घेणे<br>✓ महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन (रांगोळी, आदर्श घर, सुदृढ बालक, पारंपारिक पाक–कला, भजनी मंडळ, हरिपाठ, बचत–गट स्पर्धा इ.) करणे<br>✓ स्वयं–सहायता गटांचे योग्य संचलन करून त्यातून महिला संघटन आणि सबलीकरण करणे<br>✓ छोटे छोटे गृह–उद्योग आणि त्यातून संघटन आणि स्वावलंबन (उटणे / रंग / स्थानिक पिके, फळे यांचे मूल्यवर्धन करून पदार्थ निर्मिती) साधणे |
| ४ | सज्जन–शक्ती | ✓ गावातील जेष्ठ लोकांशी चर्चा करून गावासाठी काम करण्याची तयारी असणाऱ्या गैर–राजकीय लोकांची यादी तयार करणे<br>✓ अशा लोकांच्या वैयक्तिक गाठी–भेटी घेवून त्यांना आपल्या ग्रामविकासाच्या कामाची आणि उद्दिष्टांची माहिती देणे<br>✓ गावात मासिक ग्राम–स्वच्छता, शेती–प्रशिक्षण आणि पशु–आरोग्य शिबिरे या सारख्या उपक्रमातून चांगली माणसे निवडण्यासाठी प्रयत्न करणे |

| अनु. | संपदा नाव | संरक्षण, संवर्धन आणि सदुपयोग करण्यासाठी उपक्रम |
|---|---|---|
| ५ | संघ–शक्ती | ✓ गावात संघ शाखा / साप्ताहिक मिलन सुरु करण्याचा प्रयत्न करणे<br>✓ तालुका, जिल्हा कार्यकर्त्यांचा त्यासाठी गावात नियमित प्रवास घडवून आणणे<br>✓ संघ–स्वयंसेवकांचा ग्रामविकास समिती मध्ये आणि उपक्रमात सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न करणे<br>✓ ग्रामविकास समिती सदस्यांना संघ कार्यपद्धती समजण्यासाठी संघाच्या वर्गाला पाठवणे |

# १२. ग्रामविकासः कार्यकर्ता विचारधन

ग्रामविकासात अनेक वर्षे काम करणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या अनुभवाच्या शिदोरीतून काही विचार आपल्यासाठी मांडले आहेत. अशाच कार्यकर्त्यांचे निवडक लेख खाली देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

## १) ग्राम-विकासाचा मूलमंत्र ''ग्राम-स्वच्छता'' : श्री. विनय कानडे

जिथे हात फिरे तिथे लक्ष्मी वसे या उक्ती-प्रमाणे अंतर्बाह्य स्वच्छ गाव हा सर्वांगीण ग्राम-विकासाचा पाया आहे. त्यामुळे प्रत्येक गावात पंधरा दिवसातून किंवा महिन्यातून एकदा ग्रामस्वच्छता / श्रमसंस्कार करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या ग्राम-स्वच्छतेसाठी खालील संकेत आणि नियम पाळल्यास याचा उद्देश सार्थ ठरू शकतो असे वाटते:

* ग्रामस्वच्छतेसाठी ठरलेल्या दिवसाच्या १-२ दिवस आधी सर्व गावकऱ्यांना उपक्रमात सहभागी होण्याची विनंती करावी (घरोघर सांगून, मंदिरातील ध्वनी-क्षेपकाचा वापर करून इ.)
* गावातील सर्व गट-तट, जाती-पाती, पंथ, पक्ष, महिला, पुरुष सर्वांना बोलवावे. कुणालाही टाळू नये
* जे लोक येणार नाहीत त्यांच्याबद्दल नकारात्मक / वाईट बोलू नये, तेवढे मन मोठे करावे. पाची बोटे आपल्याकडे ठेवावीत!
* येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपली सामाजिक प्रतिष्ठा / पद (सरपंच, पोलीस-पाटील, ग्राम-पंचायत सदस्य, तलाठी) आणि आर्थिक स्तर बाजूला ठेवून गावकरी म्हणून स्वच्छतेत सहभागी व्हावे
* स्वच्छता करणाऱ्यांनी इतर गावकऱ्यांना उपदेश करू नये, त्यासाठी आपली अजून बरीच तपश्चर्या बाकी आहे हे समजून घ्यावे
* लोकांच्या टीका-टिप्पणी मुळे विचलित किंवा निराश होऊ नये, जनता जनार्दन आहे तो परीक्षा घेणारच हे ध्यानात असू द्यावे
* स्वच्छता, श्रमसंस्कार हे सार्वजनिक निर्विवाद जागेतच (मंदिर, शाळा, गावातील एकत्र येण्याची जागा, गायरान इ.) करावेत त्यासाठी वादात पडू नये

* या सर्व उपक्रमांची प्रसिद्धी, फोटो, उद्घाटन इ. मध्ये पडू नये, आपल्यावर अनंत उपकार करणाऱ्या भू–मातेची आणि गावाची निःस्वार्थ सेवा करण्याची ही संधी आहे अशा भूमिकेतून याच्याकडे पाहावे

**सर्वात शेवटी पण महत्वाचे:**

महिना / पंधरा दिवसातून एकदा स्वच्छता किंवा श्रमसंस्कार केल्याने गावात फार स्वच्छता होणार नाही पण गावाची निःस्वार्थ सेवा करण्याचा संस्कार नकळत स्वतःवर आणि इतरांवर देखील होतो. काही निवडक लोकांनी स्वच्छता करावी आणि बाकीच्यांनी बघ्याची भूमिका घ्यावी असे इथे अपेक्षित नाही. आपल्या निःस्वार्थ प्रेरक वृत्तीचा परिणाम म्हणून गावाच्या प्रत्येक घरातून एक पुरुष, एक महिला बाहेर पडावी आणि काही मिनिटातच गाव स्वच्छ व्हावा असे आपले स्वप्न असावे. तसेच नियमितपणे एकत्र येवून सर्व भेदभाव विसरून गावासाठी निःस्वार्थ कार्य करत राहिल्यामुळे ग्रामविकासासाठी कार्य करणारा एकदिलाचा उत्साही कार्यकर्ता संच निर्माण होतो.

केवळ स्वच्छतेसाठी एकत्र न येता, एकत्र येण्यासाठी (गावाच्या एकीसाठी) स्वच्छता करणे महत्वाचे

## २) ग्राम–विकासात मी: सौ. पद्मताई कुबेर

रामायणात प्रभु रामचद्रानां लंकेत जाण्यासाठी सेतूबंधनात मदत करुन खारीने आपल्या कामाचा वाटा उचलला होता. तसे आपल्या गावच्या विकासासाठी प्रत्येक महिलेने सहभागी व्हायला हवे. गावच्या लोकसंख्येत स्त्रिया चीं संख्या  निम्मी किंवा अधिक कारण पुरुष वर्ग कामासाठी बाहेर गावी. मग गावच्या विकासाची जवाबदारी आपलीच नाही का? आणि स्त्रीने मनावर घेतल्यास कोणतेही काम शक्य होते घरात मुलगा, पति, वडील, भाऊ, दिर, सासरे यांच्याशी संवाद तिचाच असतो ना!

गावातील गैरसोयींचा त्रास आपल्यालाच जास्त होतो. गाव अस्वच्छ असेल तर पाणी अशुद्ध, साथीचे आजार घरातील माणसांना, जनावरांना होतात .ते आजारपण निभवावे लागते आपल्याला. गावात शाळा चांगली नाही, मुलांना दुसऱ्या गावात सोडा–आणा. व्यवस्था महिलांनाच करावी लागते. गावात व्यसनाधीनता असेल तर आपल्या मुलांवर तसेच संस्कार होतात. गावातील पारावर रिकामटेकडी माणसे असतील तर त्याच्या टिंगल टवाळीला आपल्या पोरी बाळींनां सामोरे जावं लागते. अशा अनेक अडचणी आपल्या गावात आहेत. चला सिद्ध होवूया या सगळ्या वर मात करण्यासाठी आपले गाव सुजलाम सुफलाम स्वावलंबी करुया. पण अडचणी, अडथळे खूप आहेत बरका! मार्ग निघणार पण त्यासाठी कधी लढावे लागणार, (तलवारी घेऊन नाही हं) तर कधी वाकावे लागणार. हे काम एकटी दुकटीचे नाही. त्यासाठी आपत्या मैत्रीणींशी गावच्या विकासावर बोलूया. दहा

वीसजणींशी बोलल्यावर चार दोन जणी सहमत होतील. सहमत असलेल्या सगळ्या कामाला येणार नाहीत. मग काय करायचे? गावातील बचत गट,भजनी मंडळ, काही युवकांशी ,गावातील वडीलधारी मंडळींशी विषय बोलायचा तुमची कल्पना मांडायची.अशा रितीने छोटा गट तयार होईल. ज्या सगळ्यांनाबरोबर घेऊन गावाचा सहजच फेरफटका मारायचा. प्रत्यक्ष फेरी मारायला चार दोन जण येतील. हरकत नाही आपण गावात काय काय आहे बघायचे शाळा, दवाखाना, रस्ते, केरकचरा ,देवळे याची स्थिती कशी आहे. ते बघायचे चर्चा करायची.दर आठ ते दहा दिवसांनी जमायचे, विषय गावचा विकास. सातत्याने भेटायचे .एकमेकांचे विचार समजून ,कल्पनांची देवाणघेवाण करायची.आपल्या भेटीत सातत्य राहीले कि गावकऱ्यांच्या लक्षात येते इथे चांगले काम चालते.जमण्याचे ठिकाण हे गावाचे मध्यवर्ती सभामंडप किंवा एखादे देऊळ असे असावे.म्हणजे चर्चा ऐकायला लोक येतात व नकळत सहभागी होतात. प्रथम टिका सहन करावी लागणारच पण आपण गावाच्या विकासाचा वसा घेतला आहे. तो उतायचा मातायचा नाही. सगळ्याच्यां सहमतीने एखादे स्वच्छतेचे काम हाती घ्यायचे. आपली संख्या लक्षात घेऊन ठिकाण निवडायचे. वेळेवर दोन चार गैरहजर असतील. कदाचित उलटे ही होईल .संख्या जास्त येईल.आपली सर्व तयारी ठेवायची. कोणी योवो न योवो ठरवले ते करायचेच.कचराकुंडीची व्यवस्था होते का ते बघायचे. आता थांबायचे नाही.काही ना काही काम करत राहायचे. घरातील कचरा व्यवस्था कशी करायची हे शिकायचे, घराघरात जाऊन सांगायचे. मार्ग कोणताही असेल विषय प्रत्येक घरात जाऊन पोचला पाहिजे. आपल्या कामात अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, आशा ताई यांची मदत घ्यायची.गावातील इतर समविचारी लोकांशी बोलून गावाच्या प्रश्नावर चर्चा करून तोडगे निघू शकतात. बचतगटांच्या सहली आदर्श गावांना काढायच्या. त्यातून बरीच माहिती मिळते. नवीन कल्पना समोर येतात. लहान मुलांसाठी संस्कार वर्ग सुरु करायचे. मोठ्या मुलांसाठी अभ्यासिका, विकास शिबीर आयोजित करायची.प्रत्येक कामात आवडी प्रमाणे इतर महिलांना सहभागी करायचे. गावात एखाद्या देवळात सामूहिक आरती सुरू करायची .आरतीचा मान प्रत्येक घराला मिळेल अशी व्यवस्था करावयाची.यातून एकजूट होते व गावची मोठी कामे मार्गी लागतील. आज आपली मुले शेती करत नसून बाहेर गावी नोकरी धंदा करतात. आपली शेती चागंली झाली, भरघोस उल्पन्न आले तर मुलं बाहेर जाणार नाहीत. जास्त उत्पन्न देणारी पिके, गट शेती, सामूहिक शेती चे प्रयोग करुया.गाव स्वावलंबी होण्यासाठी छोट्या उद्योगाची माहिती करून घेऊन युवकांना सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देऊ त्यामुळे गावाचा मुलगा गावात राहील व चार हातानां काम मिळेल. महिलांसाठी उद्योग विषयक प्रशिक्षण आयोजित करूया. ग्रामपंचायतीची मदत प्रत्येक कामात घ्यायचीच. शासकीय योजना खूप आहेत. तज्ञांकडून माहिती वेळोवेळी गावात देऊया. कामासाठी निधीची व्यवस्था गावाबाहेर असलेल्या नोकरदार मंडळींवर

## मातृ-शक्ती गौरव, महिलोन्नती, महिलांचे संघटन

ग्रामोन्तीचा पाया शिक्षण । उद्याचे राष्ट्र, आजचे संतान ।
यासाठी आदर्श पाहिजेत गुरुजन । राष्ट्रनिर्माते ।।
विद्यागुरुहूनी थोर । आदर्श मातेचे उपकार ।
गर्भापासूनि तिचे संस्कार । बालकांवरी ।।
जिच्या हाती पाळण्याची दोरी । तीच जगाते उद्धरी ।
ऐसी वर्णिली मातेची थोरी । शेकडो गुरुहूनहि ।।
मातेच्या स्वभावे पुत्राची घडण । त्यास उज्वल ठेवी तिचे वर्तन ।
स्त्रीच्या तेजावरीच पुरुषाचे मोठेपण । ऐसे आहे ।।
म्हणती जरी 'बाप तैसा लेक' । परि माउलीचे महत्व अधिक ।
मातृशक्तीनेचि वाढती सकळीक । मुले चारित्र्याने ।।
उत्तम महिला हेची करी । आपुले घर ब्रीदासह सावरी ।
मूलबाळ आदर्श करी । वरी प्रेमळपण सर्वांशी ।।
याचं गुणे 'मातृदेवो भव' । वेदाने आरंभीच केला गौरव ।
नररत्नांची खाण अपूर्व । मातृजाति म्हणोनिया ।।
प्रल्हादाची कयाधू आई । छत्रपतींची जिजाबाई ।
कौसल्या, देवकी आदि सर्वही । वंदिल्या ग्रंथी ।।
समाजी जो पुरुषासी आदर । तैसाची महिलांशी असावा व्यवहार ।
किंबहुना अधिक त्यांचा विचार । झाला पाहिजे समाजी ।।
जैसी मुलांची संघटीत सेना । तैसी स्त्रियांची असावी संघटना ।
आपुल्या सुखदुःखाच्या भावना । प्रकटवाव्या सभा-संमेलनी ।।
दूर सारोनी जातीय आदि भाव । जमवोनी महिला समुदाय सर्व ।
तिळगुळ, हळदीकुंकू, शारदोत्सव । सहभोजनादी करावे ।।
स्त्रियांचे स्वतंत्र मेळ-समुदाव । त्यांच्या उन्नतीचा कला गौरव ।
प्रतिकाराचीही त्यांना जाणीव । अवश्य असावी ।।
सर्व सोयी पुरुषांकरिता । स्त्रियांसाठी सर्व व्यथा ।
हे कोण बोलते शास्त्र आता ? । द्यावे हाता झुगारोनि ।।
म्हणोनी रथाची दोन्ही चाके । मजबूत करावी कातोनि सारखी ।
तरीच संसारगाडी सुखे । सुखावेल ग्रामजीवनाची ।।
आदर्श ऐसे मातापिता । जन्म देतील आदर्श सुता ।
ते वैकुंठ बनवितील भारता । तुकड्या म्हणे ।।

**ग्रामगीता - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

*


टाकावी. ग्रामसभेला उपस्थित राहावे. एक दोघी न जाता तीस चाळीस जणांनी जाऊन प्रश्न मांडावेत. ग्रामसभेला उपस्थित राहण्याचे महत्व ह्याचे प्रबोधन करावे लागेल.आपण गावात महिला दबाव गट स्थापन करु शकतो. अनेक गावात व्यसनाधीनता कमी झाली आहे दबाव गटाच्या माध्यमातून. महिलांवरील अत्याचारावर हा गट आळा घालू शकतो. हे सर्व करण्यासाठी प्रत्येकीला आई,ताई व्हावे लागले. एकमेकींना संभाळून घ्यावे लागेल. आपसात धुसफूस नको. हळदीकुंकू, शारदोत्सव ,सहभोजनाचे कार्यक्रम घेऊन गावची एकी करावी . विविध विषयांवर विचारवंताना गावात  बोलवून गावच्या विकासात त्यांचे मार्गदर्शन घ्यावे.गावात फलक लेखन सुरू करावे. परंतु या सर्व कामांना प्रमुख व्यक्ती निवडावी .कामाची विभागणी करून कामे करावी. आज गावात आपल्या मैत्रीणी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आहेत. त्या स्वतः काम करतील यासाठी दक्ष राहावे. वेळप्रसंगी त्यांना साथ द्यावी. शाळा, दवाखाना, हयाची व्यवस्था सुधारण्यासाठी सतत प्रयत्न करावे. महिलांनी कोंबडी पालन, शेळीपालन, देशीगाय पाळणे इ. कोणताही व्यवसाय करून आपल्या घराचे त्याच बरोबर गावाचे उत्पन्न वाढवावे.

जलसंधारणाच्या कामात महिलांचा सहभाग हा गावाची जलक्रांती घडू शकते. पाणी फौंडेशन, जलदूत प्रकल्प (सेवावर्धिनी) आणि इतर अनेक सेवा प्रकल्पांमध्ये श्रमदानात मोठा वाटा महिला वर्गाचा होता हे कोणी नाकारु शकत नाही.

## ३) सामाजिक समरसतेतून गाव एक, गाव नेक: डॉ. दिवाकर कुलकर्णी

चराचरात परमेश्वर पाहणारी आपली भारतीय संस्कृती आहे. ग्रामजीवन हे या संस्कृतीचे आधारकेंद्र आहे. मग गावात बेकीची पहार रोवले जाणे कसे काय घडले? समरसतेच्या तत्वज्ञानाचा विसर आणि त्याचा प्रत्यक्ष आचरणात वापर हरवल्यामुळे असे झाले आहे. पू. सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी केलेल्या आवाहनाप्रमाणे एक गाव – एक मंदिर – एक पाणवठा – एक स्मशान अशी स्थिती सर्व गावात यायला हवी. हे होण्यासाठी ज्या गावांनी हे शक्य करून दाखवले त्यांचा आदर्श आपण घेतला पाहिजे. देशाचा खरा विकास हा माणसा–माणसातील भेदभाव नष्ट झाल्याशिवाय होऊच शकत नाही. गावातील भेदभाव राहिला, तर गावाने कितीही भौतिक प्रगती केली तरी त्याला काहीही अर्थ उरणार नाही. आणि म्हणूनच समरसता हा ग्रामविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय आहे. हा सामाजिक आणि व्यक्तिगत संस्काराचा भाग आहे. देवाने मानवाला निर्माण करताना कोणताही भेदभाव उच्च–नीचता केली नाही. ही संपूर्णपणे मानव–निर्मित आहे. आज गावात देऊळ आहे. दररोज हरिपाठ होतोय. परंतु हा हरिपाठ ही आता वारकरी संप्रदायातील हरिहर भाव लोप पावून सर्वसमावेशक राहिलेला नाही. गावात हे वातावरण बदलून पुन्हा पूर्वीसारखे एकीचे वातावरण आणता येईल का?

ग्रामगीता ही सम्यक ग्रामविकासाची गंगोत्रीच होय. यात तुकडोजी महाराज म्हणतात:



**सर्व विश्वची माझे घर, ऐसे बोलिले ज्ञानेश्वर ।**
**त्याचे प्रात्यक्षिक सुंदर, गाव व्हावे ।**
**मनुष्य ग्रामाचा संरक्षक, ग्राम देशासि पोषक ।**
**देश विश्वाचा घटक, ऐसे व्हावे यथार्थ ।**
**म्हणोनी स्वरूप द्यावे सामुदायिक, सर्व गाव चि कुटुंब एक ।**
**श्रमती खाती सर्वच लोक, ऐसे दृश्य दिसावे ।**
**आमुचे गाव आमुचे घर, सर्व व्यवहार सगळ्यांवर ।**
**सर्वांचा सर्वां ठायी हातभार लागावा ।**
**जनी भोजनी मंदिरी अस्पृश्यतेचीही न उरारी दरी ।**
**स्थान, मान सर्वोतपरी, एक करावे सर्वांचे ।**

परंतु ही संत वचने केवळ ग्रामगीतेतच राहू नयेत. सुविचारांसारखी शाळेचा फळा किंवा भिंती सुशोभित करण्यापुरती राहू नयेत. ही वचने आचरणात आणली पाहिजेत. त्याची सुरुवात स्वतःपासूनच करायला हवी.

सेवायोगी संत गाडगेबाबा यांची सर्व कीर्तने ही सुस्पष्ट, वाईट प्रवृत्तींवर कठोर प्रहार करणारी असत. आपल्याकडील सगळ्यात वाईट प्रथा म्हणजे जातीगत अस्पृश्यता. गाडगेबाबांनी स्वतःच्या आयुष्यात अनेक वेळा अस्पृश्यतेचे चटके काय असतात हे स्वतः अस्पृश्य असल्याचे खोटेच सांगून सहन केले आहेत. असेच एके दिवशी बाबा भर दुपारी पायी जात होते. त्यांना तहान लागली होती म्हणून कुठे पाणी मिळते का हे शोधत असताना त्यांना एक विहिर दिसली. तिथे आजूबाजूला कोणीच दिसत नव्हते, यांनी विहिरीतून पाणी काढले आणि प्यायला सुरुवात केली. इतक्यात त्या विहिरीचा मालक शेतकरी तिथे आला. बाबांचा फाटका अवतार बघून त्याला शंका आली म्हणून त्याने जरा

मोठ्या आवाजात विचारले कि बाबा कोण रे तू? बाबांनी खोटेच सांगितले कि मी महार आहे आणि तहान लागली म्हणून पाणी पीत होतो. हे ऐकल्या बरोबर त्या मालकाला राग आला आणि त्याने बाबांना लाथा–बुक्क्यांनी खूप मारहाण केली. बाबांनी मूकपणे मार सहन केला. आपल्या सारखा हाडामासा–पासून बनलेला बांधव फक्त पाणी पिण्यासाठी पाणी काढले म्हणून इतका अपमानित होऊन लाथाबुक्क्यांनी कसा तुडवला जाऊ शकतो? हे पाहून बाबा फार व्यथित होत. ते कीर्तन करताना प्रश्न विचारीत – बाबांनो तुमचे तांब्या–पितळीचे भांडे बाटले तर तुम्ही काय करता? लोक म्हणत कि आम्ही विस्तवात टाकून शुद्ध करून घेतो. बाबांचा पुढचा सवाल डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा असे, मग माणूस बाटला तर फक्त आंघोळ करून कसा काय शुद्ध होतो? माणसाला पण तुम्ही जाळून का नाही शुद्ध करत? असले भामटे वागणे सोडा. आपल्याकडे सर्व संतानी समतेची शिकवण दिली आहे. त्याचे दाखले देताना तुकोबांचा अभंग बाबा सांगत.

**जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले ।**

**तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा ।**

म्हणून शिवाशिव सोडली पाहिजे. आपल्याकडील अस्पृश्यता आणि भेदभाव नष्ट व्हावा म्हणून अनेक संत, महात्मे, समाज सुधारक यांनी अथक प्रयत्न केले आहेत. आपल्या कडे सर्व जातिधर्मात संत झाले आहेत आणि त्यांनी एकच शिकवण दिली आहे – सर्व मानवांना आणि पशु–पक्ष्यांना सुद्धा समान वागणूक द्या. आपण सगळेच त्या ईश्वराची लेकरे आहोत आणि प्रत्येकात त्याचा अंश आहे. काही गावांनी हे प्रत्यक्ष आचरणात आणले आहे. गावातील उपेक्षित बांधवांना ग्रामदेवतेच्या मंदिरात सर्वांसोबत सन्मानपूर्वक प्रवेश असला पाहिजे. सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडीत असा कार्यक्रम झाला. महादेवाच्या मंदिरात गावातील सर्व समाजाने एकत्र येवून अभिषेक केला. घनसांगवी गावामध्ये सर्व समाजातील बांधवांनी एकत्र येवून पूजा करायला सुरुवात केली. धर्माबाद तालुक्यातील समराळा गावात सर्व उपेक्षित बांधवांना वाजत गाजत मंदिर प्रवेश कार्यक्रम घेण्यात आला. वाळूज जवळ असलेले पाटोदा गाव तर गाडगेबाबांचा आदर्श घेवून त्यांच्या विचारांवरच उभे राहिलेले आदर्श गाव आहे. अशी अनेक उदाहरणे आपल्याला महाराष्ट्रात ठिकठिकाणी पाहायला मिळतात. गावातील सर्व जयंत्या / पुण्यतिथ्या / सणवार हे एकत्र येवूनच साजरे व्हायला हवेत. तेंव्हाच आपण खऱ्या अर्थाने आपल्या संतांची शिकवण फक्त भिंती किंवा फळ्यांवर न लिहिता ती आचरणात आणली असे म्हणू शकू.

**आपल्या गावात हा समरसतेचा भाव सर्वांमध्ये रुजवण्यासाठी काही उपक्रम खाली सुचवले आहेत:**

१) गावात सर्व महापुरुष जयंती, पुण्यतिथी असे कार्यक्रम आयोजन करणारी सर्वसमावेशक समिती

गावाने तयार करावी

२) गावातील तरुणांना या समितीचे पदाधिकारी करावे आणि जेष्ठ मंडळींनी मार्गदर्शक म्हणून राहावे

३) वर्षभरात साजरे होणारे जयंती, पुण्यतिथी याची एक दिनदर्शिका तयार करावी आणि त्याचे नियोजन करावे

४) या सर्व कार्यक्रमांसाठी गावातील सर्वांनी वर्गणी द्यावी

५) गावातील ग्रामदेवतेच्या वार्षिक यात्रेमध्ये सर्व जातीच्या बंधू–भगिनींना पूजे–अर्चेची सन्मानपूर्वक संधी द्यावी

६) गावातील मंदिरासमोर सर्व जातीच्या बंधू–भगिनींना सन्मानपूर्वक मुक्त प्रवेश आहे असे फलक लावावेत.

७) गावातील सर्व जाती–धर्माच्या मुलींसाठी एकत्र येवून कन्याभोजन सारखे कार्यक्रम, किंवा ५–६ कुटुंबांनी एकत्र येवून सामुहिक भोजनासारखे कार्यक्रम घ्यावेत


८) शुभविवाह सारख्या प्रसंगी उपेक्षित समाजाच्या वराला थेट गाभाऱ्यात जाऊन सन्मानपूर्वक दर्शन घेण्याची परवानगी असावी. प्रारंभी असे काही प्रसंग गावकऱ्यांनी ठरवून घडवून आणावेत म्हणजे तशी प्रथा गावात रूढ व्हायला मदत होईल.

९) लग्न कार्यात किंवा गावाच्या भंडाऱ्यात सर्वांची एकच पंगत असावी तिथे भेदभाव करू नये

१०) गावातील पाणवठ्यावर सर्वांना पाणी वापरण्याचा समान अधिकार असावा

हे सर्व जर आपल्या गावात घडवून आणायचे असेल तर चराचरातील परमेश्वराची पूजा सर्वांना बरोबर घेवून बांधावी लागेल. वारकरी संप्रदायातील हरिहर भावाचा आधार आपणास त्यासाठी घ्यावा लागेल. मग गाव खऱ्या अर्थाने एक होईल, नेक होईल !! गाव एक होता सारा नव्हे तर गाव एक आहे सारा हे स्वप्न साकार होईल.

***



## ग्रामशुद्धी, स्वच्छतेचे महत्व आणि रामधून

कागदी पुस्तकात, काव्यात । खेड्याचे वर्णन दिव्य बहुत ।
परि वस्तुस्थिती पाहता तेथे । क्षणभरही थांबवेना ।।
रस्ते सर्व घाणीने भरले । आजुबाजूस डबके साचले ।
एकही काम न निभे तेथले । शहराविण ।।
जेंव्हा कार्यकर्ते होती आळसी । त्यात उपभोगाची वाढे ख़ुशी ।
तेव्हाच अंतर पडे कार्यासी । गावसेवेच्या ।।
सध्याची ऐसी प्रदक्षिणा । ही प्रदक्षिणेची विटंबना ।
मार्गाची घाण साफ होईना । प्रदक्षिणा काय कामाची ।।
म्हणोनीच काढली रामधून । व्हावयासी गावाचे पुनर्निर्माण ।
मित्रहो । रामधून नाही आजची । ही आहे परंपरा प्रदक्षिणेची ।
प्रदक्षिणेत योजना होती कार्याची । तीच आहे रामधून ।।
मी समजतो गावही शरीर । त्यास राखावे नेहमी पवित्र ।
त्यानेच नांदेल सर्वत्र । आनंद गावी ।।
जैसे आपण स्नान करावे । तैसे गावही स्वच्छ ठेवीत जावे ।
सर्वची लोकांनी झिजुनी घ्यावे । श्रेय गावाच्या उन्नतीचे ।।
म्हणोनी स्वच्छ ठेवावे दुकान, घर । नाल्या, मोऱ्या, सडका चौफेर ।
मग रामधूनची फेरी सुंदर । काढावी आबालवृद्धांनी ।।

**ग्रामगीता – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

*

# १३. महाराष्ट्रातील प्रगतीशील गावे

## यशोगाथा १: आनंदवाडी, लातूर – श्री. दत्ता पुरी

आनंदवाडी हे लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील एक छोटंसं गाव. १२५ उंबरे व ६३५ लोकसंख्या असलेलं मांजरा नदीच्या कडेला वसलेलं एक टुमदार गाव. गेली ७–८ वर्षे हे गाव देवगिरी ग्रामविकास विभागाच्या संपर्कात आहे. पाटोदा इथे झालेला ग्रामविकास अभ्यास वर्ग आणि गुजरात मध्ये झालेली प्रेरणा सहल अशा दोन्ही घटनेतून गावातील कार्यकर्त्यांनी प्रेरणा घेतली. त्यांनी ठरवले कि आनंदवाडी ला सुद्धा आपण एक आदर्श गाव करायचे. कार्यकर्त्यांनी गावात आल्यानंतर बैठका घेतल्या आणि सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन केले. याचा परिणाम असा झाला कि मागील २०१५ मधील ग्रामपंचायत निवडणूक बिन–विरोध करण्यात आली. गावाचा कारभार गावातील महिला–शक्तीच्या हातात देण्याचा निर्णय घेण्यात आला. गावाची सत्ता खऱ्या अर्थाने गावातील कारभारणीच्या हाती देण्यात आली. गावातील ग्रामसेवक सुद्धा स्वयंसेवक असल्यामुळे गावात प्रवासी संघ कार्यकर्त्यांनी केलेल्या चांगल्या विचारांच्या पेरणीला यश मिळत होतं. तशी या गावाने गेली १८–१९ वर्षे म्हणजे सन १९९९–२००० पासून आपल्या गावात अनेक लोक–उपयोगी प्रकल्प राबवून गावात एक विकासाची परंपराच निर्माण केली होती. या गावात गेल्यानंतर त्यांना मिळालेले विविध पुरस्कार आणि उपक्रम यांची एक भली मोठी फाईल आपल्याला पाहायला मिळते. गावाने लोक–सहभाग आणि शासकीय–निधी/योजना यांची उत्तम सांगड घातलेली पाहायला मिळते.

गावातील कार्यकर्त्यांना ग्रामविकास अभ्यास वर्गात आणि संघाच्या प्रवासी प्रचारकांच्या माध्यमातून सप्त–संपदा आणि पंच–शक्ती यांची माहिती मिळत होतीच. या विचारांच्या जोडीला गावातील एकीचे बळ मिळाले आणि गावाने अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम करून एक आदर्श निर्माण केला. त्यातील काही प्रमुख उपक्रम खाली देत आहोत:

१) मरणोत्तर अवयव–दान करणारे भारतातील पहिले गाव

२) गावातील सर्व घरे महिलांच्या नावावर आणि घरावर त्यांच्या पाट्या देखील लावण्यात आल्या आहेत

३) अंध–श्रद्धेला फाटा देवून स्मशान भूमीत विविध वृक्ष लागवड करून सुशोभित केली आणि तिथेच

सण–उत्सव साजरे केले जातात

४) श्रद्धेला पर्यावरणाची जोड – माणसाच्या मृत्यू–नंतर रक्षा नदीत विसर्जित न करता, त्या राखेवर शेतात एक झाड लावून पर्यावरणाला हातभार लावायचा अनोखा उपक्रम राबवला जातो

५) अनावश्यक खर्चाचा भार टाळण्यासाठी गावातील मुलींचे विवाह सामूहिकरीत्या वर्षातून एकदा गावातील सर्व लोक मिळून लावतात. त्यासाठी प्रत्येक जण काही धान्य देतो, गावातील लोकच स्वयंपाक सुद्धा करतात

६) लोक–सहभागातून मंदिर निर्माण आणि ग्रामपंचायत भवन बांधणे यासाठी २५ लाख रुपयांचा निधी जमा केला

७) रक्षा–बंधन च्या निमित्ताने गावातील पुरुष एकत्र येवून महिलांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करतात, आपल्या भगिनींचे आरोग्य चांगले राहावे यासाठी भावाची ही ओवाळणी असते

८) ग्रामपंचायतीच्या १००% कर वसुलीसाठी, कर भरणाऱ्या व्यक्तींना मोफत पीठ गिरणी सेवा पुरवली जाते

९) आंतर–राष्ट्रीय ISO प्रमाणपत्र असेलेली ग्रामपंचायत इथे आहे

१०) संत गाडगेबाबा ग्राम–स्वच्छता अभियान मध्ये लातूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक

११) निलंगा तालुक्यातील स्मार्ट ग्राम म्हणून आनंदवाडी (गौर) सर्वांना परिचित

१२) सन २००६–०७ मध्ये राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या हस्ते निर्मल ग्राम पुरस्कार

१३) सन २००८–०९ मध्ये तंटा–मुक्त गाव म्हणून पुरस्कार

१४) हुंडा बंदी विरोधात गावाने अभियान सुरु केले आहे आणि अनेक युवक याला पाठींबा दर्शवून हुंडा न घेता विवाह करत आहेत

अशा अनेक उपक्रमांची यादी आहे. पण सर्वात महत्वाचे आहे ते गावाची एकी आणि आपल्या गावातील सर्वजण आनंदी आणि समाधानी राहोत या करता एकत्र येवून काम करण्याची तयारी. अगदी अलीकडे गावाने पानी–फौन्डेशन च्या वॉटर कप स्पर्धेत भाग घेतला होता. जेंव्हा सुरुवातीला पुरुष मंडळी श्रमदान करण्यासाठी पुढे येत नव्हती, तेंव्हा गावातील महिलांनी मंदिरात १ रात्र मुक्काम केला आणि निक्षून सांगितलं कि जर पुरुष श्रमदान करणार नसतील तर आम्ही मंदिरातच राहू. पण गाव समजूतदार असल्यामूळे लगेचच कामाला लागलं. अभिनेता आमीर खान आणि त्यांची पत्नी किरण राव यांनी जेंव्हा गावाला भेट दिली तेंव्हा २ तास त्यांनी गावकऱ्यांशी गप्प्पा मारल्या आणि गावाने केलेले विविध उपक्रम समजून घेतले. आणि शेवटी त्यांच्या तोंडून बाहेर पडले की ''शायद भारत में ऐसा कोई गाव होगा ये हमने कभी सोचा भी नही था..''

(अधिक माहिती आणि गावभेटीसाठी संपर्क: श्री. माउली चामे –९६६५१०८६६६)

## यशोगाथा २: बारीपाडा, धुळे – श्री. जगन्नाथ पाटील

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील दुर्गम असा बारीपाडा हा वनवासीपाडा. या पाडयाची सन १९९२ पूर्वीची परिस्थिती म्हणजे उजाड, ओसाड माळरान ,पिण्यासाठी घोटभर पाणी नाही. लांब–लांब पर्यंत हिरव्या पानांचा ठिकाणा नाही, शेतात पीक नाही , निरक्षरता, व्यसनाधिनता यांनी ग्रासलेला हा पाडा. बहुतांशी लोकांना पावसाळ्यानंतर कामासाठी स्थलांतर करावं लागायचं. पण १९९२ नंतर हे चित्र पार बदलले आहे. गांवात मोठया उमेदीने आणि दुर्दम्य आशावादाने एक तरुण उभा राहिला. त्याचं नाव 'चैत्राम पवार'. त्याला गावातल्या आदिवासी मावळयांनी साथ दिली. अनेकांच्या मार्गदर्शनाने व श्रमदानाने सुरु झाली बारीपाडाच्या विकासाची लोकचळवळ.

बारीपाडयाच्या विकासासाठी गावकऱ्यांच्या सल्लामसलतीने स्वतःसाठी काही कडक नियम घालून घेतले. त्यात चराईबंदी, कुराडबंदी, दारुबंदी होती व याचे कोणीही उल्लंघन केले तर त्यांच्याकडून मोठया प्रमाणात दंड वसूल केला जातो. गावाच्या शेजारी ४४५ हेक्टर वन जमिनीवर लोकसहभागातून जंगल वनसंवर्धन होत आहे. गावाने श्रमदानातून हजारो झाडे २० वर्षांपूर्वी लावली आणि त्यांचे जीवापाड संरक्षण केले. जैविक विविधता निर्माण करण्यात यश मिळाले. त्यासाठी गावाने इतर गावांसाठी काही कठोर नियम तयार केले.बारीपाड्यातील तरुण आळी–पाळीने दिवस–रात्र जंगलाचा पहारा देतात. यांना वर्षभरासाठी गावातून मोबदला म्हणून धान्य दिलं जातं. त्यामुळे अनेक प्राण्यांना, पक्षांना हक्काचे जंगल मिळून दुर्मिळ वनौषधी तसेच वनस्पती यांचे संवर्धन झाले.

पाण्याचे दुर्मिक्ष असलेल्या या परिसरात गावकऱ्यांच्या श्रमदानातून ४७० पेक्षा जास्त दगडी बंधारे, सलग समतल चर तसेच जंगलातील घनदाट झाडांमुळे पाण्याची पातळी वाढली . त्यामुळे या गावांसह परिसरातील आठ गावांना पाणी पुरवठा होत आहे. एकेकाळी बारीपाडयासाठी मांजरी गावांतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असे परंतु आता बारीपाडयातून ८ गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे. पाण्याच्या मुबलक पुरवठयामुळे बागायती पिकांचे प्रमाण वाढले. पण गावाने उसासारख्या पिकांवर निर्बंध घातले आहेत. त्याचे क्षेत्र मर्यादित राहील याची काळजी घेतली आहे. चारसूत्री भातशेती, नागली यांचे विक्रमी उत्पादन होऊ लागले. तसेच ऊस, कांदा, बटाटा यासारख्या नगदी पिकांचेही उत्पादन होऊ लागले आहे.गेल्या वर्षापासून स्ट्रॉबेरी लागवडीचा प्रयोग यशस्वीपणे सुरु झाला आहे असे अनेकवीध शेतीतील प्रयोग यशस्वीपणे राबवून बारीपाडा परिसरातील शेतक–यांसाठी मार्गदर्शकाची भूमिका वठवत आहे. पशुधनातही मोठया संख्येने वाढ होऊन शेळी पालन, कुकुटपालन ,म्हैसपालन, मत्स्यव्यवसाय यासारख्या शेतीपुरक व्यवसायाची जोड मिळाली आहे. कृषि आधारित छोटे व्यवसाय – गुळ तयार करणे, नागली पापड, दोर, पत्रावळी, दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती होऊ लागली त्याच बरोबर सुवासिक उंची बासमती, इंद्रायणी तांदुळ गावातच पॅक करुन

मोठया शहरात विक्रीसाठी पाठवले जाऊ लागले.

गावाच्या विकासाचा मुख्य स्त्रोत म्हणजे शैक्षणिक विकास होय. प्रौंढासाठी रात्रशाळा सुरु करुन अक्षर ओळख, अंक ओळख्र केली जाऊ लागली. गावात जवळ जवळ बंद झालेली चौथी पर्यतची शाळा सुरु करण्यात आली शिक्षण न देणाऱ्यास व शिक्षण न घेणाऱ्यास दंड लावण्यात आला शिक्षणात शिस्त आली यामुळे पाडयावरील आदिवासी प्राध्यापक, डॉक्टर, अधिकारी वर्गापर्यत पोहोचले आहेत. विकासाचे दुसरे साधन म्हणजे महिला बचतगट होय . ज्यावेळी महिला बचत गट ही संकल्पना माहित नव्हती त्यावेळी बारीपाडयात दोन महिला बचत गट सुरु झाले. आज ते गट १८ वर्षापेक्षा जास्त काळापासून नियमित सुरु आहेत. त्यासोबत पुरुष बचत गटही सुरु आहेत.

गावात महिला सशक्तीकरण, व्यसनमुक्ती, सकस आहार, स्वच्छता, जलसाक्षरता, शौचालयाचा वापर, आरोग्यासबंधी जागृतीचे उपक्रम राबविले जाऊ लागले. पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण, मुलांचे लसीकरणाचा सातत्याने आग्रह असतो. पुरुषामधील कुटूंबकल्याणाचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त आहे. गावात नाविन्यपूर्ण वनभाजी स्पर्धा, सामुदायिक विवाह यासारखे कार्यक्रम राबवून मुळात अबोल, लाजऱ्या असलेल्या आदिवासी महिलांना बोलते केले. त्या पाककलेत निपुण झाल्यात व पाककला स्पर्धेत सहभागी होवू लागल्या. बारीपाडयाचे नाव सातासमुद्रापलीकडे गेल्यामुळे आज विदेशातूनही लोक भाजी स्पर्धा पाहण्यासाठी बारीपाडा येथे येतात. काही विदेशी विद्यार्थी व विद्यार्थीनी पीएचडीच्या अभ्यासासाठी बारीपाडा येथे येतात असे अभिमानाने चैत्राम पवार सांगतात.

शासकीय मदतीवर अवलंबून न राहता, लोक–सहभागातून आणि आपल्या परिसरातील नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करून शाश्वत विकास कसा करता येवू शकतो याचे बारीपाडा हे मूर्तिमंत उदाहरण आहे. या गावापासून प्रेरणा घेवून आजूबाजूच्या ८–१० गावांनी त्यांचे जंगल राखायचा निर्धार केला आहे.

*

## यशोगाथा ३: नेसू नदी पूजन, खांडबारा, नंदुरबार – श्री. संजय झेंडे

नंदुरबार–नवापूर रेल्वे मार्गावर खांडबारा स्टेशन आहे. इथे स्थानिक परिसरातील बाजारपेठ सुद्धा आहे. या भागातील आदिवासी बांधव दरवर्षी दसऱ्यानंतर एकत्र येतात आणि आपल्या परिसरातील नेसू नदीचे पूजन करून उत्सव साजरा करतात. गेल्या १० – १२ वर्षापासून या भागात डॉ. हेडगेवार सेवा समिती काम करत आहे. अगदी सुरुवातीला लोक–सहभागातून नेसू नदीच्या पात्रात ठराविक अंतरावर वाळूच्या पोत्यांचे बंधारे बांधण्यात आले. यासाठी परिसरातील शेतकरी गट, बचत गट, विद्यार्थी आणि युवाशक्ती यांची मदत घेण्यात आली. नदीच्या पात्रात १२ ठिकाणी आणि नाल्यावर

५ ठिकाणी बंधारे बांधण्यात आले. त्यामूळे पावसाळ्यानंतरही नदीत पाणी राहिले. सुरुवातीची २–३ वर्षे पाणी असूनही कोणी रब्बी हंगाम घेतला नाही. अशा वेळी एका जबाबदार आणि प्रामाणिक स्वयंसेवी संस्थेच्या भूमिकेतून डॉ. हेडगेवार सेवा समिती आणि त्यांच्या कृषि विज्ञान केंद्रातील पदाधिकाऱ्यांनी गावोगावी जाऊन लोकांशी संवाद साधला. लागवडीसाठी पाण्याचा उपयोग करण्याचे आवाहन केले. परिसरातील विहिरींचे शास्त्रीय दृष्ट्या सर्वेक्षण करण्यात आले. काही विहिरींची खोली ४ ते ६ मीटरने वाढवण्यात आली. गरजू शेतकऱ्यांची निवड करून त्यांना प्रकल्पा अंतर्गत डीझेल आणि इलेक्ट्रिक पंप उपलब्ध करून देण्यात आले. या विहिरीतून उपलब्ध होणाऱ्या पाण्यावर ८ ते १० एकर क्षेत्र ओलिताखाली येवू शकते असे लक्षात आले. पण बहुतेक शेतकरी अल्प–भूधारक असल्यामुळे एका विहिरीतील पाणी आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी वाटून घ्यावे असे ठरले. जलस्त्रोत वापर गटाची संकल्पना प्रत्यक्षात आली. गटात असलेल्या ५ शेतकऱ्यांना खरीप हंगामात भात, सोयाबीन, तूर पिकांना संरक्षित पाणी आणि रब्बी हंगामात हरबरा, भाजीपाला, गहू पिकांना उपलब्धतेनुसार किमान अर्धा व कमाल एक एकरासाठी पाणी द्यावे असे ठरले. दुरुस्ती व व्यवस्थापन खर्चासाठी उत्पन्नातील १० टक्के रक्कम गटाच्या बँक खात्यात जमा करावी. आपल्या विहिरीतील पाणी परिसरातील शेतकऱ्यांना देवून संसाधनांचा वापर सामूहिकरीत्या कसा केला जाऊ शकतो याचा एक उत्तम परिपाठ इथे पाहायला मिळतो.

सहसा एखाद्या भागात पाणी उपलब्ध झाले कि लोक उसासारख्या पिकांकडे वळतात आणि उपलब्ध पाण्याचे नीट नियोजन केले नाही तर पुन्हा टंचाई जाणवते. हा धोका ओळखून संस्थेने गावागावात जलदूत संकल्पना राबवली. प्रत्येक गावातील जलदूत आपल्या गावात पडणाऱ्या पावसाच्या नोंदी घरातील पर्जन्य मापक वापरून घेवू लागला. फक्त नोंदी न ठेवता, नदी पूजन उत्सवात या नोंदींच्या आधारे उपलब्ध पाण्याचा ताळेबंद मांडला जातो. येणाऱ्या रबी हंगामात कोणती पिके घ्यायला हवीत याचे नियोजन केले जाते. या भागातील आदिवासींनी एकी दाखवली आणि संस्थेने तांत्रिक मार्गदर्शन केले. या दोन्हीच्या बळावर इथे नेसू नदीच्या कृपेने जल–क्रांती झाली. या नेसू नदीला अभिवादन करण्यासाठी हा नदी पूजन उत्सव सुरु करण्यात आला.

संपूर्ण उत्सव हा स्थानिक आदिवासी लोक संचलित करतात आणि तो त्यांच्या स्थानिक भिलोरी भाषेत होतो. पारंपारिक आदिवासी पोशाख परिधान केलेल्या महिला नदीतील जल एका सजवलेल्या कलशात भरून घेतात आणि त्याची शोभायात्रा काढण्यात येते. ठिकठिकाणी शोभायात्रा थांबवून जलकलश पूजन केले जाते. घरांसमोर रांगोळ्या काढल्या जातात, काही ठिकाणी गुढ्या सुद्धा उभारल्या जातात. पारंपारिक भाषेतील गाणी म्हणत संपूर्ण गावात फेरफटका मारल्यानंतर शोभायात्रा नदीकिनारी उभारलेल्या मंडपात येते. नदी पूजनाच्या सोहळ्यात परिसरातील गावातील लोकांनी

तन–मन–धनाने सहभागी होण्याचे हे दृश्य भारावून टाकणारे असते. परिसरातील ६ गावांचा सहभाग या उत्सवात असतो. दरवर्षी वेगवेगळे गाव हा उत्सव आपल्या गावात घेते आणि इतर गावातील लोक तिथे सहभागी होतात. पाण्याच्या उपलब्धतेतून स्वतःच्या समृद्धी बरोबरच समूहाच्या सौख्याची कास धरणारा, विविध समित्यांच्या माध्यमातून एकत्र येवून पाण्याचे व्यवस्थापन करणारा आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी जीवनदायिनी असलेल्या नदीची स्वच्छता व पर्यावरण शुद्धीसाठी एकत्र येवून प्रतिज्ञा करणारा हा समाज म्हणजे सर्वांसाठी एक आदर्श आहे.

**नेसू नदी पूजन सोहळ्याची काही ठळक वैशिष्ट्ये:**

१) संपूर्ण कार्यक्रम स्थानिक लोक संचलित करतात आणि तो स्थानिक भिलोरी भाषेत होतो.

२) नेसू नदी काठावरील जलदूत आपापल्या कार्यक्षेत्रात झालेल्या पावसाच्या नोंदी जाहीर करतात, गेल्या वर्षी झालेला पाऊस, पावसाचे एकूण दिवस, मध्ये पडलेला खंड इ. माहिती देतात

३) उपलब्ध पाण्याचा ताळेबंद मांडून येणाऱ्या हंगामातील पिकांचे नियोजन केले जाते

४) नेसू नदीवरील जलक्रांतीचे साक्षीदार आपले अनुभव कथन करतात, इतरांनी प्रेरणा घ्यावी यासाठी खास आग्रह

५) पाणी मुबलक झाले पण ऊस, कांदा या पिकांकडे कुणी वळणार नाही यासाठी कटाक्ष

६) सोयाबीन, कापूस, गहू, हरबरा, तांदूळ, भाजीपाला या पिकांवरच लक्ष केंद्रित

७) पाण्याच्या जबाबदार वापरासाठी ठिबक आणि तुषार सिंचनाचा आग्रह

८) कांदा, लसूण यांचे बियाणे उत्पादन घेवून आधुनिक शेतीकडे वाटचाल, अशा शेतकऱ्यांचा गौरव

९) तांदळाच्या वाढत्या उत्पादनाबरोबर मार्केटिंग साठी तांदूळ महोत्सव, राईस मिल सारख्या उपक्रमांना सुरुवात

संदर्भ: नेसू नदी यशोगाथा श्री. संजय झेंडे, धुळे यांच्या लेखातून घेण्यात आली आहे.

*

## यशोगाथा ४: गोष्ट पाण्याच्या कमाईची, घनसांगवी – श्री. दत्ता जोशी

मराठवाडा हा संपूर्ण प्रदेश पर्जन्यछायेचा भाग. इथली काळी माती सदासर्वकाळ तहानलेली. महाराष्ट्राच्या पश्चिम भागात मुसळधार पाउस कोसळताना, त्यापासून १५०–२०० किमी वर असेलेले हे जिल्हे पर्जन्य धारांची प्रतीक्षा करत असतात. ७ जूनला सुरु होणारा मान्सून या भागात क्वचित एखाद्या वर्षी बरसतो. जून, जुलै अखेरपर्यंत पावसाची प्रतीक्षा सुरु असते आणि ऑगस्टच्या मध्यावर पावसाची शक्यता बळावते. या पार्श्वभूमीवर पाहिले तर जालना जिल्हा आणखीनच कोरडा. या पार्श्वभूमीवर घनसांगवी तालुक्यातील काही सक्रीय सामाजिक कार्यकर्त्यांनी जलयुक्त तालुक्याचे स्वप्न

पाहिले आणि झपाटल्याप्रमाणे काम करत तालुक्यातील १२९ पैकी तब्बल ४८ गावात त्यांनी ते साकारही करून दाखवले. पुढच्या २ वर्षात तालुक्यातील प्रत्येक गाव मॉडेल गाव म्हणून उभा राहिला पाहिजे, असा त्यांचा संकल्प आहे. ही कहाणी आहे या तालुक्याची. तालुक्यातील भूमी–पुत्रांची आणि त्यांच्या पाठीमागे उभ्या राहणाऱ्या संस्थांची.

घनसांगवी हा जालना जिल्ह्याच्या दक्षिण सीमेलगतचा तालुका. इथला प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती. एकेकाळी १५–२० फुटांवर असलेली भूजल पातळी आज ४००–५०० फुटांवर गेली होती. पाण्यावाचून शेती ओसाड होत होती, गावातील तरुण पिढी शहराला जवळ करत होती. पण २००७ मध्ये दहीगव्हाण या छोट्याशा खेड्यात एक पणती मिणमिणत होती. तेथील ग्रामस्थ दरवर्षी लोक–सहभागातून गावालगतच्या नदीत वनराई बंधारे बांधत. सिमेंटच्या गोण्या घ्यायच्या, त्या वाळूने भरायच्या आणि नदीचे पाणी अडवायचे. त्या वर्षीची गरज भागायची. पाणी समस्येवर हे काही कायमस्वरूपी उत्तर नव्हते, दुसरी अडचण अशी होती कि पोती फाटून त्याचे प्लास्टिक धागे सर्व पाण्यात पसरून जात. त्याने प्रदूषण होत असे. सन २००९ मध्ये गावातील ११ जणांनी मिळून धुळे जिल्ह्यात शिरपूर तालुक्यात प्रवास केला. सुरेश खानापूरकर यांनी तिथे केलेली जल–संवर्धनाची कामे पाहिली. पण अशा कामांसाठी निधीची आवश्यकता होती. गावातील लोकांना पण प्रेरणा मिळावी म्हणून २०१० मध्ये खानापूरकरांचे गावात व्याख्यान ठेवण्यात आले. लोकांमध्ये उत्साह वाढला. त्यातून काही तरुण पुढे आले. पण अजूनही मार्ग सापडत नव्हता. अखेर २०१२–१३ मध्ये मार्ग सापडला. या परिसरात पळसाची भरपूर झाडे वसंत ऋतूत (फेब्रु–मार्च) फुलतात. गावातील २२ तरुणांनी मिळून ६ दिवस मेहनत घेतली आणि ही पळसफुले गोळा केली. या फुलांची शहरात विक्री करून ७ हजार रु. जमवले.

अशा प्रकारच्या कामात कुणीतरी पुढाकार घेणे गरजेचे असते. इथे संघाचे स्वयंसेवक विलासअण्णा दहिभाते होते. त्यांना गावातील तरुणांची चांगली साथ मिळाली. गावकऱ्यांच्या मदतीला काही सामाजिक संस्था धावल्या आणि कामाला सुरुवात झाली. दरवर्षी एक किमी चे काम करायचे असे गावाने ठरवले होते. २०१७ पर्यंत ५ किमी पर्यंतचे काम गावकऱ्यांनी जिद्दीने पार पाडले.आनंदाची गोष्ट ही कि दहीगव्हाण मध्ये सुरु झालेले काम फक्त त्या गावापुरते मर्यादित राहिले नाही. या विचाराचे पाणी गावोगाव पाझरले. त्यासाठी रचनात्मक प्रयत्न झाले. २०१७ च्या पावसाळ्यात घनसांगवी तालुक्यातील तब्बल ४९ गावांमध्ये मुबलक पाणी साठले. गावोगावी जाऊन ३–४ वेळा बैठका घेतल्या गेल्या. कामाचा विस्तार लोकांच्या लक्षात येवू लागला. बैठकांची सत्रे सुरु होतीच. एकमेकांकडे प्रवास करून, काम पाहून सर्वांच्याच मनात आपल्या कामाविषयी एक विश्वास निर्माण झाला. उत्साह वाढला.गावातील लोकांचा निर्धार पाहून रा. स्व. संघ जनकल्याण समिती,

आर्ट ऑफ लिव्हिंग, सावित्रीबाई फुले एकात्म महिला समाज मंडळ यासारख्या अनेक सामाजिक संस्था मदतीला पुढे आल्या. सुरुवातीला ४ गावांमध्ये यशस्वी प्रयत्न करण्यात आला. अशा प्रकारचे काम ग्रामस्थांच्या पुढाकारातून उभे राहू शकते हे सिद्ध होतानाच, अशा प्रकारची कामे होत असतील तर समाजातील सधन घटक विविध संस्थांच्या माध्यमातून आर्थिक ताकत उभी करू शकतात, आणि त्याला शासकीय निधीची जोड मिळून उत्तम कामे उभे राहू शकतात हे या मॉडेल ने सिद्ध झाले. या सगळ्या प्रयोगातून खालील गोष्टी पुढे आल्या आणि हेच या यशस्वी प्रयोगाचे सार आहे.

### खालील गोष्टी करा

* गावातील शाळेचे मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ज्येष्ठ नागरिक यांच्याकडून गावातील सकारात्मक विचार करणाऱ्या आणि स्वच्छ प्रतिमेच्या माणसांची यादी मिळवणे
* त्यांच्याशी बोलून या विषयाची चर्चा करणे आणि त्यांना कामाचे महत्व समजावून सांगणे. त्यातून होणाऱ्या लाभाची माहिती देणे.
* त्यांच्याकडून गावातील जिज्ञासू पण उपद्रवक्षम लोकांची माहिती मिळवणे आणि त्यांच्याशी एकेकट्याने बोलून, त्यांना विश्वासात घेवून, मोठेपणा देवून कामाची महती त्यांच्या मनावर बिंबवणे
* हे सारे पार पडल्या नंतर ग्रामसभा बोलावणे आणि त्यात या विषयाची संकल्पना मांडणे
* सर्वांच्या सकारात्मक रेट्यातून गावाची संमती मिळवणे आणि त्या गावातील कामाचे उद्घाटन करणे.
* उद्घाटनाच्या वेळी २०–२५ नारळ आणून सर्व प्रमुख व्यक्तींच्या हस्ते नारळ वाढवणे, त्यातून प्रत्येकाला मान देत, त्याच्या मनात कामाविषयी प्रेम निर्माण करणे.

### खालील गोष्टी टाळा

काम सुरु असताना, गावाबाहेरील कोणत्याही राजकीय व्यक्तीला कामावर नेऊ नये. यातून कामाला राजकीय रंग येवू शकतो.

काम सुरु असताना आणि संपल्यावर संपूर्ण आर्थिक व्यवहार पारदर्शी ठेवणे, सर्व खर्च लोकांना पाहता येईल अशा ठिकाणी लावणे

स्थानिक पातळीवर सुद्धा कार्यक्रमांना राजकीय स्वरूप येवू नये याची काळजी घेणे, काम सर्वांचे आहे त्यामुळे सर्वांना त्याचे श्रेय जावे अशी भूमिका मांडावी

प्रसारमाध्यमातून कामाची प्रसिद्धी करायची नाही, एक वेळ कामाविषयी माहिती दिली तरी चालेल पण कोणत्याही व्यक्तीची किंवा गटाची नावे देवू नयेत, याने श्रेयवादाची लढाई सुरु होण्याचा धोका असतो.

# परिशिष्ट १: तांत्रिक सहकार्य - संस्था सूची

आपण ग्रामविकासाचे काम करत असताना आपल्याला बऱ्याच वेळा तांत्रिक मार्गदर्शनाची गरज असते. म्हणून त्या त्या क्षेत्रात बऱ्याच वर्षांपासून काम करणाऱ्या काही संस्थांची माहिती आपल्यासाठी संकलित स्वरुपात खाली देत आहोत.

| विषय | संस्था नाव | कोणत्या गोष्टीसाठी मदत घेता येईल? | वेबसाईट आणि इमेल | फोन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| **जल-संधारण** | **सेवावर्धिनी, पुणे** | गावाचा अभ्यास करण्यासाठी PRA करून घेणे, पाण्यासाठी कुठे कुठे आणि कोणत्या प्रकारचे उपचार / कामे करायला लागतील यासाठी DPR तयार करून घेणे, घनकचरा व्यवस्थापन इ. | http://sevavardhini.org/ contactsevavardhini.org | 020-25513296, 9423580535 |
| | **प्रायमूव, पुणे** | शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी DPR करून घेणे, गावातील सांडपाणी व्यवस्थापन संदर्भात तांत्रिक सहाय्य | http://www.primoveindia.com/ infoprimoveindia.com | 020-25280200 |
| | Acwadam, **पुणे** | भूजल-संवर्धन विषयात काम करणारी संस्था, संशोधन, तांत्रिक प्रशिक्षण, गावातील | http://www.acwadam.org / acwadamvsnl.net | 9172246959 |

| विषय | संस्था नाव | कोणत्या गोष्टीसाठी मदत घेता येईल? | वेबसाईट आणि इमेल | फोन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | लोकांसाठी भूजल व्यवस्थापन विषयात छोट्या कार्यशाळा | | |
| **शेती** | **कृषी विज्ञान केंद्र** | प्रत्येक जिल्ह्यात किमान १ केंद्र असते, त्याचा संपर्क इंटरनेटवरून किंवा कृषी–सहायक / ग्रामसेवक यांच्याकडून मिळवा, ICAR च्या वेबसाईट वर देखील अधिक माहिती मिळू शकते | https://icar.org.in/content/krishi-vigyan-kendras-maharashtra | |
| **ऊर्जा** | **आरती, पुणे** | ग्रामीण भागासाठी उपयुक्त असे विविध प्रकारचे तंत्रज्ञान यांनी विकसित केले आहे – कमी खर्चातील पाण्याची टाकी, काडी–कचऱ्यापासून इंधन, सुधारीत चुली, सोलर ड्रायर, छोटे बायोगॅस प्रकल्प, आधुनिक तंत्रज्ञान आधारित नर्सरी, ग्रीनहाउस इ | http://www.arti-india. org/ artišpunevsnl.net | 020-24390348, 020-24392284 |
| | **ग्राम–ऊर्जा, पुणे** | सामूहिक स्तरावरील बायोगॅस प्रकल्प, पाणी आणि विजेसाठी सौर उर्जा आधारित प्रकल्प, | http://gramoorja.in/ | |

| विषय | संस्था नाव | कोणत्या गोष्टीसाठी मदत घेता येईल? | वेबसाईट आणि इमेल | फोन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | **गंगोत्री, पुणे** | शेतातील काडी-कचरा आधारित इंधन निर्मिती आणि त्यासाठी सुधारीत स्टोव्ह | http://www.gangotreegroup.in/ | 8071802994 |
| ग्राम-उद्योग | **गो-विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार, नागपूर** | देशी गोवंश संबंधित प्रत्यक्ष गो-शाळेत प्रशिक्षण शिबिरे, पंच-गव्य आधारित उत्पादने मंजन, साबण, धूप, तूप, आयुर्वेदिक औषधे इ. तयार करण्याचे प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या जातात | | |
| | **शेती परिवार कल्याण संस्था, आटपाडी** | बंदिस्त शेळीपालन प्रशिक्षण केंद्र, प्रसिद्ध कृषी डायरी (हिशोब लिहिण्यासाठी) | http://shetipariwar.org/ sheti.pariwargmail.com shetipariwarrediffmail.com | 0234-3221314 9423037094 |
| | **एम-गीरी, वर्धा** | विविध प्रकारची ५० हून अधिक प्रशिक्षणे इथे घेतली जातात, खादी, बांबू, पंच-गव्य, साबण, सोलर इ. अनेक विषयातील २ आठवड्यापासून १ महिन्यापर्यंत प्रशिक्षण कालावधी | www.mgiri.org director.mgirigmail.com | 07152-253512, 253513 |

| विषय | संस्था नाव | कोणत्या गोष्टीसाठी मदत घेता येईल? | वेबसाईट आणि इमेल | फोन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | **विज्ञान आश्रम, पाबळ** | गावातील युवकांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षणे, शाळेतील मुलांसाठी ३ वर्षाचा कौशल्य विकसन कार्यक्रम (शाळेला जोडता येतो). | http://vigyanashram.com/<br>vapabalgmail.com | 020-25360203 |
| | **सेंटर ऑफ सायन्स फॉर विलेजेस, वर्धा** | कमी खर्चातील आणि टिकाऊ घरे – तंत्रज्ञान, वेगवेगळ्या पद्धतीची शौचालये, बायोगॅस आणि त्यापासून वीज निर्मिती, मध काढणे, पेपर तयार करणे, सेंद्रिय शेती, अंबाडी सरबत तयार करणे, डिंक तयार करणे, नैसर्गिक रंग इ. विषयातील प्रकल्प राबवणे आणि प्रशिक्षण देणे | http://www.csvtech.in/<br>soham.cedgmail.comcs<br>vwardhagmail.com | 07152-249542/250570<br>09890434003 |
| | **पडगीलवार, पुणे व नागपूर** | शेतीसाठी औजारे, स्प्रे-पंप, मिनी राईस मिल, मिनी मका सोलणी यंत्र इ. | http://www.padgilwar.com/<br>padgilwarsagaryahoo.co.in | 9823236689<br>9823085339 |
| **आरोग्य** | **आरोग्य-भारती, पुणे** | गावातील वृद्ध, महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे घेणे | | |
| | **सावित्रीबाई फुले** | ग्रामीण भागासाठी विविध आरोग्य प्रकल्प, आरोग्य तपासणी शिबिरे, सेवा | http://www.hedgewar.org/savitribai-phule.htm | (240)2339866, 2331195<br>(240)2341849 |

| विषय | संस्था नाव | कोणत्या गोष्टीसाठी मदत घेता येईल? | वेबसाईट आणि इमेल | फोन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | **महिला एकात्म समाज मंडळ, औरंगाबाद** | वस्त्यांमध्ये अनेक प्रकल्प, गर्भवती महिला आणि मुलांसाठी काम, हेडगेवार रुग्णालय द्वारा संचलित | | |
| **शिक्षण** | **ज्ञान–प्रबोधिनी, पुणे** | गेली पन्नास हून अधिक वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत, अनेक प्रयोगशील आणि संशोधन उपक्रम चालवणारी नामांकित संस्था, आपल्या गावातील शाळेसाठी उपयुक्त ठरतील असे अनेक उपक्रम त्यांच्या–कडून शिकता येतील | www.jnanaprabodhini.org contactjnanaprabodhini.org | 020-24207000, 24477691 |
| | **माता–बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला** | या संस्थेमार्फत चालणारी शाळा बघण्यासारखी आहे, विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे उपक्रम वर्षभर चालवले जातात | http://www.matabalak.org/ matabalak.utkarshapratishthangmail.com | 02187-220741, 02187-221073 |
| | CEE, **पुणे** | विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयात रुची निर्माण होण्यासाठी आणि त्यांनी आपल्या परिसरात पर्यावरण संवर्धन करण्यासाठी अनेक उपक्रम राबवते | http://www.ceeindia.org/maharashtra.html satish.awateceeindia.org | |

# परिशिष्ट २: ग्रामविकास विभाग - संपर्क सूची

| प्रांत | नाव | जबाबदारी | फोन क्रमांक |
|---|---|---|---|
| कोकण | दीपक दत्तात्रेय पाटील<br>संदीप राजाराम म्हात्रे | प्रांत ग्रामविकास प्रमुख<br>प्रांत ग्रामविकास सह–प्रमुख | ९८९०४७३५८५<br>८६५२३८५३६६ |
| पश्चिम महाराष्ट्र | प्रसाद देशपांडे | प्रांत ग्रामविकास प्रमुख | ९४२३०३७०९४<br>९४०४४१९९१४ |
| | रमेश गणपत कोबल | प्रांत ग्रामविकास सह–प्रमुख | ९०११२९०९०४<br>७५८८९४६४६३ |
| देवगिरी | विनय देविदास कानडे | प्रांत ग्रामविकास प्रमुख | ८३२९९७३१८८<br>७५८८०७६१६१ |
| | दीपक अरुणराव तांबोळी | प्रांत ग्रामविकास सह–प्रमुख | ९८६०००००३८ |
| विदर्भ | दत्ता जगदीशराव बहादुरे | प्रांत ग्रामविकास प्रमुख | ९४२२६०७८५२<br>८८०५६६२००१ |
| | मिलिंद मधुसूदन जोशी | प्रांतमंडळ सदस्य | ९४०३९१२२३४<br>९८८१८८०८४४ |

# परिशिष्ट ३: ग्राम-अध्ययन फॉर्म

आपल्या गावाची प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी आणि काही समस्यांचे आकलन होण्यासाठी खाली एक फॉर्म दिलेला आहे. हा फॉर्म भरण्यासाठी काही माहिती कदाचित तुम्हाला शाळेत किंवा ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन गोळा करावी लागेल. फॉर्म पूर्ण भरण्यासाठी २–३ वेळा बसावे लागले तरी चालेल पण हा फॉर्म ग्रामसमिती सदस्यांनी मिळून भरावा. तो भरताना नकळत गावाच्या सद्य–स्थितीबद्दल काही मुद्दे तुमच्या लक्षात येतील. तुम्ही सर्वांनी येवून आपल्या गावाचा अशा प्रकारे अभ्यास करावा हाच याचा उद्देश आहे. आपल्या परिसराची, म्हणजे आजूबाजूच्या १०–१२ गावांची माहिती घ्यायला सुद्धा काही हरकत नाही. त्यामुळे आपल्या परिसराबद्दल आपले ज्ञान आणखी समृद्ध होईल आणि परिसरातील प्रश्न समजण्यासाठी मदतच होईल.

## ग्रामसमिती द्वारा माहिती संकलन आणि अभ्यास

**भाग १: सर्व साधारण माहिती**

| | | | |
|---|---|---|---|
| **जिल्हा** | | **तालुका** | |
| **गावाचे नाव** | | **ग्राम–पंचायत** | |
| **गावात कोण–कोणत्या जाती–धर्माचे लोक आहेत?** | | | |

**१. गावची लोकसंख्या:**

| एकूण लोकसंख्या | स्त्री | पुरुष |
|---|---|---|
| | | |

खालील माहिती अंगणवाडी आणि ग्राम-पंचायत मध्ये मिळू शकते:

| वयोगट | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| ० ते ६ | | |
| ७ ते १८ | | |
| १९ ते २५ | | |
| २६ ते ५० | | |
| ५० ते ६५ | | |
| ६६ आणि पुढे | | |

| अपंग व्यक्ती | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| | | |

२. साधारण २५-३० वर्षापूर्वी गावाची लोकसंख्या काय होती?

३. गावाच्या लोकसंख्येत जो बदल झालाय त्याचा गावातल्या जमीन / पाणी यावर काय परिणाम झालाय असे वाटते?

४. गावात कुठल्या प्रकारची घरे आहेत?

| प्रकार | साधारण संख्या |
|---|---|
| सिमेंट / कॉँक्रीट | |
| विटा-माती | |
| झोपड्या | |
| घरकुल योजनेत झालेली घरे | |

५. गावाला मुख्य रस्त्याशी जोडणारा रस्ता कसा आहे? (पुढे ✓ करा)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सिमेंट | | पक्का-डांबर | | कच्चा | |

६. गावात कितवी पर्यंत शाळा आहे? (पुढे पटसंख्या लिहा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ ली ते ४ थी | | ५ वी ते ७ वी | | ८ वी ते १० वी | | कॉलेज |
| अंगणवाडी किती आहेत? | | | | | | |

७. गावातल्या लोकांचे शैक्षणिक वर्गीकरण (ज्यांनी शिक्षण सोडले आहे किंवा त्यांचे शिक्षण झाले आहे): (पुढे संख्या लिहा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| निरक्षर | | ५ वी पर्यंत | | १० वी पर्यंत | | १२ वी पर्यंत |
| पदवीधर | | | | | | |

८. गावात आरोग्याची काय सुविधा आहे? (एकापेक्षा जास्ती ✓ करू शकता)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्र | | सरकारी प्राथमिक आरोग्य उप-केंद्र | | प्रायव्हेट डॉक्टर | | वैदू (पारंपारिक) |
| आशा वर्कर | | | | | | |

९. गावात सरासरी किती तास वीज असते? (प्रत्येक दिवसाचे तास खाली लिहा)

| | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घर | | | | | | | |
| शेती | | | | | | | |

१०. गावात गेल्या ५ वर्षात झालेला साधारण वार्षिक पाऊस: (मिली. मध्ये) (गावात व्यवस्था नसेल तर जवळच्या पर्जन्य मापन केंद्राकडून माहिती मिळवा)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३ | | २०१४ | | २०१५ | | २०१६ | | २०१७ | |

११. साधारण ५ वर्षात कोणकोणत्या निवडणुका होतात ? त्यासाठी लोकांचा साधारण किती वेळ जातो ?

| अनु. | निवडणूक नाव | जाणारा वेळ (दिवस) |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |

१२. गावात अंदाजे किती लोकांकडे मोबाईल आहे?

१३. गावात महिलांचे किती बचत गट आहेत?

१४. गावात पुरुषांचे किती बचत गट आहेत?

१५. गावात काही युवक मंडळे / खेळासाठी / कार्यक्रमासाठी गट आहेत का? असल्यास संख्या लिहा.

१६. गावातील एकूण बचत गट संख्या:

१७. खाली प्रमुख बचत गटांची नावे आणि सदस्य संख्या लिहा:

| महिला बचत गट नाव | सदस्य संख्या | पुरुष बचत गट नाव | सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

१८. खाली युवक मंडळे किंवा काही गट असतील तर त्यांची नावे आणि सदस्य संख्या लिहा.

| युवक मंडळ / गट नाव | सदस्य संख्या | युवक मंडळ / गट नाव | सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

१९. मोबाईल इंटरनेट आहे का? असल्यास लोक मोबाईल वर त्याचा वापर कशा साठी करतात?

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

२०. गावात व्यसनाधीनतेचं प्रमाण आणि त्याबद्दल माहिती.

| व्यसनाचा प्रकार | किती दुकाने आहेत | अंदाजे किती लोकांना आहे? | एक व्यक्ती दिवसाला सरासरी किती रुपये खर्च करतो? |
|---|---|---|---|
| दारू, ताडी | | | |
| तंबाखू, गुठखा, मावा | | | |
| जुगार / मटका | | | |
| इतर काही | | | |

२१. गावातले लोक वर्षभरात कधी आणि कशा करता एकत्र येतात? खालील तक्ता भरा. (प्रकार: उत्सव, ग्रामसभा, यात्रा, पंचायत इत्यादी)

| महिना | प्रकार | एकत्र येणाऱ्या लोकांची साधारण संख्या | एकत्र येवून काय करतात? |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

२२. गावात कोणकोणते सामाजिक उपक्रम झाले आहेत आणि कोणते नियमित दर वर्षी होतात? (उदा. रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, गुरांसाठी आरोग्य शिबीर, सामुदायिक स्वच्छता, सेंद्रिय शेती शिबीर)

| कुठल्या वर्षी? | प्रकार | संक्षिप्त माहिती<br>(किती जणांनी भाग घेतला, कुणी घेतलं, संस्था सहभाग) |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## भाग २: शेती अभ्यास आणि माहिती संकलन:

१. गावातल्या लोकांचे व्यवसाय खाली दिले आहेत त्यात तो करणाऱ्या कुटुंबांची संख्या लिहा.

| व्यवसाय | कुटंब संख्या |
|---|---|
| शेती | |
| पशु–पालन (पोल्ट्री / शेळी) | |
| दुग्ध–व्यवसाय (गायी / म्हशी) | |
| मजुरी | |
| नोकरी | |

२. गावातल्या शेतकऱ्यांचे वर्गीकरण: (ग्रामपंचायत मधून घ्या / लोकांना विचारा)

| शेतीचे क्षेत्र | कुटंब संख्या |
|---|---|
| खूप मोठे शेतकरी (१० एकर पेक्षा जास्त) | |
| मोठे शेतकरी (५ ते १० एकर) | |
| मध्यम शेतकरी (३ ते ५ एकर) | |
| छोटे शेतकरी (0 ते ३ एकर) | |
| भूमिहीन | |

३. गावात कोण कोणती पिके घेतली जातात? (समोर  करा) (खाली जी यादी दिली आहे त्यात एखादं पिक नसेल तर मोकळ्या जागेत लिहा, हंगाम  खरीप / रब्बी / उन्हाळी किंवा महिने लिहा उदा. जून ते ऑक्टो.)

| पिकाचे नाव | हो/नाही | हंगाम | पिकाचे नाव | हो/नाही | हंगाम | पिकाचे नाव | हो/नाही | हंगाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऊस | | | सोयाबीन | | | तांदूळ | | |
| द्राक्षे | | | तूर | | | गहू | | |
| केळी | | | मूग | | | ज्वारी | | |
| भुईमुग | | | हरबरा | | | बाजरी | | |
| कापूस | | | भाजीपाला | | | फळझाडे | | |

४. गावात सगळ्यात जास्ती होणारी ३ पिके खाली लिहा

| | |
|---|---|
| सगळ्यात जास्त घेतलं जातं असं पिक, जे बहुतेक सर्व शेतकरी प्रमुख पीक म्हणून दर वर्षी घेतात – १ नंबर | |
| वरच्या पेक्षा कमी घेतलं जाणारे पीक – २ नंबर | |
| त्यापेक्षा कमी घेतले जाणारे पीक – ३ नंबर | |

५. वर दिलेल्या कुठल्या पिकांना स्थानिक वाण / बियाणं वापरलं जातं? असल्यास त्याचं स्थानिक नाव लिहा.

| |
|---|
| |

६. गेल्या २५–३० वर्षात गावातील पीक पद्धतीत काय बदल झाला आहे (आधी कोणती प्रमुख पीके होती, प्रामुख्याने लोक कसली शेती करत होते?)

| |
|---|
| |

७. शेती मध्ये कामांचे विभाजन – पुरुष कुठली कामे करतात आणि महिला कुठली?

| पुरुष | महिला | मुलं |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

८. शेतीतून आलेल्या उत्पादनाची विक्री कशी केली जाते? (पिकाचे नाव लिहून योग्य पर्याया पुढे ✓ करा)

| पिकाचे नाव | जसं येतं तसं | साफ करून | प्रतवारी करून | प्रक्रिया करून |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. गावात जर कुठल्या शेतमालावर प्रक्रिया केली जात असेल तर खालील तक्ता भरा: (यंत्रांचे फोटो फॉर्म बरोबर जोडा)

| पिकाचे नाव | कुठली प्रक्रिया केली जाते? | यंत्राची माहिती |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

१०. गावात किती शेतकरी किती हंगाम घेतात याबद्दल खाली माहिती द्या.

| हंगाम प्रकार | कुटुंब संख्या |
|---|---|
| ३ हंगाम किंवा वर्षभर शेती | |
| २ हंगाम किंवा साधारण ८ महिने शेती | |
| १ हंगाम किंवा फक्त खरीप शेती | |

११. गावात शेतीसाठी कोणकोणती अवजारे वापरली जातात?

| अवजार नाव | कशा करता वापर केला जातो |
|---|---|
| | |
| | |
| | |

१२. गावात ट्रॅक्टर साधारण किती वर्षापूर्वी आला?

१३. आणि आत्ता साधारण किती लोकांकडे ट्रॅक्टर आहे?

१४. गावातील काही विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींची माहिती खालील तक्त्यामध्ये भरा.

| विशेष कार्य | शेतकरयाचे नाव | फोन नंबर |
|---|---|---|
| नैसर्गिक आणि सेंद्रिय शेती करणारा शेतकरी | | |
| स्थानिक बियाणं वापरणारा शेतकरी | | |
| पोली–हाउस / नर्सरी | | |
| इतर काही | | |

## भाग ३: पशुपालन अभ्यास आणि माहिती संकलन:

१. गावातलं साधारण पशुधन आणि त्यांच्या जाती:

| पशु नाव | देशी जाती कोणकोणत्या आहेत? (उदा. गीर, उस्मानाबादी, खिलार) | देशी पशु संख्या | संकरीत जाती कोणकोणत्या आहेत? (उदा. जर्सी) | संकरीत पशु संख्या |
|---|---|---|---|---|
| गाय | | | | |
| म्हशी | | | | |
| बैल | | | | |
| शेळी | | | | |
| कोंबड्या | | | | |
| गाढवं | | | | |
| इतर | | | | |

२. पशु आधारित उत्पादन विक्रीसाठी व्यवस्था काय आहे? (उदा. दुध, खवा, शेळ्या, कोंबड्या इ.)

| पशु (गाय, म्हैस, कोंबड्या) | उत्पादन (दूध, अंडी, खवा, मटण) | गावात विक्री? (हो / नाही ) | किती दूर जावं लागतं? (किमी) | कोण खरेदी करतं? (संस्था, सहकारी संस्था, ग्राहक, कंपनी) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

३. पशु उपचारांसाठी काय व्यवस्था आहे? (योग्य पर्याया पुढे ✓ करा)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सरकारी डॉक्टर | | प्रायव्हेट डॉक्टर | | वैदू | |

४. गेल्या १० वर्षात पशूंच्या संख्येत काय बदल झाला आहे? (योग्य पर्याया पुढे ✓ करा)

| जनावराचे नाव | वाढली आहे | कमी झाली आहे | तशीच आहे |
|---|---|---|---|
| गाय– देशी | | | |
| गाय– संकरित | | | |
| म्हशी | | | |
| बैल | | | |
| शेळी | | | |
| कोंबड्या | | | |
| गाढवं | | | |
| इतर – | | | |

५. गावात गेल्या काही वर्षात पशूंना लागण झालेले नवीन आजार ज्यामुळे खूप पशु मरण पावले असतील तर खाली त्याची माहिती द्या.

| पशु | आजाराचे नाव | वर्ष आणि महिना | मेलेल्या पशूंची संख्या |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

६. गावात संकरित गाय कुठल्या वर्षी आली ? 

७. गावात रेतन करण्याची काय व्यवस्था आहे?

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नैसर्गिक रेतन | गावात आहे? | | गावाबाहेर आहे? | | किती लांब? (किमी) | |
| २ | कृत्रिम रेतन | गावात आहे? | | गावाबाहेर आहे? | | किती लांब? (किमी) | |

८. पशुंच्या चाऱ्यासाठी काय व्यवस्था आहे?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शेतीतल्या पिकांचा वापर | | चारा लागवड करतात | | बाहेरून विकत आणतात | |

९. गावाला गायरान असल्यास किती आहे आणि त्याचा आत्ता वापर कसा केला जातो? आत्ता काय स्थितीत आहे?

________________________________________

________________________________________

१०. गावात पंचगव्य आधारित उत्पादन कोणी करते का? असल्यास खालील माहिती भरा.

| नाव आणि पत्ता | फोन नंबर |
|---|---|
| | |

## भाग ४: पाणी अभ्यास आणि माहिती संकलन:

१. पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्त्रोत: 

२. शेतीसाठी सध्या असलेली पाण्याची व्यवस्था:
(खालील तक्त्यात संख्या लिहा, उदा. ३ विहिरी असल्यास विहिरी समोर ३ असे लिहा)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नदी | | तलाव | | विहिरी | | बोअरवेल | | सरकारी बांध | |
| पाट / सिंचन योजना | | | | इतर काही | | | | | |

३. गावात २५-३० वर्षापूर्वी पाण्याची काय सोय होती, खालील तक्त्यात संख्या लिहा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नदी | | तलाव | | विहिरी | | बोअरवेल | | सरकारी बांध | |
| पाट / सिंचन योजना | | | | इतर काही | | | | | |

४. मागील ५ वर्षात कुठल्या जल स्त्रोताचा वापर वाढला आहे? (ज्याचा सगळ्यात जास्त वाढला आहे त्याला १ क्रमांक द्या आणि उतरत्या क्रमाने बाकी स्त्रोतांना क्रमांक द्या, तो स्त्रोत उपलब्ध नसल्यास क्रमांक देवू नका)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नदी | | तलाव | | विहिरी | | बोअरवेल | | सरकारी बांध | |
| पाट / सिंचन योजना | | | | | | | | | |

५. मागील १० वर्षात भूजल पातळी खाली गेली आहे का?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हो खाली गेली आहे | | नाही | | काही फरक पडला नाही | |

६. खाली गेली असल्यास किती फुटांवर गेली आहे? (किती फुटांवर पाणी लागते)

| | | | |
|---|---|---|---|
| २५-३० वर्षांपूर्वीची पातळी (फुट) | | आत्ताची भूजल पातळी (फुट) | |

७. वर्षभरात पाण्याची साधारण उपलब्धता काय असते? (त्या महिन्यात उपलब्ध असल्यास पुढे ✓ करा)

| | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टे. | ऑक्टो. | नोव्हे. | डिसें. | जाने. | फेब्रु. | मार्च | एप्रिल | मे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पिण्याचे पाणी | | | | | | | | | | | | |
| शेतीसाठी पाणी | | | | | | | | | | | | |
| बाहेरून आणावे लागते | | | | | | | | | | | | |

८. जल–संधारणा साठी आत्ता पर्यंत गावात काय काय प्रयत्न झाले ते संक्षिप्त स्वरुपात लिहा. (उदा. सरकारने २०१४ साली २ बांध घातले पण त्यात पाणी थांबत नाही, ग्रामस्थांनी श्रमदान करून २ माती बंधारे बांधले त्यामुळे डिसेंबर पर्यंत पाणी असते)

| कुठल्या वर्षी? | कामाचं माध्यम (सरकारी, श्रमदान, संस्था, लोक–वर्गणी) | संक्षिप्त माहिती (काम पूर्ण करण्यासाठी किती महिने लागले, काय फायदा झाला) |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

## भाग ५: स्थलांतर अभ्यास आणि माहिती संकलन:

१. गावात काही लोक रोजगारासाठी स्थलांतर करतात का? असल्यास कोणत्या महिन्यात साधारण किती लोक करतात ते खालील तक्त्यात भरा.

| नोव्हेंबर ते मे (६–७ महिने) | जाने/फेब्रु ते मे (३–४ महिने) | वर्षभर (कधीतरीच गावात येतात) |
|---|---|---|
| | | |

२. गावाबाहेर राहणारे भटके कटुंब / वस्ती आहेत का? असल्यास साधारण लोकसंख्या किती आहे? ____

३. स्थलांतर करणारी कुटुंबे किती लांब जातात?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गावा जवळ (५० किमी) | | गावापासून लांब (१०० किमी) | | दुसऱ्या राज्यात | |

४. स्थलांतर करणारे लोक तिथे कोणकोणती कामे करतात?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शेती आधारित | | गवंडी / इमारत बांधकाम मजूर | | वीट – भट्टी | |
| उस–तोड | | इतर काही – | | | |

५. स्थलांतर करणाऱ्या लोकांना तिकडे महिन्याला किती रुपये मिळतात?

६. स्थलांतर करणाऱ्या कुटुंबावर त्यामुळे काय परिणाम होतो? (उदा. मुलांचं शिक्षण, घरातील वृद्धांकडे दुर्लक्ष)

७. बाकी समाजावर या स्थलांतरामुळे काही परिणाम होतो का?

८. आधी शहरात नोकरी करून आता निवृत्त होऊन काही कुटुंब परत गावात आली आहेत का? असल्यास संख्या:

९. गावात काही बेरोजगार तरुण आहेत का? जे काहीच करत नाहीत, असल्यास साधारण संख्या:

१०. गावात बाहेरून काही कुटुंब मजुरीसाठी येवून राहिली आहेत का? असल्यास संख्या लिहा:

११. गावात पाण्याची सोय झाल्यामुळे स्थलांतरित झालेली काही कुटुंबे परत येवून शेती करू लागली आहेत का? असल्यास संख्या लिहा.

## भाग ६: गावाबद्दल इतर माहिती:

१. गावात कोणकोणत्या चांगल्या गोष्टी आहेत असे तुम्हाला वाटते?

२. गावात कोणकोणत्या वाईट गोष्टी आहेत असे तुम्हाला वाटते?

३. गावाचा इतिहास, इतर काही वैशिष्ट्य असल्यास थोडक्यात लिहा. (पुराण कालीन, शिवकालीन, स्वातंत्र्य काळातील काही संदर्भ असल्यास)

४. गावाने एकत्र येवून लोक–सहभागातून काही ग्रामविकास उपक्रम केले असतील तर त्या बद्दल लिहा.

५. गावाचा स्वाभिमान काय आहे? थोडक्यात लिहा.

६. गावासमोर आत्ता सगळ्यात महत्वाचे कोणते ३ प्रश्न आहेत ज्यावर एकत्र येवून काम करायची आवश्यकता आहे असे तुम्हाला वाटते? हे सोडवण्यासाठी लोक-सहभागातून काय करू शकता आणि बाहेरून काय मदत लागेल याबद्दल थोडक्यात लिहा?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

वरील माहिती संकलन करणाऱ्या ग्रामस्थांची यादी:

दिनांक:

तपशील: (किती दिवस लागले / एका बैठकीत भरली का / काही अडचणी आल्या का):

______________________________

______________________________

______________________________

| अनु. | नाव | वय | संपर्क क्रमांक | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

माहिती संकलन झाल्यानंतर याची मूळ प्रत आपल्या ग्रामसमिती फाईल मध्ये नीट लावून ठेवावी. भविष्यात याचा उपयोग होऊ शकतो आणि विविध उपक्रम घेताना देखील संदर्भ म्हणून माहितीचा वापर करता येवू शकतो

✻ ✻ ✻ माहिती संकलन समाप्त ✻ ✻ ✻

# परिशिष्ट ४ः ग्रामविकास गीते

## गीत क्र. १

सेवाभावे व्रत हे अमुचे ग्रामविकासाचे
महन्मंगला मातृभूमीच्या परमवैभवाचे
ग्रामदेवते नमो नमो
भारतमाते नमो नमो ।।धृ।।

पाणी वन ऊर्जा भूमाता
जीव जीवाणू जन गोमाता
जीवन दाता सप्त देवता
ऋण यांचे साताजन्माचे
ग्रामदेवते...।।१।।

गावो गावी जागृत शक्ती
युवा शक्ती अन् धार्मिक शक्ती
मातृ शक्ती अन् सज्जन शक्ती
संघ शक्तीने सज्ज व्हायचे
ग्रामदेवते...।।२।।

ग्राम ग्राम हो सेवा ग्राम
संस्कृतीवाहक मंगलग्राम
प्रेम भक्तीचे गोकुळ धाम
ध्येय हे ग्राम स्वराज्याचे
मातृभूमीच्या चिर विजयाचे
ग्रामदेवते...।।३।।

## गीत क्र. २

ग्राम उन्नती हमारा संघठित प्रयास है ।
ग्राम के विकास से देश का विकास है ।।धृ।।

अपने पैरो पर खडे हो ग्राम ग्राम देश के ।
और ध्वज लिए हो सभ्यता विशेष के ।
ग्रामभूमी धन्य है सविधा संपन्न है ।
खेत हल कुठार से फूटता प्रकाश है ।।१।।

श्रम समय का योगदान देंगे और दिलाएंगे ।
अपने साधनोंसे अपना गाव हम बनाएंगे ।
स्वच्छ ताल घाट है, स्वस्थ वृद्ध बाल हैं।
ग्राम संस्कार का फैलता सुवास है ।।२।।

ऊँच नीच भावना ग्राम में रहे नहीं ।
एक व्यक्ती भी यहाँ अनपढ रहें नहीं ।
एक से विचार है एक मन के तार है।
ग्रामभूमी जन्मभूमी लहलहाती आस है ।।३।।

धन्य है की जन्म हमने ग्राम भूमी में लिया ।
अन्न नीर सभ्यता ज्ञान विश्य को दिया ।
ग्राम कर्म भूमी है, ग्राम धर्म भूमी है।
ग्राम विश्व के अखंड दीप का उजास है ।।४।।

## गीत क्र. ३

गोवर्धनधारी की दुलारी गौ माँ
साधु संतो मुनियों की प्यारी गौ माँ
ममता की मृदू फुलवारी गौ माँ
पर्यावरण की रखवाली गौ माँ
कदम कदम सुखकारी गौ माँ
हाय फिर भी हय दुखीकारी गौ माँ
संकट में आज है हमारी गौ माँ ।।धृ।।

गौमाता का दूध अमृत समान है
गोबर और मूत्र भी गुणों की खान है
रक्त चाप, मधुमेह, ज्वर, अस्थमा,
कैन्सर जैसे रोगों का ये करें खात्मा
गोमूत्र के जैमूसा अँटिबायोटिक नहीं है
घी से जादा कुछ स्वास्थ्यदायक नही है
हृदय रोग में भी गुणकारी गौ माँ
देश अगर बचाना है, बचाओ गौ माँ ।

***

## गीत क्र. ४

शेती आपुली प्राण
शेती जीवन मान
शेती विश्व कल्याण ।।धृ।।

निधळ्या सावरल्या घामाचे
शेती मधल्या कामाचे
घेऊ पुरते दाम
भरूनिया गोदान ।।१।।

अपून काळ्या आईला
पाटा मधल्या पाण्याला
हवा मोकळी सर्वांना
पर्यावरणाची खाण ।।२।।

भूक भागवू जगताची
करून शेती निष्ठेची
आज संघटनेची
भारत भूमीची आन ।।३।।

***

## गीत क्र. ५

खुरपण खुरपण शेताचं खुरपण
पीक ठेवून जागेवर तन् काढून वेचून ।।धृ।।

पेरले हो पीक मी शेतात निष्ठेने
आलं कसं तन हे मध्येच उगवून
घालू मुळावर खुरपं कारी धार लावून ।।१।।

पीक माझ्या देशात सज्जन शक्तीचं
वाढतं हो तण त्यात दुर्बल वृत्तीचं
पालटता वृत्ती बने व्यक्ती हो सज्जन ।।२।।

पीक माझ्या मनात सज्जन भक्तीचं
वाढणं हो मण त्यात विषय वृत्तीचं
होण्या मन शुद्ध जाऊ संघाला शरण ।।३।।

***

## गीत क्र. ६

कण कण अडवू या, थेंब थेंब जिरवू या
पीक आणि पाण्याचा योग्य मेळ साधू या ।।धृ।।

करू नांगरट आडवी, उताराच्या दिशेला
बांध घालू समतल, पाणी जागी मुरण्याला
प्रक्रिया बियाणला, पेरा करू वाफश्याला
पीक येई तरारूनी, मग नाचू गावू या ।।१।।

करता कोळपणी मिळे, अर्धे पाणी पिकाला
होता विरळणी मिळे, प्रकाश साऱ्या पानाला
अन्न झाले पाणी झाले, पीक वाढे भरारा
राब राबुनी दिसामाजी, अभंगाला गावू या ।।२।।

कापणी करू वेळेला, पीक येई पदराला
निवडू पाखडू सडू कांडू, मूल्य वर्धनाला
मिळण्या दाम घामाचा, लागू प्रक्रियेला
संघटित होऊनी, जाऊ बाजाराला ।।३।।

***

## गीत क्र. ७

अखिल विश्व के लिए आम फल, दुध, जुटाने वाले हम
शोषित पीडित हर किसान का, भाग्य जगाने वाले हम
हमे किसी से बैर नहीं है, हमे किसी से भीती नहीं ।।धृ।।

सबसे मिलकर काम करेंगे संघटना की रीती यही
जातीवाद और राजनीती का भेद मिटाने वाले हम ।।१।।

अपने घोर परिश्रम से हम, पैदावार बढा देंगे
कंकर, पत्थर, समतल कर, बंजर में फसल उगा देंगे
भारत माँ का खोया वैभव वापस लाने वाले हम ।।२।।

हर किसी के मुख की रोटी, हरना अपना काम नहीं
अपने हर के लिए सतत, संघर्ष चलाने वाले हम ।।३।।

पुजीपति से लिकर, अफसर साही जाल बिछाती है।
करे रात दिन मेहनत हम, फिर जिलत युद्ध न पाही है।
फिके पौलादी पंजो से, मुक्ती दिलाने वाले हम ।।४।।

अपना पथ आसान नही हैं, यह भी हमने जाना है।
पर मंजिल तक पहुँचेंगे, यह निश्चय हमने ढाना है
त्याग, तपस्या, कुर्बानी की शमा जगाने वाले हम ।।५।।

***

## गीत क्र. ८

स्वावलम्बी स्वाभिमानी भाव जगाना है।
चलें गाँव की ओर, हमें फिर देश बनाना है ।।धृ।।

हर घर में गौ माँ की सेवा, पशुधन का हो पालन ।
नदियों की रक्षा करने से, धरती माँ का पोषण ।
बने औषधि पंचगव्य से, खाद गोबर से ।
स्वच्छ रहेंगे, स्वस्थ रहेंगे, भाव जगाना है ।
जड़ी बुटी से खुशहाली, हर गाँव में लाना है ।
चलें गाँव की ओर, हमें फिर देश बनाना है ...

गाँव में होगी जैविक खेती, जमीं के नीचे पानी ।
अनाज सब्जी फूल और फल से, सजेगी धरती सारी।
कोई न होगा भूखा प्यासा, पूरी होगी सबकी आशा।
स्नेह और सहकारिता का, भाव जगाना है ।
कृषि आधारित समृद्धि, हर गाँव में लाना है।
चलें गाँव की ओर, हमें फिर देश बनाना है ...

ग्रामोद्योग विस्तार से सबका, निश्चित हो रोजगार ।
जियें सादगी से सब रक्खें, मन में उच्च विचार ।
गाँव का हर बच्चा हो शिक्षित, हर युवा संस्कारी निर्भिक ।
भारत माता की जय हो, यह भाव जगाना है ।
राम राज्य के सपने को, साकार करना है ।
चलें गाँव की ओर हमें फिर देश बनाना है ....

ग्राम नगर वन के सब वासी, भारत की संतान ।
एक संस्कृति एक धर्म है, पुरखे सबके समान ।
ऊँच नीच का भेद भुलाकर, कंधे से कंधा मिलाकर ।
समरसता का गीत गाकर, कदम बढाना है।
चलें गाँव की ओर, हमें फिर देश बनाना है ...

***

## गीत क्र. ९ : मेरा गाव - मेरा तीर्थ

अपनी जनमभूमी गाँव को, तीरथ धाम बनाना है।
धरती माता के चरणों में, नित् नित् शीश झुकाना है ।।धृ।।

स्वावलम्बी स्वाभिमानी, समरसता से युक्त हो ।
छुआछूत और भेदभाव की, कुरीतियों से मुक्त हो ।
भारत माँ की संतानें हम, सबको गले लगाना है ।।१।। धरती माता के...

घर घर में हो गाय माता, दूध दही घी माखन हो ।
औषधियों से युक्त रसोई, तुलसी क्यारा आंगन हो ।
खेत खेत से पुन: हमे, जैविक अन्न उगाना है ।।२।। धरती माता के....

कारीगर जो गुमनामी में, उन्हें ढूँढकर लायेंगे ।
माटी धातु काष्ठकला को, फिर सम्मान दिलायेंगे ।
अपने श्रम से स्वर्ण बनाने, की कला सिखलाना है ।।३।। धरती माता के....

मंदिर अच्छा हो विद्यालय, साफ सुथरा गाँव हो ।
कोयल बोले मोर पपीहा, बड पींपल की छाँव हो ।
देखन आवें दूर दूर से, ऐसा गाँव बनाना है ।।४।। धरती माता के....

***

# परिशिष्ट ६: अधिक माहितीसाठी संदर्भ

ग्रामविकास आणि संघटनात्मक काम या विषयात आपल्याला अधिक रुची असल्यास, खाली सुचवलेली पुस्तके, नियतकालिके आणि वेबसाईट जरूर पहाव्यात.

| अनु. | पुस्तकाचे नाव | लेखक / प्रकाशन | कोणत्या माहितीसाठी वाचाल? |
|---|---|---|---|
| १ | समग्र ग्रामविकास योजना (खंड १, २ आणि ३) – एकूण २ पुस्तके | श्री. भारती प्रकाशन, नागपूर | ग्रामविकास विभागाने संकलित केलेली पहिली पुस्तिका – सैद्धांतिक भूमिका, शिक्षण, संस्कार, आरोग्य, भूमी, उर्जा, ग्रामीण उर्जा (बैल) इ. |
| २ | ग्रामगीता | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | ओघवत्या शैलीमध्ये गावातील विविध समस्या आणि त्यांचे निवारण कसे करायचे, आदर्श गाव, महिला–शक्ती, स्वच्छतेचे महत्व, गो–वंश सुधार, याबद्दल प्रसिद्ध ग्रंथ, हा बाजारात सहज उपलब्ध आहे |
| ३ | ग्रामस्वराज्य | महात्मा गांधी आणि विनोबा भावे | विकेंद्रित, स्वावलंबी ग्राम व्यवस्था आणि ग्रामोद्योग याबद्दल गांधीजींचे विचार |
| ४ | ग्रामसंस्कृती | आनंद यादव मेहता पब्लिशिंग हाउस | गेल्या १५०–२०० वर्षात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात झालेले कृषि आणि सांस्कृतिक बदल |

| अनु. | पुस्तकाचे नाव | लेखक / प्रकाशन | कोणत्या माहितीसाठी वाचाल? |
|---|---|---|---|
| ५ | एकात्म मानव दर्शन | पं. दीनदयाळ उपाध्याय | समग्र मानव आणि सृष्टी यांचे परस्परातील नाते आणि शाश्वत विकास आधारित जीवनपद्धती याबद्दल पंडितजींचे विचार |
| ६ | सेवा–साधना | एकनाथ रानडे | समाजासाठी सेवात्मक काम करताना कार्यकर्त्याची भूमिका कशी असावी याबद्दल मार्गदर्शन |
| ७ | माणूस नावाचे काम | भारतीय विचार साधना, यशवंतराव केळकर | संस्था किंवा एखादा गट म्हणून काम करताना कसे करावे आणि येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्यात याबद्दल प्रत्यक्ष अनुभव |
| ८ | भगीरथाचे वारस | राजहंस प्रकाशन, वीणा गवाणकर | 'पाणी पंचायत' चे प्रवर्तक विलासराव साळुंखे यांचे चरित्र, त्यांनी आयुष्यभर जी जल–संवर्धन आणि त्याचे सम–न्यायी वाटप यावर जे काम उभे केले त्याबद्दल सविस्तर आणि प्रेरणा देणारी माहिती |
| ९ | गोष्ट मेंढा गावाची | मिलिंद बोकील, मौज प्रकाशन गृह | गडचिरोली जिल्ह्यातील प्रसिध्द मेंढा–लेखा गावाचा प्रवास उलगडून सांगणारे पुस्तक, इथल्या आदिवासी लोकांनी एकत्र येवून कशी व्यवस्थापन व्यवस्था बसवली आहे याची अत्यंत प्रेरक कहाणी |

**काही महत्वाच्या वेबसाईट आणि youtube व्हिडीओ साठी लिंक्स:**

| संस्था/विषय | वेबसाईट / Youtube लिंक | काय माहिती मिळेल? |
|---|---|---|
| देवगिरी प्रांत ग्रामविकास विभाग | https://www.youtube.com/channel/UCiD3Y4RahihfdsBšQxjD8xQ | देवगिरी प्रांतात झालेले विविध उपक्रम आणि यशोगाथा यांची माहिती |
| बारीपाडा यशोगाथा | https://www.youtube.com/watch?v=ZTCdXGtNh1E | बारीपाडा गावाची यशोगाथा |
| आदर्श गाव – हिवरेबाजार | https://www.youtube.com/watch?v=IfdjubjdMtc | हिवरेबाजार गावाची यशोगाथा |
| अण्णा हजारे – जीवनकथा | https://www.youtube.com/watch?v=2FEV0fvEMoI | अण्णा हजारे यांची प्रेरणा दायी जीवनकथा |
| अँग्रोवन – ग्रामविकास यशोगाथा | http://www.agrowon.com/ इतर ग्रामविकास | अनेक गावांच्या यशोगाथा इथे वाचायला मिळतील |
| अँग्रोवन – शेतकरी यशोगाथा | http://www.agrowon.com/ यशोगाथा | इथे अनेक शेतकऱ्यांच्या यशोगाथा, शेतीतील नाव–नवीन प्रयोग पाहायला मिळतील |
| मेंढालेखा गाव | https://www.youtube.com/watch?v=QIJSFBS3eU4 | गडचिरोली गावातील मेंढालेखा गावाची यशोगाथा |
| पानी फौन्डेशन | https://www.youtube.com/channel/UCUmhrRevHylwkšpLfqwDr0Q | जल–संधारण कामासाठी अनेक मार्गदर्शन व्हिडीओ आणि प्रेरणादायक अनुभव |